# मेहता मराठी ग्रंथजगत

मे, २०१९

पृष्ठे १३२ किंमत : रु.१५

वर्ष एकोणिसावे

अंक पाचवा





**दिनमार्क पब्लिकेशन्सतर्फे** घेण्यात आलेल्या छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत मेहता मराठी ग्रंथजगतच्या २०१८ च्या दिवाळी अंकास **‘दखलपात्र दिवाळी अंक निर्मिती’**चा प्रथम क्रमांकाचा **‘सौ. कमलाबाई रसिकलाल धारिवाल’** पुरस्कार प्राप्त झाला. पुरस्कारार्थ मिळालेलं हे मानचिन्ह. (सविस्तर वृत्त पान २८ वर ‘उपक्रम’ या सदरात)



**‘बालक-पालक आणि बालसाहित्य’** या विषयावर उपस्थितांशी संवाद साधताना ज्येष्ठ बाल साहित्यिक **राजीव तांबे**. (सविस्तर वृत्त पान २८ वर ‘उपक्रम’ या सदरात)

◆ मे २०१९
◆ वर्ष एकोणिसावे
◆ अंक पाचवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— अनुक्रमणिका —

**संपादकीय** ४
**दिनविशेष** १०
**व्यक्तिवेध** १६
**पुरस्कार** २६
**उपक्रम** २८
**ग्रंथव्यवहार** ३२
**श्रद्धांजली** ३८
**पुस्तक परिचय**
पर्याय शब्दकोश ४०
A Methodical English Grammar ४६
**बालनगरी**
चंपी मालीश आणि था...था... था... ५०
एक दिवस फूलपरीचा ५६
अनाथ ६२
**विज्ञानविश्व**
वाचनातून विज्ञान ६८
**'निसर्ग' मालिका**
आधार ७७
सावली ८१
कपट ८५
**'गोष्ट डॉटकॉम' मालिका**
श्वेताची परी झाली ९१
सोनलचं धाडस ९३
तळ्याकाठची मैत्री ९५
**'कांगारु देशीच्या गोष्टी' मालिका**
रात्रीचे राक्षस ९७
**'विक्रम वेताळ' मालिका**
गुप्त खजिना १०२
टेकडीवरचं देऊळ १०८
कृतघ्न चंदन ११४
**अभिप्राय**
अ-मृत पंथाचा यात्री १२०
द फेसबुक इफेक्ट १२३
**लक्षवेधी** १२८

**संपादक**
सुनील मेहता

**कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**

**प्रसिद्धी :** दरमहा ११ तारखेस

(वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.)

**मांडणी-अक्षरजुळणी** मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## बाल/कुमार वाङ्मयाचं विविधरंगी विश्व

कुमार वय हा जीवनातील एक संस्कारशील, संवेदनशील टप्पा. या टप्प्यावर होणारं शिक्षण, मिळणारे संस्कार आणि ज्ञान-माहिती, जीवनाची पुढची वाटचाल समृद्ध करत असतात. अर्थातच औपचारिक शिक्षण असेल किंवा संस्कार (मूल्यशिक्षण) किंवा ज्ञान-माहिती, हे सगळं मिळवण्याचा एक प्रभावी स्रोत म्हणजे पुस्तकं. आम्ही आमच्या अनेकानेक पुस्तकांमधून बाल/कुमार वाचकांसाठी ही ज्ञान-माहिती, शिक्षण, संस्कारांची शिदोरी उपलब्ध करून दिली आहे. बाल/कुमारांसाठीच्या पुस्तकांचं हे विविधरंगी विश्व आम्ही आमच्या या वेळच्या अंकातून बाल/कुमार वाचकांच्या भेटीला आणलं आहे.

या विश्वात संचार करताना विज्ञानाचं एक दालन आमच्या बाल/कुमार दोस्तांना खुणावतं. या दालनात डी. एस. इटोकर यांचे विविध प्रयोग (वैज्ञानिक खेळणी, प्रयोग वनस्पती विज्ञानाचे इ.) आमच्या या दोस्तांचं लक्ष वेधून घेतात. इटोकरांनी दिलेली साध्या यंत्रांची सचित्र माहिती, 'A to Z' 'विज्ञान' मधून स्पष्ट केलेल्या विविध वैज्ञानिक बाबी आमच्या दोस्तांच्या वैज्ञानिक ज्ञानात भर घालतात. इटोकरांच्या या विज्ञानविश्वात आमचे दोस्त नक्कीच रमतील.

आमच्या या छोट्या दोस्तांना आकर्षित करणारं आणखी एक दालन आहे 'निसर्ग' ही गोष्टीच्या पाच पुस्तकांची मालिका. मधुमती शिंदे या मालिकेतून  दोस्तांना झाडांच्या, प्राण्यांच्या-पक्ष्यांच्या जगात घेऊन जातात. काही वेळेला माणसंही असतात या जगात. 'गीरचं जंगल'मधला सिंह माणसाने निसर्गाच्या चालवलेल्या संहाराबद्दल चिंता व्यक्त करतो. तर 'आधार'मधील माकडं एका डुकराच्या पिल्लाला आधार देतात. या कथांमुळे मनोरंजन तर होईलच; पण बरंच काही शिकायला मिळेल. निसर्गाकडे

संवेद्यतेने पाहायला शिकवतील या मालिकेतील पुस्तकं आणि महत्त्वाचं म्हणजे या पुस्तकांच्या मुखपृष्ठाबरोबरच सरदार जाधव यांनी रेखाटलेली या पुस्तकातील चित्रंही दोस्तांना खूप आवडतील.

'गोष्टी डॉटकॉम' ही ज्ञानदा नाईक यांच्या गोष्टींची मालिका आहे. ती तीन विभागांत अगदी दोन-तीन पानांच्या गोष्टीतून बोध देण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. 'खराखुरा मित्र झिपरू'मध्ये उपद्रवी झिपरूला एक कुटुंब कसं आपलंसं करतं, याचं छान चित्रण आहे. तसेच 'लाडके फ्रेंड आबोदा'मध्ये आजोबांवर प्रेम करणाऱ्या नातवाचं हृद्य चित्र रेखाटलंय. याही पुस्तकांच्या मुखपृष्ठासह आतील चित्रं दोस्तांचं मन वेधून घेतील. ती चित्रं रेखाटली आहेत घन:श्याम देशमुख यांनी.

छोट्यांच्या आणि मोठ्यांच्याही आवडीची आणखी एक मालिका म्हणजे 'विक्रम आणि वेताळ.' राजा स्मशानात जाऊन झाडाला उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर घेतो आणि परतीच्या वाटेला लागतो. जर राजाने मूकपणे वाटचाल केली तरच त्याला परतीचा प्रवास शक्य होईल, अशी अट वेताळ घालतो आणि राजाला एक कथा सांगतो. त्या कथेविषयी वेताळ राजाला प्रश्न विचारतो. राजाने त्या प्रश्नाचं उत्तर दिल्यामुळे त्याचा मौनभंग होतो आणि वेताळ परत झाडावर जाऊन लटकतो. राजा त्याला परत खांद्यावर घेऊन चालायला लागतो. परत वेताळ त्याला गोष्ट सांगतो आणि पुन्हा एकदा राजाचं मौन भंगतं आणि वेताळ पुनश्च झाडावर जाऊन लटकतो. अशा या सूत्रातून 'विक्रम-वेताळ' मालिकेतील कथा गुंफल्या आहेत. या कथा मनोरंजन तर करतातच, पण बुद्धीलाही खाद्य पुरवतात आणि जीवनाचेही धडे देतात. या कथांमधील चित्रंही मनोवेधक असतात.

तेव्हा कथांच्या या मार्गावर वि. स. खांडेकरांच्या कुमारांसाठीच्या कथाही भेटतात. या कथांमधूनही खांडेकर मूल्यशिक्षण देतात. 'अनाथ' ही या अंकासाठी निवडलेली कथाही जीवनातील वास्तवाबरोबरच आदर्शाला भिडणारी आहे.

तर, बाल आणि कुमारांचं रंजन करणाऱ्या, त्यांना ज्ञान-माहिती-मूल्य देणाऱ्या विविधरंगी साहित्याचं संकलन आम्ही या अंकातून केलं आहे; या संकलनाबरोबरच 'पर्याय शब्दकोश' आणि 'A Methodical English Grammar' या पुस्तकांचा परिचय (त्यातील वेच्यासह)

आम्ही दिला आहे. अर्थातच इंग्रजी व्याकरणाच्या शास्त्रशुद्ध अभ्यासातून आकारलेलं 'A Methodical English Grammar' हे पुस्तक आमच्या दोस्तांना इंग्रजीत अचूक लेखन आणि संभाषण करायला तर शिकवेलच; पण इंग्रजीच्या पेपरधील त्यांचे व्याकरणाचे गुणही वाढवेल. तसेच 'पर्याय शब्दकोश' हा अगदी बाल/कुमारांसाठी नसला तरी कोश म्हणजे काय असतं, याची कल्पना त्यांना येईल आणि आतापासूनच असे शब्दकोश वापरायची सवय त्यांनी स्वत:ला लावून घेतली तर भाषासमृद्धीच्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू होईल.

जीवनाची व्यापकता या अंकातील संकलनातूनही दोस्तांच्या लक्षात येईल. या व्यापकतेला भिडण्याचं सामर्थ्य पुस्तकं देऊ शकतात. तेव्हा दोस्तांनो, पुस्तकं वाचा, समृद्ध व्हा आणि एक चांगला माणूस म्हणून स्वत:ला घडवा. तुमची सुट्टी पुस्तकमय होवो!




**फेसबुक प्रतिक्रिया**

**गोष्टींचं एटीएम**



खूप अप्रतिम पुस्तक आहे आणि मजेदारसुद्धा

- भाग्यश्री हिरे

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

## डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

## WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
ैंत : सर्ूद्दवेत्तुैंत.म्दस

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी ईंददे युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर-थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## १६ मे ते १५ जून २०१९ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

### १७ मे - अंजनी नरवणे यांचा जन्मदिन

अंजनी नरवणे अनुवादित वीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४६७०/- । सवलत किंमत २७४९/-**

१७ मे ते १८ मे

### १७ मे - सुनीता कट्टी यांचा जन्मदिन

'अ नोट फ्रॉम इचियो', 'देवाजीचं ऑफिस', 'नेव्हर टू रिटर्न' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६८०/- । सवलत किंमत ४४९/-**

१७ मे ते १८ मे

### १९ मे - वासंती घोसपूरकर यांचा जन्मदिन

'वादळफूल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

१९ मे ते २० मे

### १९ मे - मेघना जोशी यांचा जन्मदिन

'प्रेमाची परिभाषा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

१९ मे ते २० मे

### २४ मे - राजदीप सरदेसाई यांचा जन्मदिन

'डेमोक्रसीज इलेव्हन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३४९/-**

२४ मे ते २५ मे

### २५ मे - मोहन गोखले यांचा जन्मदिन

'तेलसम्राट', 'असाध्य ते साध्य', 'बीजिंगचे गुपित' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११४०/- । सवलत किंमत ७४९/-**

२५ मे ते २६ मे

**२५ मे - गणेश मानुगडे यांचा जन्मदिन**

'बाजिंद', 'धना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

२५ मे ते २६ मे

**२८ मे - इयान फ्लेमिंग यांचा जन्मदिन**

'फ्रॉम रशिया विथ् लव्ह', 'गोल्डफिंगर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २१९/-**

२८ मे ते २९ मे

**२९ मे - जागतिक शांतताप्रिय दिवस**

संच १ - 'मी मलाला', 'महात्मा गांधी आणि तीन माकडे', 'ममतेची मूर्ती मदर तेरेसा', 'मदर तेरेसा', 'Speeches that Reshaped the World' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११७५/- । सवलत किंमत ६९९/-**

संच २ - 'Speeches of War And Peace', 'मोहनदास', 'दयादीपिका फ्लॉरेन्स नाइटिंगेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२५/- । सवलत किंमत ७९९/-**

२९ मे ते ३१ मे

**३१ मे - अहिल्याबाई होळकर यांचा जन्मदिन**

'कर्मयोगिनी', 'सतिसाध्वी देवी अहिल्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

KARMAYOGINI (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत १७९/-**

३१ मे ते १ जून

**३१ मे - मिलिंद जोशी यांचा जन्मदिन**

'एका परिसाची कथा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

३१ मे ते १ जून

**१ जून - ल. सि. जाधव यांचा जन्मदिन**

'अडगळ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**
१ जून ते २ जून

**१ जून - राजन गवस यांचा जन्मदिन**

'आपण माणसात जमा नाही', 'भंडारभोग-५', 'चौंडकं', 'रिवणावायली मुंगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७५०/- । सवलत किंमत ५४९/-**
१ जून ते २ जून

**१ जून - बा. ग. केसकर यांचा जन्मदिन**

'डव्हाळं', 'सुर्वंता'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**
१ जून ते २ जून

**१ जून - दादासाहेब मोरे यांचा जन्मदिन**

'गबाळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**
१ जून ते २ जून

**४ जून - आनंद कान्हेरे यांचा जन्मदिन**

'मॅस्वी कान्हेरे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ९९/-**
४ जून ते ५ जून

**४ जून - जागतिक निष्पाप मुलांचा क्रूर बळी दिवस**

**संच १** - 'हरवलेले बालपण', 'झोंबी', 'खाली जमीन वर आकाश', 'वेस्टेड', 'हिरॉईन ऑफ द डेझर्ट', 'बिलाँगिंग' 'नेव्हर टू रिटर्न', 'ॲन आय फॉर ॲन आय', 'द काइट रनर', 'ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २४८०/- । सवलत किंमत १५४९/-**
**संच २** - 'डिनायल','द डायरी ऑफ मेरी बर्ग', 'वेदनेची फुले', 'मी मलाला', 'आय एम अ टॅक्सी', 'परवाना', 'शौझिया-२', 'द ब्रेडविनर', 'लव्हिंग नॅटली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७२५/- । सवलत किंमत १०४९/-**

४ जून ते ६ जून

**५ जून - जागतिक पर्यावरण दिवस**

**संच १** - 'वसुंधरा', 'पर्यावरण प्रदूषण', 'वेध पर्यावरणाचा', 'आपली सृष्टी १० पुस्तकांची मालिका', 'वायू प्रदूषण', 'विपुलाच सृष्टी', 'कथारूपी खगोलशास्त्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३५०/- । सवलत किंमत १४९९/-**
**संच २** - 'केल्याने होत आहे रे', 'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'विज्ञान नवलाई', 'अंतरिक्षाचा वेध', 'अवनी एक नवी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १३२०/- । सवलत किंमत ८४९/-**
५ जून ते ७ जून

**५ जून - केन फोलेट यांचा जन्मदिन**

'ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**
५ जून ते ६ जून

**६ जून - एम. जे. हायलंड यांचा जन्मदिन**

'कॅरी मी डाऊन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**
६ जून ते ७ जून

**७ जून - नीला चांदोरकर यांचा जन्मदिन**

नीला चांदोरकर अनुवादित नऊ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २४५०/- । सवलत किंमत १४९९/-**
७ जून ते ८जून

**८ जून - रामचंद्र खाटमोडे यांचा जन्मदिन**

'सर्जा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**
८ जून ते ९ जून

**९ जून - किरण बेदी यांचा जन्मदिन**

किरण बेदी यांच्या आठ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११९९/-**
९ जून ते १० जून

### ११ जून - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन

‘आजचा मेनू’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १९९/-**
११ जून ते १२ जून

### ११ जून - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन

‘द नेमसेक’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-**
११ जून ते १२ जून

### ११ जून - जॉर्जिना हार्डिंग यांचा जन्मदिन

‘हेरगिरीचा पोरखेळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**
११ जून ते १२ जून

### १२ जून - ॲन फ्रँक यांचा जन्मदिन

‘डायरी ऑफ ॲन फ्रँक’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**
१२ जून ते १३ जून

### १२ जून - जागतिक बालकामगार विरोधी दिन

**संच १** - ‘हरवलेलं बालपण’, ‘आय एम अ टॅक्सी’, ‘खाली जमीन वर आकाश’, ‘सर्चिंग फॉर डॅडी’, ‘शेम’, ‘हिरॉइन ऑफ द डेझर्ट’, ‘वेदनेची फुले’, ‘शॅपेल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत १०४९/-**
**संच २** - ‘झोंबी’, ‘वेस्टेड’, ‘बिलाँगिंग’, ‘नेव्हर टू रिटर्न’, ‘ॲन आय फॉर ॲन आय’, ‘द काइट रनर’, ‘ए थाउजंड स्प्लेन्डिड सन्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १०९९/-**
१२ जून ते १४ जून

**१२ जून - भा. द. खेर यांचा जन्मदिन**

‘चाणक्य’, ‘दिग्विजय’, ‘प्रबुद्ध’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७९९/-**
१२ जून ते १३ जून

**१३ जून - माधुरी शानभाग यांचा जन्मदिन**

माधुरी शानभाग अनुवादित आठ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १३२०/- । सवलत किंमत ८९९/-**
१३ जून ते १४ जून

**१४ जून - सुषमा शाळिग्राम यांचा जन्मदिन**

सुषमा शाळिग्राम अनुवादित आठ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५००/- । सवलत किंमत ९४९/-**
१४ जून ते १५ जून

**१४ जून - मुग्धा गोखले यांचा जन्मदिन**

मुग्धा गोखले अनुवादित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २४९/-**
१४ जून ते १५ जून

**१४ जून - जी. डी. मोरे यांचा जन्मदिन**

**A Methodical English Grammar** या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**
१४ जून ते १५ जून

**१५ जून - अण्णा हजारे यांचा जन्मदिन**

‘अण्णा हजारे’, ‘लढा लोकपालचा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**
१५ जून ते १६ जून

**१५ जून - आ. पां. खरात यांचा जन्मदिन**

‘शर्यती-स्पर्धा-खेळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**
१५ जून ते १६ जून

# व्यक्तिवेध



## पद्मश्री सुधा मूर्ती



सुधा मूर्ती या नावातच माया, वात्सल्य जाणवतं. वाचनाची आवड निर्माण झाल्यापासून सुधा मूर्ती यांच्या लीना सोहोनी अनुवादित प्रत्येक पुस्तकातून ती आवड अधिक वाढली. मूर्ती यांची पुस्तकं वाचताना त्यांच्याबद्दलचा आदर दुणावत गेला. विशेषत: ज्या पुस्तकांत त्यांनी आत्मानुभव सांगितले आहेत (उदा. तीन हजार टाके, वाइज अँड अदरवाइज इ.) ती पुस्तकं मनाला जास्त भावतात; कारण त्या त्या प्रसंगाचं, घटनेचं वर्णन त्या खास शैलीत, नेमक्या शब्दांत करतात. मांडणीही नेमक्या पद्धतीने करतात आणि मुख्य म्हणजे त्यांच्या अशा प्रकारच्या लेखनातून सकारात्मकता डोकावत असते.

त्यांच्या सगळ्याच लेखनातून एक वेगळी दृष्टी कायम मिळत असते. एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्या लिहितात, 'भाषा हे केवळ एक साधन आहे; पण त्या भाषेच्या आतमध्ये कथा गुंफणारी एक व्यक्ती असते. ती व्यक्तीच जास्त महत्त्वाची असते. तुम्ही एक कथाकथानकार आहात. त्यामुळे तुम्ही तुमची गोष्ट सांगायला सुरुवात करा. भाषा त्याबरोबर आपोआप वळणावर येईल.' कन्नड ही त्यांची मातृभाषा असल्याने त्यातून केलेल्या लेखनात सहजता आणि आपलेपणा जाणवतो आणि हीच त्यांच्या लेखनाची ताकद आहे असं वाटतं. पुढे त्यांनी इंग्रजीतही लेखन केलं. 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये त्यांनी स्तंभलेखन केलं. आज त्यांच्या पुस्तकांच्या माध्यमातून त्या अनेकांच्या प्रेरणास्थानी आहेत. 'वाइज अँड अदरवाइज'पासून सुरू झालेला हा प्रवास 'तीन हजार टाके' इथवर आलेला आहे.

सर्वसाधारण मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबातील असलेल्या मूर्तींमध्ये त्यांच्या बालपणापासूनच समाजसेवेचं बीज रुजलं. टाटा स्टील कंपनीत

पहिल्या महिला इंजिनिअर म्हणून रुजू होण्याचा मान त्यांना मिळाला. 'ग्रेट भेट' या 'आयबीएन लोकमत'च्या मुलाखतीत त्यांनी इन्फोसिसच्या संदर्भातील आठवणींना उजाळा दिला. इन्फोसिसच्या स्थापनेचा निर्णय ज्या वेळी नारायण मूर्ती यांनी घेतला, त्यावेळी आपल्याजवळ जमवलेले दहा हजार रुपये सुधाजींनी त्यांना दिले. ते देताना त्यांनी नारायण मूर्ती यांना सांगितलं, की पुढली तीन वर्षं घराची पूर्ण जबाबदारी मी घेईन. तुम्ही आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करा. नारायण मूर्तींनी सुरवातीला आपल्या घरीच इन्फोसिसचं ऑफिस थाटलं. सुधाजींनी वालचंद ग्रुपमध्ये नोकरी करायला सुरवात केली. घरातील स्वयंपाकादी कामं त्या करतच होत्या; पण इन्फोसिसमध्ये कारकून आणि प्रोग्रामर म्हणूनही भूमिका निभावत होत्या. आज इन्फोसिस यशाच्या शिखरावर असूनसुद्धा त्याचं श्रेय घेण्याचा प्रयत्न त्यांनी कधीही केला नाही. आजच्या घडीला सुधा मूर्ती भारतातील सगळ्यात श्रीमंत स्त्रियांपैकी एक आहेत. 'इन्फोसिस फाउंडेशन'च्या माध्यमातून समाजात बदल घडविण्याचे महत्कार्य त्या करत आहेत. एके ठिकाणी त्यांनी लिहिलं आहे-

'Money can give you certain comforts; but money has limited use. And once you realise that, money becomes a burden to you. You donate it. Money is a heavy bag on your back and you should lead a simple lightweight life'.

इतका प्रचंड पैसा असतानासुद्धा अगदी साधं आयुष्य जगण्यात सुधा मूर्ती यांना आत्मिक समाधान मिळतं. 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' ह्याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणेज सुधाजी. त्यांच्या 'तीन हजार टाके' या पुस्तकात 'तीन ओंजळी पाणी' या कथेत काशीचे खूप सुंदर वर्णन केलं आहे. काशीला दशाश्वमेध घाटावर गंगेला तीन ओंजळी अर्घ्य देताना पहिल्या ओंजळीत आजी-आजोबांच्या नावाने अर्घ्य, दुसऱ्या ओंजळीत या भारत भूमीत जन्माला आले याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, देशाचा नागरिक असल्याचा अभिमान बाळगत त्यासाठी समर्पित केलेले अर्घ्य आणि तिसरे अर्घ्य अतिशय महत्त्वाचे, त्यांच्या आजोबांनी सांगितलेले त्यांना आठवते की सगळ्यात आवडत्या गोष्टीचा त्याग, म्हणजे सर्वांत प्रिय गोष्ट आहे ती सोडायची. तो अनुभव त्यांच्याच शब्दांत, 'मी कुठल्या गोष्टींचा त्याग करू?' मी विचारात पडले. हे जीवन, विविध रंग, आकार, निसर्ग, संगीत, कलाकृती, वाचन आणि खरेदी हे सर्वच अत्यंत प्रिय होते. साडी खरेदी ही

माझी अतिशय आवडती गोष्ट होती. निसर्गाशी मिळत्याजुळत्या रंगाच्या साड्या आवडायच्या. ठरलं तर मग. मला अत्यंत प्रिय असणारी गोष्ट मी सोडली पाहिजे, असं या काशी शहराचं म्हणणं आहे तर आज इथे, या उगवत्या सूर्याच्या साक्षीनं मी आजपासून मी सर्व प्रकारच्या खरेदीवर पाणी सोडत आहे. अन्न, औषधपाणी, प्रवास, पुस्तकं व संगीत याचा अपवाद वगळता मी इथून पुढे कोणत्याही प्रकारची खरेदी करणार नाही. मी आजपासून हा नेम करत असून, माझ्या जीवनाच्या शेवटापर्यंत या गोष्टीचे पालन करेन,' असं म्हणून त्यांनी तिसरी ओंजळ गंगेच्या प्रवाहात सोडली. त्या पुढे लिहितात, 'शेवटच्या ओंजळभर पाण्याने माझं आयुष्य बदलून टाकलं आहे.'

टेल्को कंपनी सोडताना जेआरडी टाटांनी सुधा मूर्तींना काही उपदेशाचे बोल सांगितले होते, ज्यावर सुधा मूर्ती यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत... 'If you make lots of money, you must give it back to society as you have received so much love from it'. टाटांच्या शब्दाला जागत सुधाजींनी १९९७ मध्ये इन्फोसिस फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक हॉस्पिटल्स, शाळा, अनाथाश्रम बांधले. प्रत्येक शाळेत ग्रंथालय असलं पाहिजे, ह्या आपल्या स्वप्नाला त्यांनी आकार द्यायला सुरवात केली. त्यातून आजवर पन्नास हजार ग्रंथालयांची स्थापना त्यांनी केली आहे. दहा हजार पेक्षा जास्त स्वच्छतागृहं त्यांनी उभी केली आहेत. केरळला आलेल्या त्सुनामीसाठी मदत म्हणून त्या काम करत आहेत, हा व्हिडिओ आता viral झालेला आहे. त्यांच्या सामाजिक कार्यासाठी भारत सरकारने त्यांना २००६ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते पद्मश्री देऊन गौरवलं आहे. फक्त पैसा दिला म्हणजे मदत होत नाही, तर त्यापलीकडे खूप काही करण्यासारखं असतं, हा आदर्श ठेवताना सुधाजी सांगतात, 'Donating 100 crores isn't more valuable than teaching 100 children'

प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला असून, अभियंता, शिक्षिका, लेखिका, समाजसेविका, क्लार्क, ट्रस्टी, गृहिणी, पत्नी, आई, आजी अशा प्रत्येक भूमिकेला त्यांनी पूर्ण न्याय दिला आहे. पद्मश्री सुधा मूर्ती यांना प्रणाम. आपले कार्य व कर्तृत्व सदैव प्रेरणादायी ठरावे, असेच आहे.

## आठवणी दाटतात



मराठी वाचकाला मंत्रमुग्ध करणारे माझे वडील 'स्वामी'कार रणजित देसाई यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी कोल्हापुरात झाला. दादांच्या आई कोवाडच्या गोरगरिबांवर औषधोपचार करीत. लेखन व प्रेमळ स्वभावाची देणगी दादांना आईकडून मिळाली. दादा फार लवकर पोरके झाले. त्यामुळे त्यांना आजोळी आजीकडे राहावे लागले. दादा हे कोवाडकर इनामदार घराण्यात जन्मल्यामुळे इनामदारी घराण्याचे आचारविचार, शिष्टाचार यांचा प्रभाव त्यांच्या लेखनावर दिसून येतो. दादा कधी सरदार घराण्यात रमले नाहीत. ते अखंड वाचन व चिंतन करत राहिले. त्यामुळेच त्यांच्या हातून मनाला भिडणारी साहित्यनिर्मिती झाली. त्यांना आजींमुळे वाचनाची आवड निर्माण झाली. बालगंधर्व हे आजोबांचे मित्र. त्यामुळे दादांना गायनाची गोडी लागली. त्यांचे गायन, सतारवादन, लेखन असे अनेक छंद पाहून एक दिवस आजींनी विचारले, 'रणजित, तुला कोण व्हायचंय? लेखक व्हायचं असेल तर त्यावर एकाग्र होऊन उत्तम लेखक हो.'

कोल्हापूरला आजीजवळ राहून दादा मॅट्रिक झाले, तेव्हा त्यांचे वडील त्यांना म्हणाले, 'रणजित, तुम्ही कोवाडकर. शेती हाच तुमचा मूळ व्यवसाय. शेतीमुळे तुमचा संसार व तुमचे छंद जोपासले जातील.' शहरी जीवनाच्या चक्रव्यूहात न गुरफटता वडिलांची आज्ञा मानून कोल्हापूरच्या चैन, सुविधा सोडून ते कोवाडसारख्या खेड्यात आले. ते हळूहळू शेतीत रमले.

कोवाडला त्यांच्या वाट्याला आली 'वारी' ही शेती. एकदम ओसाड. दादांनी जोमाने त्या शेतीत वृक्ष, फुले व फळझाडांची जोपासना केली. लिचीसारखी दुर्मिळ झाडे आसाममधून आणून जगवली. 'बारी' ही वृक्षवेलींनी फुललेली आहे. यामधूनच त्यांचं झाडांबद्दलचं प्रेम दिसून येतं. कोवाडसारख्या गावात समाजऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न केला. गावात लाईट, टेलिफोन, रस्ते, जॅकवेलची सोय केली. गावकऱ्यांसाठी नि:स्वार्थीपणे कामे केली. आपलं गाव, वाडा, शेती, शेतकरी, प्राणी, पक्षी यातच ते रमले होते.

दादा आध्यात्मिक मनोवृत्तीचे होते. परमेश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा

होती. आमच्या वाड्यात श्रीकृष्णाचं सुंदर मंदिर आहे. तिन्हिसांजेला दादा, काका व गावातील ठरावीक लोक भजन-कीर्तन करीत. दादांचा गळा उत्तम म्हणून ते सुंदर भावगीतं, भजनं म्हणत व शेतकऱ्यांना मंत्रमुग्ध करत. आमच्या वाड्यात अनेक जातिधर्मांची गडीमाणसे समान भावनेने राहत. आम्ही सर्वजण त्यांच्या मुलांबरोबर स्वयंपाकघरात बसून एकत्र जेवत असू व खेळत असू. दादा त्यांच्या मुलांचं शिक्षण, कपडेलत्ते पण पाहत. दादांनी कधीच गर्व, द्वेष, मत्सर, हेवेदावे केले नाहीत. ते कधीच कुणाला कटू बोलले नाहीत. दादांना कुणीही हिणवून बोललं तर ते म्हणत निंदक शेजारी असावा. चिखलात दगड टाकला तर चिखल आपल्याच अंगावर उडतो. ते कधीही प्रत्युत्तर देत नसत.

वास्तविक, दादांनी लेखक व्हावं असं वातावरण त्यांच्या आजूबाजूला नव्हतं. तरीही ते लेखक झाले. दादांची लिहिण्याची ठरावीक वेळ नसायची; पण शेतातून आल्यावर संध्याकाळी दादा जमिनीवर बसून, समोर चौरंग ठेवून एका छोट्याशा कंदिलाच्या उजेडात तपस्व्यासारखे एकाग्र होऊन लिखाण करत. कंदिलाच्या मिणमणत्या उजेडामध्ये 'स्वामी'सारखी तेजोमय कादंबरी त्यांनी लिहिली.

दादांची पहिली कथा 'महाद्वार' छापली गेली नाही; पण ते निराश झाले नाहीत. त्यांनी ती पुन्हा लिहून काढली आणि प्रसाद मासिकाकडे पाठवली. तिथे त्यांना यश मिळालं आणि ती कथा राज्यपातळीवर बक्षीसपात्र ठरली. त्यांच्या पहिल्याच लिखाणाला असं यश मिळालं. दादांचा मित्रपरिवार जसा विविध थरांतला होता तसाच त्यांचा वाचकही विभिन्न प्रकारचा होता. आमच्या वाड्यात महाराष्ट्रातील अनेक दिग्गज कलाकार, गायक, कलावंत, लेखक येऊन आनंदाने राहत. वि.स. खांडेकर हे तर दादांचे गुरूच होते. त्यांनी दादांवर पुत्रवत प्रेम केलं. कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे, किशोरी आमोणकर, लता मंगेशकर, भीमसेन जोशी अशी गायक मंडळी कोवाडला येऊन मैफली रंगवत. दादांच्या दिलदार वृत्तीमुळे कोवाडचा वाडा नेहमी नामवंत व्यक्तींनी गजबजलेला असायचा.

'बारी' ही पहिली कादंबरी वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी लिहिली व त्यानंतर दादा झपाटल्यासारखे लिहीत गेले. 'स्वामी' व 'श्रीमान योगी' कादंबऱ्यांनी या काळात एक नवं पर्व निर्माण केलं. मनुष्याचं मन जेव्हा अस्वस्थ होतं त्यावेळी यातील कुठलंही पान उघडून वाचलं तरी मनाला

स्वास्थ्य व शांती मिळते. दादांना मी जेव्हा विचारत असे, ''दादा, तुम्हाला एवढं अफाट लिखाण कसं सुचतं?'' दादा म्हणायचे, ''मधू, ही परमेश्वराचीच देणगी आहे. मी निमित्तमात्र आहे. त्यासाठी मला भरपूर वाचन व अपार कष्ट घ्यावे लागतात. सहजासहजी कोणतीही गोष्ट घडत नाही.''


'राधेय' हा त्यांच्या स्वत:च्या मनातला कर्ण. राधेय वाचलं की कर्णाबद्दल अपार सहानुभूती वाटते आणि मन अस्वस्थ होतं. सूर्यपुत्र असूनही नियतीच्या फेऱ्यात तो अडकला. तरीही दातृत्वाने व कर्तृत्वाने 'राधेय' म्हणून श्रेष्ठ ठरला. 'शेकरा' ही दादांची शेवटची कथा. ज्यामध्ये प्राणी व मनुष्यजीवनामधील समान गुणधर्म रेखाटले आहेत. दादांच्या निधनाला काही वर्षं लोटल्यानंतर त्यांच्या असंख्य आठवणींमधून काही आठवणींना मी उजाळा दिला आहे.

**- मधुमती शिंदे,**

('महाराष्ट्र टाइम्स'मधून साभार)

◆

**एक पुस्तकमय जीवन**



कुमठाशेठ म्हणजे बॉम्बे बुक डेपो असं एक अलिखित समीकरण मराठी प्रकाशकांच्या आणि पुस्तकप्रेमींच्या मनात पक्क रुजलेलं होतं. बॉम्बे बुक डेपो बंद झाला त्याला जवळजवळ दोन दशकं झाली आहेत. त्यामुळे त्यानंतर जे पुस्तकांच्या प्रेमात पडले किंवा ग्रंथव्यावसायिक झाले त्यांना हे समीकरण उलगडणं किंवा मराठी पुस्तकांच्या जगातील कुमठांचं आगळेपण लक्षात येणं कठीण आहे. अशा साऱ्यांसाठी इतकंच सांगतो, की ग्रंथग्राहकाला योग्य ते किंवा हवं असलेलं मराठी पुस्तक हमखास मिळण्याचं ठिकाण आणि साऱ्या मराठी प्रकाशकांसाठी मुंबईतील विश्वासार्ह वितरण व्यवहाराचा मार्ग होता बॉम्बे बुक डेपो. आणि बॉम्बे बुक डेपोचं मानवी रूप म्हणजे कुमठाशेठ.

मराठी ग्रंथजगात असं अनन्यसाधारण स्थान असलेल्या बॉम्बे बुक डेपोचे सर्वेसर्वा असलेल्या कुमठाशेठची मातृभाषा होती कोकणी. शिक्षणाच्या भाषा होत्या कन्नड व इंग्रजी. कर्नाटकात कन्नड व इंग्रजी घेऊन बी.ए. झाल्यावर इंग्रजीत एम.ए. करायला मुंबईला येईपर्यंत त्यांचा मराठीशी संबंध होता तो जुजबी बोलण्यापुरताच! एक मात्र होतं, कुमठा मूलत:च

वाचनवेडे होते. इंग्रजी साहित्य भरपूर वाचलं होतं, वाचत होते. इंग्रजीतून थोडीफार कविताही लिहीत असत; पण मराठी ग्रंथव्यवहार, मराठी ग्रंथ आणि मराठी साहित्य त्यांना अपरिचित होतं, ही गोष्ट त्यांच्या नंतरच्या मराठी ग्रंथव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर विचित्र वाटते. तशीच त्यांच्या अत्यंत ऋजू आणि काहीशा भिडस्त वाटणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी विसंगत वाटणारी गोष्ट म्हणजे मुंबईत आल्यावर सुरवातीला काही दिवस, त्यांनी सी.आय.डी. खात्यात केलेली नोकरी. त्यांच्या सुदैवाने याच सुमारास 'पॉप्युलर बुक डेपो' या ख्यातनाम पुस्तकांच्या दुकानाचे संस्थापक गणपतराव भटकळ यांच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला. आज पॉप्युलर बुक डेपो बंद होऊनही चार तरी दशकं उलटून गेली आहेत. त्यामुळे हेही सांगणं आवश्यक आहे, की तो बुक डेपो म्हणजे ख्यातनाम पॉप्युलर ग्रंथ उद्योग समूहाची आद्य संस्था. गणपतरावांनी आपल्या जावयालाही ग्रंथव्यवहाराची दीक्षा दिली.

काही वर्षं पॉप्युलर बुक डेपोत उमेदवारी करून ग्रंथ व्यवसायाची व्यावहारिक माहिती त्यांना झाली होती आणि एव्हाना मराठीशीही त्यांचा बऱ्यापैकी परिचय झाला होता. बहुधा गणपतरावांच्या मते आता स्वतंत्र जबाबदारी घेण्याइतके कुमठा तयार झाले होते. म्हणूनच १९४८ मध्ये त्यांनी गिरगावातला बॉम्बे बुक डेपो विकत घेतला आणि त्याची जबाबदारी पूर्णपणे कुमठांवर सोपवली. पॉप्युलर आणि बॉम्बे हे दोन्ही बुक डेपो एकमेकांपासून जेमतेम दहा मिनिटांच्या अंतरावर. दोन्ही दुकानांच्या व्यवहाराचं स्वरूपही बरंचसं सारखंच. दोन्ही दुकानांत इंग्रजी व मराठी पुस्तकं विक्रीला असत. त्यातला पॉप्युलर हा देशभर एक परिपूर्ण ग्रंथविक्री केंद्र अशी ख्याती असलेला बुक डेपो. अशा संस्थेशी स्पर्धा करून स्वत:चं स्वतंत्र स्थान निर्माण करणं कठीण होतं. कुमठांनी काय करता येईल याचा जरा विचार केला. त्यावेळी बॉम्बे बुक डेपोच्या आजूबाजूला सर्व वातावरण अगदी मराठीमय होतं. गिरगाव हा बोलूनचालून मराठी माणसांचा बालेकिल्ला होता. बॉम्बे बुक डेपोत येणारं गिऱ्हाईकही मुख्यत: मराठी बोलणारंच. फोर्टमध्ये तारापोरवाला, न्यू बुक कंपनी अशी अनेक फक्त इंग्रजी पुस्तकं विकणारी दुकानं होती. पॉप्युलरमध्ये मराठी वगैरे पुस्तकं मिळत असली तरी इंग्रजीतील ललित, सामाजिक शास्त्रे, शास्त्रीय, वैद्यकीय अशी सर्व प्रकारची पुस्तकं मिळत असल्यामुळे इंग्रजी ग्रंथ ग्राहकांचा राबता त्यांच्याकडे मोठा असे. पॉप्युलरमध्ये ज्याप्रमाणे सर्व प्रकारची इंग्रजी पुस्तकं मिळू शकतात, त्याप्रमाणे मराठीतील सर्व प्रकारची, सर्व प्रकाशकांची

## गोष्टी देशोदेशीच्या – चारुता पुराणिक


**हस्तिदंती छडी**
आणि
**गोष्टी देशोदेशीच्या**





**लैलाचा दिवा**
आणि
**गोष्टी देशोदेशीच्या**

**सूर्याची चोरी**
आणि
**गोष्टी देशोदेशीच्या**



३ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत १९०/- रु. | पोस्टेज ५०/- रु.

पुस्तकं मिळू शकतील, असं पुस्तकांचं दुकान गिरगावात नाही. अशा एखाद्या दुकानाची आवश्यकता आहे, हे कुमठांनी हेरलं. अडचण होती ती त्यांना स्वत:ला मराठी साहित्याचा पुरेसा परिचय नाही याची. त्यांच्या सुदैवाने बॉम्बे बुक डेपोतील आधीपासूनच्या नोकरवर्गात झांट्ये व राईलकर असे दोघे मराठी पुस्तकांची माहिती असलेले होते. त्यांच्या माहितगारीचा उपयोग करून घेऊन कुमठांनी त्यांच्या सर्वसंग्राहक मराठी ग्रंथविक्री केंद्राच्या कल्पनेला आकार द्यायला सुरवात केली. त्याचबरोबर स्वत:ची मराठी साहित्याशी ओळख वाढवायला सुरुवात केली. हळूहळू त्यांच्या कल्पनेला चांगलं रूप येऊ लागलं. तीन-चार वर्षांत बॉम्बे बुक डेपोतल्या पुस्तकांच्या मांडण्यांवर नागपूरच्या, पुण्याच्या, खुद्द मुंबईच्या विविध प्रकाशनांची पुस्तकं नियमित दिसायला लागली. बॉम्बे बुक डेपो 'मराठी पुस्तकांचं माहेरघर' म्हणून ओळखला जाऊ लागला.

साहजिकच मराठी पुस्तकांसाठी ग्राहकांची पावले बॉम्बे बुक डेपोकडे वळू लागली. या वाचक -ग्राहकांत अनेक लेखक मान्यवर, त्याचप्रमाणे नवोदितही असत. गंगाधर गाडगीळ, दुर्गा भागवत, श्री.रा. टिकेकर यांच्यासारखे साहित्यिक बॉम्बे बुक डेपोत दिसू लागले. बुक डेपोची जागा चांगली प्रशस्त असल्यामुळे, हळूहळू बुक डेपो अनौपचारिक साहित्यिक गप्पांचं आणि नकळतपणे काही वेळा चर्चांचं ठिकाण होऊ लागलं. बुक डेपोचं हे विकसित होणारं रूप कुमठांना सुखावत होतं आणि त्यांना अनेक नवीन कल्पना खुणावत होत्या.

एक अगदी साधी कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली, ती म्हणजे मराठीत वर्षभरात प्रकाशित झालेल्या पुस्तकांची विषयवार यादी करून ती सर्वांना पाठविणे. या कल्पनेला मी 'साधी' असं म्हणालो; पण प्रत्यक्षात हे काम अतिशय किचकट आणि कष्टाचं; परंतु या सुमारास म्हणजे १९५०च्या आसपास महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अनेक नवी महाविद्यालयं आणि ग्रंथालयं उभी राहत होती. त्यांना त्यांच्या ग्रंथालयासाठी पुस्तकं निवडायला या यादीचा फार उपयोग होत होता. प्रत्येक प्रकाशकाच्या सूचीत त्याची स्वत:चीच पुस्तकं असतात. ग्रंथ निवडीसाठी बॉम्बे बुक डेपोची सर्वसमावेशक यादी अत्यंत सोयीची होती. यामुळे बॉम्बे बुक डेपोची उलाढाल वाढत होती. याचा फायदा बॉम्बे बुक डेपोकडे विक्रीसाठी पुस्तकं ठेवणाऱ्या प्रकाशकांना होत होता. इथे हेही नमूद केलं पाहिजे, की सुरवातीपासूनच व्यवहार अत्यंत काटेकोर राखण्यावर कुमठांचा कटाक्ष

होता. त्यामुळेच प्रकाशकांना त्यांच्याशी व्यवहार करताना निश्चिंत वाटत असे. एक प्रकारे हे प्रकाशकांच्या प्रयोगांना प्रोत्साहन होतं. या यादीच्या कामालाच पुढे अधिक साहित्यिक अशा 'पुस्तक पंढरी' या नियतकालिकाचं स्वरूप आलं.

पुस्तकांकडे लोक आकर्षित व्हावेत, पुस्तकं अधिकाधिक लोकांच्या नजरेला पडावीत यासाठीही त्यांनी सातत्याने अनेक प्रयत्न आणि प्रयोग केले. ग्रंथप्रसाराच्या आज नित्यनैमित्तिक वाटणाऱ्या अनेक कार्यक्रमांचे पहिलेवहिले प्रयोग कुमठांनी केले. बालसाहित्य जत्रा, उत्कृष्ट बालवाङ्मय स्पर्धा, लेखक आपल्या भेटीला, लेखकांच्या स्वाक्षऱ्यांचे कार्यक्रम, विषयवार ग्रंथ प्रदर्शने असे अनेक नवेनवे उपक्रम कुमठा, ते बॉम्बे बुक डेपोतून निवृत्त होईपर्यंत राबवत होते.

प्रत्यक्ष ग्रंथव्यवहारातून निवृत्त झाल्यावरही ते ग्रंथापासून व ग्रंथ व्यवसायापासून मनाने कधीच दूर गेले नाहीत. ग्रंथविषयक कार्यक्रमाला आमंत्रण दिलं की असा कार्यक्रम ते सहसा चुकवत नसत. अगदी अलीकडे तीन-चार महिन्यांपूर्वी, नोव्हेंबरमध्ये झालेल्या राजहंस प्रकाशनाच्या सोहळ्याला ते मुंबईहून आले होते. अगदी अलीकडेपर्यंत ग्रंथ व्यवसाय विषयक काम हे आपलंच काम, असं ते मानत होते. मराठी ग्रंथ प्रकाशनांच्या दोनशे वर्षांच्या इतिहासावर काम करत असताना बुऱ्हानपूरवाला नावाच्या सिनेमागीतांच्या पुस्तिका प्रकाशित करणाऱ्या, एका प्रकाशकाची मला माहिती मिळत नव्हती. सुमारे ८७ वर्षांच्या कुमठांना मी विनंती केली आणि भायखळ्याला जाऊन त्यांनी माहिती काढून आणून मला कळवली. ते जातिवंत वाचक होते. आणि शेवटपर्यंत ते वाचक होते. त्यांच्या ९६व्या वाढदिवसाच्या दिवशी मी त्यांना निरंजन घाट्यांचं, त्यावेळी नुकतंच प्रसिद्ध झालेलं 'वाचत सुटलो त्याची गोष्ट' हे पुस्तक भेट दिलं. तिसऱ्या दिवशी त्यांचा फोन आला, ''काय अफलातून पुस्तक आहे हो! घाट्यांचा फोन नंबर द्या. त्यांना सांगतो, पुस्तक सुंदर आहे. मला फार आवडलंय.''

असा हा पुस्तकमय जीवन जगलेला गृहस्थ २८ मार्च २०१९ रोजी पहाटे, झोपेतच, शांतपणे निजधामाला गेला. त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो, असं म्हणण्याचं कारणच नाही; कारण अशा ऋजू आणि सत्शील माणसाला केवळ सद्गतीच मिळू शकते.

**- शरद गोगटे**

sharad_gogate@hotmail.com

# पुरस्कार



## मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकाला 'सौ. कमलाबाई रसिकलाल धारिवाल' पुरस्कार प्रदान



पुणे : दिनमार्क पब्लिकेशन्सतर्फे दर वर्षी छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेचं आयोजन करण्यात येतं. त्या स्पर्धेत मेहता मराठी ग्रंथजगतच्या २०१८ च्या दिवाळी अंकास 'दखलपात्र दिवाळी अंक निर्मिती'चा प्रथम क्रमांकाचा 'सौ. कमलाबाई रसिकलाल धारिवाल' पुरस्कार प्राप्त झाला. नुकत्याच झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ लेखक प्रवीण दवणे, ज्येष्ठ साहित्यिक आणि या स्पर्धेचे परीक्षक भारत सासणे, या स्पर्धेचे प्रायोजक सीएमडी इन्फ्लक्स ग्रुपचे शिवाजीराव चमकिरे यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. २०१८ चा मेहता मराठी ग्रंथजगतचा दिवाळी अंक 'पत्र' विशेष होता. या वर्षी या स्पर्धेचं हे तिसरं वर्ष होतं. दिनमार्क पब्लिकेशन्सचे दिनकर शिलेदार यांनी प्रास्ताविक केलं. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं.

## निरंजन घाटे यांना 'साहित्यसेवा कृतज्ञता पुरस्कार'




पुणे : ज्येष्ठ विज्ञानलेखक निरंजन घाटे यांना अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे 'साहित्यसेवा कृतज्ञता पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या विद्यमान अध्यक्ष डॉ. अरुणा ढेरे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. या वेळी अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे, उपाध्यक्ष शशिकला उपाध्ये आदी उपस्थित होते. मेहता पब्लिशिंग हाऊसने आतापर्यंत घाटे यांची सतरा पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

◆


## बिरबल मालिका भाग - १

अकबर बादशहाच्या दरबारातील अनमोल रत्न! आपल्या हुशारीने, हजरजबाबीपणाने उत्कृष्ट न्यायनिवाडा करणारा. विनोदी स्वभावाने अकबराच्या आयुष्यात आनंद फुलवणारा. कोणालाही जे सुचणार नाही ते पटकन् लक्षात येणारा. अशा या चतुर बिरबलाच्या सर्वांनाच आवडणाऱ्या गोष्टी.


**बुद्धिमान बिरबल**





**चतुर बिरबल**




**लाजवाब बिरबल**




**विनोदवीर बिरबल**




**निर्मल सारडा**

**४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत रु. २८०/-**

**पोस्टेज रु. ५०/-**

# उपक्रम

*मेहता पब्लिशिंग हाऊस नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असते. अशाच उपक्रमांचा एक भाग म्हणून मेहता पब्लिशिंग हाऊस यांच्या वतीने 'बालक-पालक आणि बालसाहित्य', 'विज्ञानाच्या गमतीजमती' आणि पुस्तक दिनाच्या निमित्ताने 'भाषा संवादिनी' या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमांचा हा वृत्तान्त...*

## बालविशेष कार्यक्रम

गोष्टीची पुस्तकं आणि लहान मुलं हे अगदी घट्ट नात असतं. परीक्षा संपली की मुलांना उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागतात आणि या सुट्ट्यांमध्ये विविध उपक्रम सुरू होतात. याच काळात अनेक पालक आपल्या मुलांना गोष्टीची पुस्तके वाचायला देतात किंवा एखादी पुस्तकांची लायब्ररी लावून देतात. जास्तीत जास्त  मुलांनी बालसाहित्य वाचावं या उद्देशातून मुलं आणि पालक यांच्याकरिता मेहता पब्लिशिंग हाऊस आणि जस्ट बुक्स लायब्ररी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन बालविशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध बालसाहित्यिक राजीव तांबे यांच्यासह



‘बालक-पालक आणि बालसाहित्य’ या विषयावर, तर १३ एप्रिल रोजी ‘विज्ञानाच्या गमतीजमती’ या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला.

जस्ट बुक्स लायब्ररी, सहकारनगर येथे झालेल्या ‘बालक पालक आणि बालसाहित्य’ या विषयावरील कार्यक्रमात बालसाहित्यिक राजीव तांबे यांनी उपस्थित मुलांना विविध गोष्टी सांगितल्या. मुलांबरोबरच तांबे यांनी पालकांशीही संवाद साधला. लहान मुलांना पुस्तकांची गोडी कशी लावावी, त्यांना कुठली पुस्तके वाचायला द्यावी. पालक आणि मुलं यांच्यामध्ये हे बालसाहित्य कशा प्रकारे दुवा साधतं, या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं. राजीव तांबे यांच्या कथाकथनामध्ये सर्व मुले दंग झाली होती.

१३ एप्रिल रोजी झालेल्या ‘विज्ञानाच्या गमतीजमती’ हा कार्यक्रम मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुलांनी विज्ञानाच्या जगातील अनेक गोष्टी अनुभवल्या. हवामानाचा परिणाम, सागरी लाटा याबद्दल माहिती घेतली, तर विविध प्रकारचे गणिती खेळ खेळले. ‘जस्ट बुक्स’ आणि ‘बीइंग जिज्ञासू’ या टीमने मुलांबरोबर खेळ खेळत गप्पा मारल्या. त्यामुळे मुलांनाही त्या कार्यक्रमात मजा आली.

बालकांसाठी आयोजित ‘बालसाहित्य’ आणि ‘विज्ञानाच्या गमतीजमती’ या दोन्ही कार्यक्रमांत मुलांसह पालकांनीही उत्साहाने भाग घेतला.

## ‘भाषा संवादिनी’ कार्यक्रम

या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून ज्येष्ठ लेखक श्याम भुर्के’ यांना आमंत्रित करण्यात आलं होतं. तसेच भाषेवर चर्चा करण्यासाठी मॉरिशसच्या मूळ रहिवासी असलेल्या आणि भारतात शिक्षणासाठी आलेल्या पाच विद्यार्थिनींना आमंत्रित करण्यात आलं होतं. या मुली फर्ग्युसन महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आहेत.

श्याम भुर्के यांनी ग्रंथांची सुरवात कुठून झाली, पूर्वी लिखाण कशा स्वरूपात केले जायचे याबद्दल माहिती दिली. पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांवरील किस्से त्यांनी सांगितले. भुर्के यांची बरीच पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित करण्यात आलेली आहेत. भुर्के यांच्या भाषणानंतर त्यांनी मॉरिशसच्या मुलींशी संवाद साधला. उपस्थित विद्यार्थिनींपैकी काहीजणी मराठी भाषेचं तर काही इंग्लिश, हिंदी भाषेचं



शिक्षण घेणाऱ्या होत्या.

मराठी शाखेची अनसूया बाबाजी  आपले अनुभव सांगताना म्हणाली, ‘भारतात राहायला आल्यावर आम्हाला अतिशय चांगले अनुभव आले. इत आम्हाला शिकवणाऱ्या शिक्षकांनी, शेजाऱ्यांनी आणि मित्रांनी आम्हाला सांभाळून घेतलं. आमच्या आई-बाबांची इच्छा होती, की आम्ही भारतात जाऊन मराठी भाषेचं शिक्षण घ्यावं. यामुळे माझीही मराठीबद्दलची ओढ वाढली आणि येथे मराठी शिकण्यासाठी येण्याचा मी निर्णय घेतला. मॉरिशसला छोटा भारत असेही म्हणतात; कारण येथील सर्व सण आणि संस्कृती भारतासारखी आहे. आम्ही मॉरिशसला दिवाळी, होळी, गणेश चतुर्थी हे सर्व सण साजरे करतो. म्हणूनच भारत आणि पुण्याशी माझं नेहमीच नातं राहील,’ असंही तिने सांगितलं.

काशी बेंगाली ही इंग्रजी घेऊन बी.ए. करत असलेली विद्यार्थिनी म्हणाली, ‘पुण्यात आल्यानंतर माझ्यात खूप बदल झाला. मी आधी खूप शांत आणि लाजरी होते; परंतु पुण्यात आल्यानंतर मात्र मी बोलकी झाले, खुलले. त्यामुळे पुणे हे माझ्याकरता दुसरे घरच आहे. पुण्यात आल्यानंतर मला मराठी संस्कृतीबद्दल बरेच काही कळले. आणि जेव्हा मी मॉरिशसला परत जाईन तेव्हा माझी भारताबद्दलची ओढ कायम असेल आणि मला पुन्हा एकदा येथे  यायला आवडेल.’

या वार्तालापानंतर उपस्थित प्रेक्षकांनीही या विद्यार्थिनींशी आणि श्याम भुर्के यांच्याशी संवाद साधला. या कार्यक्रमाला अंतर्नाद कला अकादमी, तसेच जस्ट बुक्स लायब्ररी, सहकारनगर यांचे सहकार्य लाभले. ‘भाषा’ ही माणसांना जोडून ठेवते आणि पुस्तकं या भाषेच्या नातेसंबंधांचं माध्यम असतात, या संकल्पनेतून आयोजित ‘भाषा संवादिनी’ हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

◆

## चित्रमय रंगतदार कथा - १

### सिंड्रेला आणि इतर कथा : उमा खरे


**किंमत ३०/- रु. । पोस्टेज अतिरिक्त**



जुन्या काळी अनेक ज्ञानी लोकांनी उपदेश करताना गोष्टींचा आधार घेतला आहे. या गोष्टींचा उद्देश माणसाला शहाणे करणे हाच होता. विशेषत: लहान मुलांना गोष्टी सांगताना माणसातल्या गुण-दोषांवर पशु-पक्षी, जादू यांच्याद्वारे प्रकाश टाकला आहे. त्याच कथा नव्या रंगरूपात या पुस्तकात पहायला मिळतील.

---

### बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी




### गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी



**उज्ज्वला केळकर**

**किंमत प्रत्येकी ५०/- रु. । पोस्टेज अतिरिक्त**

पक्षी मस्त गप्पा मारतात.पऱ्या सारख्या उडत राहतात. प्राणी तर समुद्र सफरीवर जातात. फुलं चक्क रुसून बसतात. गातात, नाचतात, मजा करतात. भांडून, खेळून दमून झोपतात. या अजब दुनियेच्या चला वाचू... धम्माल गोष्टी

# ग्रंथव्यवहार

## ई-बुक्स : वस्तुस्थिती आणि भविष्य

*सहज होणारे वाचन आणि जाणीवपूर्वक केले जाणारे वाचन, असे वाचनाचे दोन प्रमुख प्रकार मानले तर सहज होणारे वाचन हे एकेकाळी केवळ वृत्तपत्र वाचनापुरते मर्यादित होते, ते आता मोबाईल, इंटरनेटमुळे सोशल मीडियाकडे वळलेले आहे. जाणीवपूर्वक केले जाणारे वाचन, म्हणजे पुस्तकांचे, ग्रंथांचे वाचन करणारांची संख्या तुलनेने कायमच कमी होती आणि आहे; तरीही मराठीतला ग्रंथव्यवहार आज करोडो रुपयांचा आहे, शेकडो प्रकाशक आहेत आणि हजारो लेखक आहेत. सहज केल्या जाणाऱ्या वाचनाच्या स्वरूपात इंटरनेटमुळे जो क्रांतिकारी बदल गेल्या दशकभरात झालेला आहे, तसाच तो पुढील दशकात पुस्तक व्यवहारातही होऊ घातलेला आहे. म्हणूनच आजचा आणि आगामी काळातला पुस्तक व्यवहार, ई-बुक्स, भविष्यात पुस्तकांच्या बदलणार असलेल्या संकल्पना याविषयी ऊहापोह करायचा आहे.*

दर्जेदार किंवा कोणीतरी निवडून दिलेले, काहीएक कसोटी लावून वाचकांपुढे ठेवलेले साहित्य हे सहज प्राप्त होत नाही. त्यासाठी श्रम, वेळ आणि पैसाही खर्च करावा लागतो. असे साहित्य वाचकांना देताना नफ्याचा नव्हे, परंतु किमान त्याचे मोल वाचकांना कळावे असा विचार करून मी 'बहुविध.कॉम' हे मराठी साहित्यविषयक सशुल्क पोर्टल सुरू केले आणि त्या निमित्ताने मी ई-माध्यमाशी जोडला गेलो, त्याचा अभ्यास करू लागलो. त्यातून गेल्या दोन- अडीच वर्षांत वाचनाच्या सवयी, आवड-निवड आणि साहित्याच्या विविध प्रवाहांमध्ये झालेले बदल मला टिपता आले. या क्षेत्राचा सखोल अभ्यास करता आला. त्यातूनच ई-साहित्याविषयीची ही निरीक्षणे मी इथे मांडत आहे. माझ्या किंवा माझ्या आधीच्या पिढीचं 'कंडिशनिंगच' असं झालंय की आपल्याला छापील पुस्तक (हार्ड कॉपी) वाचायला अधिक

आवडतं. पुस्तक/अंक आणि मोबाईल/tab/कॉम्प्युटर असे पर्याय समोर ठेवले, तर आपला हात पट्‌कन पुस्तकच उचलेल; परंतु आताच्या आणि पुढे येणाऱ्या पिढ्यांचं तसं नाहीये, नसणारे. त्यांच्यासमोर पुस्तक आणि मोबाईल असे पर्याय ठेवले, तर त्यांचा हात पट्‌कन मोबाईलकडेच जाईल आणि त्यामुळेच या 'ई' क्षेत्राची माहिती असणं, त्याच्या भविष्याचा विचार करणं हे मराठी भाषेसाठी, ग्रंथव्यवहारासाठी अत्यावश्यक होऊन बसलं आहे. आपण कितीही नाकारलं तरी पुढील काही वर्षांत ई-बुक्सचा पसारा मराठीतही वाढत जाणार आहे, तेव्हा जाणते वाचक म्हणून काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. ई-बुक म्हणजे नेमके काय, ई-बुक्सचे व्यावसायिक स्वरूप काय असेल, असावे याचा विचार आपण केला पहिजे. निःशुल्क साहित्याची निर्मिती, त्याचे वितरण आणि त्याचा व्यावसायिक साहित्यनिर्मितीवर होऊ शकणारा परिणामही पाहिला पाहिजे. हे सगळे सांगताना ई-बुकचे निरनिराळे फॉरमॅट्स काय? ई-रीडर्सचे प्रकार काय वगैरे तांत्रिक विषय याबाबतची क्लिष्टता टाळण्यासाठी सध्या बाजूला ठेवू या.

**छापील पुस्तक ते ई-पुस्तक**

ई-बुक अथवा ई-पुस्तक म्हणजे नेमके काय? तर, 'जे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून वाचता येते ते ई-बुक अथवा ई-पुस्तक.' वाचक, लेखक, प्रकाशक आणि वितरक अशा तिघांच्याही दृष्टीने खूप सोयीचे असे हे तंत्रज्ञान आहे. छापील पुस्तकांचा व्यवहार आपण पाहत आलो आहोत, त्यात पुस्तकाच्या किती प्रती काढायच्या, मुद्रणासाठी उत्तम प्रेस कोणता वगैरे प्रश्न महत्त्वाचे असतात. पुस्तकांच्या प्रती वितरकांमार्फत वाचकांपर्यंत पोचवणे, न खपलेल्या प्रती परत मागवणे, शिल्लक प्रतींचा साठा करणे हासुद्धा मोठा पसारा असतो. ई-बुकच्या व्यवहारात हे सगळे कालबाह्य होऊन त्याचा ग्रंथनिर्मिती-विक्रीच्या अर्थकारणावर सकारात्मक परिणाम होणार आहे; कारण एकदा ई-बुक त्याच्या ठरलेल्या फॉरमॅटमध्ये तयार करून दिले की झाले. त्याचा जो काही खर्च असेल तो एकदाच. पुन्हा पुन्हा प्रती, आवृत्ती छापायचा खर्च नाही. त्यामुळे ई-बुक्सच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत आणि असतीलही. ई-बुक्स वाचणे, त्यांचा साठा करणेही खूपच सोपे आहे. जड पुस्तके उचलायला नकोत आणि वागवायलाही नकोत. मोबाईल किंवा ई-रीडर इतका हलका आणि सुटसुटीत असतो की

कुठेही घेऊन जाता येतो. प्रकाशकाला एखाद्या पुस्तकाच्या मजकुरात बदल करायचा असेल तर पूर्वी त्यासाठी सुधारित आवृत्ती काढण्याशिवाय पर्याय नव्हता. ई-आवृत्तीत मूळ मजकुरात बदल केला की सगळ्यांच्या उपकरणात तो आपोआप अपडेट होतो. लेखकांना आपल्या आशयाला अधिक उठाव देण्यासाठी मजकुरासोबत चित्रे वापरायची असतील, अगदी व्हिडिओ किंवा ऑडिओ वापरायचे असतील, तर त्यांची जोड देणेही ई-बुकमध्ये सहज शक्य आहे. ई-बुकने अशा प्रकारे सगळ्या गोष्टी शक्यतेच्या कोटीत आणून ठेवल्या आहेत आणि त्यासुद्धा अगदी कमी खर्चात. पुस्तकांच्या किमती, उपलब्धता आणि त्यांचा साठा करण्याच्या क्षमतेला असलेल्या मर्यादा अशा विविध कारणांमुळे 'ग्रंथालय' या संकल्पनेचा उदय झाला. जे छापील पुस्तकांना लागू ते ई-पुस्तकांनाही लागू आहेच. त्यामुळे 'किंडल अनलिमिटेड', 'oyster' यासारखी ई-ग्रंथालये सुरू झाली आहेत. मराठीत अजून अशी सोय नाही; परंतु वाचकांची गरज म्हटल्यावर भविष्यात तीही पूर्ण होईलच. पुणे मराठी ग्रंथालयाकडून ती गरज पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यांनी ई-बुक ग्रंथालयाच्या दिशेने पावले वळविली आहेत. त्यासाठी त्यांनी तीन हजार पुस्तकांचे डिजिटायझेशन सुरू केले आहे.

## मराठीतील ई-प्रयोग

काळाची पावले ओळखून स्वतःला reinvent करीत सर्वप्रथम 'ग्रंथाली'च्या दिनकर गांगल यांनी २००६ मध्ये 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' नावाचे पोर्टल सुरू केले. त्यानंतर आजवर अनेकांनी अनेक कल्पना लढवल्या. 'ग्रंथाली'ने हे तंत्रज्ञान अवलंबायचा दोनदा प्रयत्न केला. पहिल्यांदा विश्वकोशाचा पेन ड्राईव्ह विकण्याचा प्रयोग 'बुकगंगा' आणि 'महाराष्ट्र विश्वकोश मंडळा'बरोबर संयुक्तपणे केला. दुसरा प्रयत्न 'appueer ग्रंथाली'चा. दुर्दैवाने हे दोन्ही प्रयोग तितकेसे यशस्वी झाले नाहीत. पहिल्या प्रयोगात 'बुकगंगा'ने पेन ड्राइव्ह फुकटच वाटायला सुरुवात केली म्हटल्यावर विकत कोण घेणार, हा प्रश्न निर्माण झाला. 'appueer' ची तांत्रिक बाजू कमजोर ठरल्यामुळे गाडी फारशी पुढे सरकलीच नाही. तरीही पंधरा हजार रुपयांत एक tablet आणि त्यात 'ग्रंथाली'ची १०० ई-पुस्तकं असं हे जोडउत्पादन १०० जणांनी विकत घेतलं. पुढे मराठीतील सहा प्रकाशकांनी एकत्र येऊन 'ई मराठी रीडर' नावाचे app आणि

website सुरू केली. डोंबिवलीच्या साहित्य संमेलनात त्याची जोरदार सुरुवात केली. या प्रकाशकांचा स्वतःचा चाहता वर्ग मोठा आहे. त्यामुळे त्यांच्या या उपक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला; परंतु पुन्हा काही तांत्रिक अडचणी, समन्वयाचे आव्हान यामुळे या उपक्रमालाही खीळ बसली. या दोन्ही प्रमोटर्सना त्यांच्या त्यांच्या उपक्रमांना नवसंजीवनी देण्याची इच्छा आहे आणि ती तशी देता यावी म्हणून अनेकजण नजर लावून बसले आहेत; कारण हेच दोन उपक्रम आहेत, ज्यात 'इपब'च्या format मध्ये ई-बुक्स बनवून विकत आहेत. बाकी साईट्स आहेत ज्या एकतर सगळा कन्टेन्ट वाचकांना मोफत उपलब्ध करून देत आहेत किंवा पुस्तकांच्या पीडीएफ्स विकत आहेत. amazon वर सध्या मराठी पुस्तके उपलब्ध आहेत; परंतु ती फक्त किंडलच्या ई-रीडर्स- मध्ये किंवा किंडलच्या apps मध्येच वाचता येतात.

**छापीलची जादू**

तूर्तास आपला ग्रंथविक्रीचा व्यवसाय छापील पुस्तकांच्या बळावरच उभा आहे. उलट ज्यांना वाचण्याची आवड आणि सवड आहे त्या व्यक्ती ई पुस्तकांपेक्षा छापीललाच झुकते माप देत आहेत. आधीच्या वर्षाच्या तुलनेत २०१८ मध्ये ई-पुस्तकांची विक्री घटली आहे आणि प्रिंट तसेच ऑडिओ पुस्तकांची विक्री वाढली आहे, असे आकडे सांगतात आणि (संदर्भ : https://goodereader.com/blog/e-book-news/ebook-sales-continue-to-decline-in-first-three-months-of-2018) या आकड्यांनुसार एकूण विक्रीत छापील पुस्तकांचा वाटा ७० टक्के, ई-बुक्सचा २० टक्के आणि ऑडिओ बुक्सचा दहा टक्के आहे; मात्र ही स्थिती पुढील दशकभरात बदलत जाणार, असे जगभरातील ट्रेंड पाहता आपल्याला म्हणता येईल. प्रिंट पुस्तके दुकानातून आणि online अशा दोन्ही पद्धतीनी विकली जातात. त्यासाठी ॲमेझॉन, बुकगंगा यांसारख्या साईट्स आहेत. दुकानेही सध्या online विक्रीत उतरली आहेत. मराठीत अक्षरधारा, रसिक साहित्य, मॅजेस्टिक या दुकानांनी विक्रीसाठी स्वतंत्र साईट्स केल्या आहेत. 'डायमंड प्रकाशना'ने 'अक्षरनामा' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे आणि त्याच्या 'बुकनामा' या विभागातून प्रिंट पुस्तकांची दहत्व्हा विक्री सुरू केली आहे. बुकगंगावर पुस्तकांच्या pdf ही

विक्रीसाठी उपलब्ध आहेत; परंतु छापीलच्या जोडीला आता हे सर्व साहित्य ई-माध्यमातही उपलब्ध करून देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे; कारण पुढील काळात दोन्हीचा समांतर प्रवास चालणार आहे. जुने साहित्य म्हणजे जुनी पुस्तके आणि नियतकालिके ई माध्यमात रूपांतरित करण्याचे मोठ्ठे आव्हान आज प्रकाशकांसमोर आहे. एवढी सगळी पुस्तके पुन्हा टंकलिखित करून घ्यायची, त्याचे मुद्रितशोधन करायचे तर खर्च होणार. पुस्तकांची संख्या लक्षात घेता प्रत्येक प्रकाशकाला यावर २० ते ३० लाख रुपये गुंतवणे आवश्यक आहे. एवढे पैसे खर्च करून ई स्वरूपात त्यांचा खप होईल का, हा प्रश्न आहेच. या स्थितीत लेखक, प्रकाशक यांच्या समोरची आव्हाने काय आहेत?

## प्रकाशकांसमोरची आव्हाने

प्रकाशकांसाठी या व्यवसायात दोन घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. पहिला लेखक, म्हणजे साहित्याचा निर्माता. दुसरा वाचक, जो या साहित्याचा उपभोक्ता. दोन्ही घटकांना सामावून घेत, त्यांच्या गरजा समजून घेत प्रकाशकाला पुढे जायचे असते. प्रकाशकांच्या अस्तित्वाचा मूळ हेतू लेखकाला समाजासमोर आणणे हा असेल, तर त्यांनी या दोन्ही माध्यमांचा वापर करायला हवा. सध्या प्रकाशक छापील पुस्तके काढणे आणि ती दुकानांबरोबरच वेबसाइट्सवरही विक्रीसाठी उपलब्ध करून देणे यातच आपण 'प्रगत' असल्याचे समाधान करून घेतो. ई माध्यमातून साहित्यनिर्मिती आणि त्याचे वितरण करण्याच्या बाबतीत 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा अपवाद वगळता मराठी प्रकाशकांची पाटी जवळपास कोरी आहे. उत्पादनासोबतच वितरणावरही आपले नियंत्रण पाहिजे, याचे फार भान प्रकाशकांना दिसत नाही. प्रकाशक जर साहित्याचे प्रवाहक असतील तर आपल्या लेखकांना सर्व माध्यमांतून समाजासमोर आणण्याचे प्रयत्न त्यांनी केले पाहिजेत. याशिवाय प्रकाशकांना यापुढे वाचकांसाठी मध्यस्थाची (facilitator) जबाबदारीही स्वीकारावी लागणार आहे. त्यासाठी पूर्वी 'ग्रंथाली वाचक चळवळ' निर्माण झाली त्या धर्तीवर आता काहीतरी करणे आवश्यक आहे.

## संकल्पनेचा पुनर्विचार

तंत्रज्ञान क्रांतीमुळे खरेतर ‘बुक’ किंवा ‘पुस्तक’ या संकल्पनेचाच पुनर्विचार करण्याची वेळ येणार आहे किंवा आली आहे. पुस्तक म्हणजे अनेकदा काही लेखांचं, कथांचं संकलन असतं. येणाऱ्या काळात हे एकत्रीकरण अशा भौतिक पुस्तकाच्या माध्यमातून करण्याची गरज राहणार नाही. एकाच मोबाईलमध्ये किंवा ई रीडर (किंडल, कोबो इ.) मध्ये जर हे संकलन होत असेल, तर वेगळे पुस्तक काढण्याची गरज काय? छापील पुस्तकांच्या बाबतीतसुद्धा कदाचित असेच होईल. वाचकांची एका दमात मजकूर वाचण्याची क्षमता हजार दोन हजार शब्द एवढी झालेली आहे, म्हणजेच साधारण एका लघुलेखाचा ऐवज! whats app आणि फेसबुकवरसुद्धा सध्या याच आकाराचे लेख वाचले जातात. म्हणजे हळूहळू पुन्हा पूर्वीसारखाच नियतकालिकांचा ट्रेंड सुरू होईल का? १९१९-२० च्या नियतकालिकांमध्ये असे उल्लेख सापडतात, ज्यात पुस्तकाविषयी चिंता व्यक्त करताना म्हटले आहे, ‘एवढे मोठे पुस्तक घेऊन कोण वाचणार? शिवाय ते परवडेल का? आणि सगळे चांगले लेखक तर नियतकालिकांमध्ये लिहीत आहेत. मग पुस्तके वेगळी कोण लिहिणार?’ त्यावेळी आणि नंतरही अनेक वर्ष खरंच ही परिस्थिती होती की प्रथितयश लेखक आधी नियतकालिकात लिहायचे आणि मग त्या अनुभवांचे, लेखांचे किंवा कथांचे संग्रह पुस्तक म्हणून छापले जायचे. येणाऱ्या काळात पुन्हा असेच होण्याची पूर्ण शक्यता आहे. अर्थात मराठी नियतकालिकांनी त्यांची मरगळ झटकून या नवीन संधीचा, तांत्रिक सुविधांचा फायदा उचलायला हवा. छापील असो की ई असो. आशय-कन्टेन्ट महत्त्वाचा आहे आणि तो वाचकांपर्यंत पोचवण्याचा ‘व्यवसाय’ बदलत जाणार याची खूणगाठ बांधूनच पुढची वाटचाल केली पाहिजे.

**– किरण भिडे**

(‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ‘संवाद’ पुरवणीतून साभार)

◆

# श्रद्धांजली



## सुलभा कापडी

सुलभा कापडी यांचे नुकतेच निधन झाले. ज्ञानपीठ पुरस्कारविजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या त्या कन्या होत. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्स यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## डॉ. गो. मा. पवार

ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. गो. मा. पवार (वय ८६) यांचे



नुकतेच निधन झाले. डॉ. गोपाळराव मारुतीराव पवार हे मराठी साहित्याचे व्यासंगी समीक्षक होते. मराठी साहित्याच्या सेवेबरोबरच त्यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनकार्य व साहित्याच्या संदर्भात विशेष अभ्यास केला होता. मराठी समीक्षेमध्ये विनोदाची सैद्धान्तिक मीमांसा करणारे प्रा. गो. मा. पवार हे पहिले व एकमेव समीक्षक आहेत. १६ ग्रंथ त्यांच्या नावावर असून, त्यांनी ६० शोधनिबंध सादर केले. एम. फिल. आणि पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले. त्यांना साहित्य आकादमी पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आलं होतं. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्स यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

**फेसबुक प्रतिक्रिया**



**‘लेट्स किल गांधी’**

योग्य संदर्भासह अभ्यासपूर्ण मांडणी असलेले पुस्तक आहे.

\- महेंद्र पाटील

चित्रमय रंगतदार कथा भाग २ - ईशान पुणेकर



## गोष्टी पानोपानी

## गोष्टी कानोकानी






## गोष्टी मनोमनी


तुम्हांला आवडतात गोष्टी त्या आहेत पानोपानी
पुन्हा पुन्हा वाचायच्या साठवून ठेवायच्या मनोमनी
एकमेकांना सांगता सांगता होतील त्या कानोकानी...

**३ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत २००/-रु. ।**
**पोस्टेज ५०/-रु.**



# पर्याय शब्दकोश

समर्पक शब्दांची गरज पूर्ण करणारा, एकाच शब्दाच्या अर्थच्छटेचे विविध पर्याय वाक्प्रचार व म्हणींसह सांगणारा ‘पर्याय शब्दकोश’ वि. शं. ठकार यांनी सिद्ध केला आहे. एक मूळ शब्द, त्यासमोर त्याचे समानार्थी, तसेच, जवळच्या अर्थच्छटांचे शब्द व शब्दसमूह, आणि शक्य तेथे वाक्‌प्रचार व म्हणी, अशी या कोशाची सर्वसाधारण मांडणी आहे. इंग्रजीतून लिखाण करु इच्छिणाऱ्या मराठी भाषकांना, तसेच मराठीशी बेताचाच परिचय असणाऱ्या अथवा नव्याने मराठी शिकणाऱ्या, परंतु इंग्रजी जाणणाऱ्या, अभ्यासूंना उपयुक्त होण्याच्या दृष्टीने या कोशात मराठी शब्दांचे इंग्रजी पर्याय शब्दही दिले आहेत. मराठीचा इंग्रजीत अनुवाद करु इच्छिणाऱ्यांनाही हे शब्द साह्यकर होतील. एकूण, सगळ्यांसाठीच हा शब्दकोश उपयुक्त आणि संग्राह्य आहे.




**वि. शं. ठकार**

कुणाची भरभराट चालू असते, कुणाची घोडदौड चालू असते, तर कुणाची वाटचाल. कुणी मुसंडी मारतो, तर कुणी मागे वळून पाहत नाही. कुठे progress, कुठे advancement, तर कुठे march. प्रगतीचे विविध आविष्कार व्यक्त करणारे असे मराठी आणि इंग्रजी समर्पक शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी एकत्रितपणे समोर आले, म्हणजे त्यातून आपल्याला मनातल्या अर्थानुरूप नेमका पर्याय निवडता येतो. कित्येकदा विरुद्धार्थी पर्यायांची गरज भासते. आजच्या मराठीतल्या बहुसंख्य शब्दांसाठी असे विपुल समानार्थी आणि विरुद्धार्थी पर्याय या कोशात मिळतील.

('पर्याय शब्दकोश' पुस्तकामधून)

## अ

**अंक** (पु) आकडा; पूर्णांक, अपूर्णांक, व्यवहारी अपूर्णांक, दशांश अपूर्णांक; संख्या; शून्य, पूज्य; जोडी, दुक्कल, द्वय, युग्म, जुळे; त्रिकूट, त्रयी, त्रिपुटी, तिळे; चौकडी, चौकार, चतुष्टय; पंच, पंचक, पंचकडी, पाचुंदा, पाचोत्रा; षट्क, षट्कार; सप्तक, अष्टक; दशक; शतक, शेकडा, शंभरी; द्विशतक, इत्यादी; सहस्त्रक पाहा : दशांश स्थाने, खूण, मांडी, अध्याय, गणणे

**[वि]** एक, एकटा, एकमेव, पहिला, प्रथम, आद्य, आदिम, प्राथमिक; दोन, दो, दुसरा, द्वितीय, दुजा, दुय्यम, द्विविध; तीन, तिसरा, तृतीय, तिजा, तिय्यम, त्रिविध, त्रिधा; चार, चौथा, चतुर्थ, चतुर्विध, तुरीय; पाच, पाचवा, पंच, पंचम, पंचविध; सहा, सहावा, षष्ठ; सात, सातवा, सप्तम; आठ, आठवा, अष्टम; नऊ, नव, नववा, नवम, नवविध; दहा, दहावा, दशम; अकरा, अकरावा, एकादश, इत्यादी; शंभर, शत, शे; हजार, सहस्त्र; द्विसहस्त्र, दशसहस्त्र; लक्ष, लाख; कोटी, अब्ज, इत्यादी

**[वा]** भोपळा, ढम्म भोपळा, पैकीच्या पैकी (ह)

number, numeral, digit, integer, fraction, figure; zero, cipher, one, unity; two, duality, couple, duplicate; three, trinity, triplet, triad, trio, triplicate; four, tetrad, quartet, quadruplicate; five, pentad, qintet; six, sextet; seven, septet; eight, octet; nine, ennead; ten, decade; hundred, century; thousand, million, billion, trillion, etc; millenium पाहा : दशांश स्थाने, खूण, मांडी, अध्याय, गणणे

**[adj]** one, first, single, unique; two, second, double, dual, binary; three, third, triple, threefold; four, fourth, quadruple; five, fifth, quintuple; six, sixth, sextuple, etc.
[i] duck, love, hat trick, runner up

# ज्ञ

**ज्ञपित** (वि), **ज्ञप्त** (वि) पाहा : **जाहीर**

**ज्ञप्ती** (स्त्री) पाहा : **जाणीव**

**ज्ञात** (वि) पाहा : **माहीत, गोचर**

**ज्ञाता** (वि) पाहा : **तज्ज्ञ, ज्ञानी**

**ज्ञातिबांधव** (पु) पाहा : **भाऊ**

**ज्ञाती** (स्त्री) पाहा : **वर्ग**

**ज्ञातृत्व** (न) पाहा : **ज्ञान**

**ज्ञान** (न) समजूत, मनावरील संस्कार/ठसा, जाण, जाणीव, उमज, आकलन, अर्थबोध, उद्‌बोधन, मनोविषय, गम्य, अभिज्ञान; ज्ञानदिवा (-दीप); ब्रह्मज्ञान, ब्रह्मात्मैकज्ञान, आत्मज्ञान, आत्मबोध, आत्मप्रतीती, आत्मानुभव, स्वात्मानुभव, स्वरूपज्ञान, दिव्यज्ञान, शुद्ध ज्ञान, चित्, उन्मेष, प्रबोध, परिज्ञान, दैविक/ आध्यात्मिक/ विशुद्ध/ पूर्ण ज्ञान, संवित्ती, चरम ज्ञान, अंतिम सत्य, तेजतत्त्व, वेदान्त, अध्यात्मविद्या, ब्रह्मविद्या, परमार्थ, त्रिकालज्ञान, ज्ञानप्राप्ती, विद्या, विद्‌वत्ता, विद्याधन, पांडित्य, व्युत्पन्नत्व; तत्त्वज्ञान, तत्त्वविद्या, तत्त्वदर्शन; भौतिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान; स्वरज्ञान, रागज्ञान, इत्यादी; पाहा : अंतर्दृष्टी, माहिती, अध्यात्म, (विरु) अज्ञान

डवा.चार अक्षरे, रटफ, सरस्वतीचा दरबार, प्रकाश दिसणे, घरी पाणी भरणे, पुस्तकी विद्या

(ह) knowledge, cognition, awareness, consciousness, understanding, grasp, intuition, insight; expertise, know-how, education; learning, erudition, pedantry, scholasticism, divine knowledge; पाहा : **अंतर्दृष्टी, माहिती, शास्त्र, अनुभव, अध्यात्म,** (विरु) **अज्ञान**

**ज्ञानकोश** (पु) पाहा : **कोश**

**ज्ञानचक्षू** (पु) पाहा : **अंतर्दृष्टी**

**ज्ञानतपस्वी** (पु) पाहा : **ज्ञानी**

**ज्ञानतृष्णा** (स्त्री) पाहा : **जिज्ञासा**,

कुतूहल

**ज्ञानदाता** (पु) पाहा : **अध्यापक**

**ज्ञानदान** (न) पाहा : **शिक्षण**

**ज्ञानदिवा** (-दीप) (पु) पाहा : **ज्ञान**

**ज्ञानप्रसार** (पु) पाहा : **शिक्षण**

**ज्ञानप्राप्ती** (स्त्री) पाहा : **ज्ञान**

**ज्ञानमूलक** (वि) पाहा : **तात्त्विक**

**ज्ञानवंत** (-वान) (वि) पाहा : **ज्ञानी**

**ज्ञानसंपादन** (न) पाहा : **अध्ययन**

**ज्ञानार्थी** (पु) पाहा : **विद्यार्थी**

**ज्ञानी** (वि) **ज्ञानिया, ज्ञानवंत** (-वान), अभिज्ञ, विद्वान, विद्वांस, व्युत्पन्न, सारस्वत, अभ्यासक, विद्वत्तापूर्ण, विद्वत्ताप्रचुर, विद्वज्जड, विद्वज्जन, तज्ज्ञ, पंडित, उच्चविद्याविभूषित, बुद्धिमान, बृहस्पती, सुज्ञ, विद्यावंत (-वान, -संपन्न), जाणता, ज्ञाता, ज्ञानतपस्वी, पारंगत, अनुभवी, अनुभवसंपन्न, माहीतगार, परिणतप्रज्ञ, वेदान्ती, तत्त्वज्ञानी, तत्त्वज्ञ, दार्शनिक, क्रांतदर्शी, द्रष्टा, सर्वज्ञ, सर्ववेत्ता, त्रिकालज्ञ, त्रिकालज्ञानी, त्रिकालदर्शी, दीर्घदर्शी, पूर्णबोध, ब्रह्मज्ञ, ब्रह्मज्ञानी (-विद्, -वेत्ता), बुद्ध, अंतर्ज्ञानी, अंतदर्शी, अंतर्दृष्टी, मंत्रद्रष्टा, साक्षात्कारी; यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, इ. (पाहा : तज्ज्ञ); विदुषी (स्त्री) ; पाहा : पंडित (विरु) अजाण

**[adj]** erudite, learned, scholarly, enlightened, intellectual, aware, conscious, knowledgeable, cognizant, conversant, educated; experienced, familiar, well-informed; accomplished, wise, omniscient; पाहा : तज्ज्ञ, पंडित (विरु) अजाण

**ज्ञानेच्छा** (स्त्री) पाहा : **जिज्ञासा**

**ज्ञानेच्छू** (वि) पाहा : **जिज्ञासू**

**ज्ञानेंद्रिय** (न) डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा; ज्ञानेंद्रियपंचक;

(ह) organ receiving knowledge;

**ज्ञानोपासक** (वि, पु) पाहा : भक्त, चिंतनशील

**ज्ञानोपासना** (स्त्री) पाहा : **उपासना, अध्ययन**

**ज्ञापक** (वि) पाहा : **खूण, लाक्षणिक, गर्भित**

**ज्ञापन** (न) पाहा : **जाहिरात**

**ज्ञेय** (वि, न) जाणण्यायोग्य, ज्ञानाचा/जाणण्याचा विषय; पाहा : त्रिपुटी

[adj, n] fit to be known, that which is to be known; पाहा : त्रिपुटी


◆

ई-बुक स्वरूपात उपलब्ध


# चित्रमय रंगतदार कथा भाग ३

प्राणी, पक्षी, खेळणी आणि जादू हे विषय सगळ्याच मुलांना आवडतात. या पुस्तकात या सगळ्याच विषयांवरच्या मजेदार गोष्टी आहेत. या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळण्यांची मजा तर आहेच, पण त्यातून चांगलं कसं वागावं हेही कळतं. आपल्या आजूबाजूच्या गोष्टींची काळजी घ्यावी, दुसऱ्यांना मदत करावी, कोणालाही त्रास देऊ नये अशा अनेक गोष्टी या 'मजेदार गोष्टी'तून शिकायला मिळतात. या गोष्टींत प्राणी, पक्षी आणि खेळणीसुद्धा बोलतात, त्यामुळे या सगळ्या गोष्टी खऱ्या अर्थाने 'मजेदार' झाल्या आहेत.


**चालणारे बूट**
**आणि मजेदार गोष्टी**




**जादूचा अंगरखा**
**आणि मजेदार गोष्टी**



**पतंगाची करामत**
**आणि मजेदार गोष्टी**




**पिनू-चिनूचा चतुराई**
**आणि मजेदार गोष्टी**



**संस्मिता गुप्ते**
**४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत रु. २००/-**
**पोस्टेज रु.५०/-**


# पुस्तक परिचय



## A METHODICAL ENGLISH GRAMMAR



G. D. Moray is working in education field. He is graduate of Pune University and post graduate of Bombay University. He is also working with NGO-Sahayog Pratishthan. Reading English, Marathi and Hindi literature is his hobby. Shakespeare, Ibsen, Shaw, Dickens, Hardy, Tolstoy, Wordsworth, Byron, Shelley, Eliot, etc. are his favourite authors-poets. He has Delivered speeches before a forum for Public Speaking. He Keeps Special interest in English Grammar and Books referred to, written by the English grammarians.




**G. D. Moray**

*मराठी मुलं इंग्रजी या विषयापासून, का, कोण जाणे,सतत दूर राहतात. त्यांच्या मनांत इंग्रजीविषयी एक अनामिक भीती वसत असते.*

*इंग्लिशमध्ये संभाषण करतानाही ती बिचकतात. परिणामी, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये त्यांची सतत पीछेहाट होताना दिसते. याचं मुख्य कारण म्हणजे, इंग्रजी व्याकरणाबद्दल असलेली नावड आणि एकूण इंग्रजीबद्दल मनात घर करून बसलेला भयगंड.*

*ही नावड नाहीशी व्हावी, म्हणून; आणि या भयगंडावर मात करता यावी, म्हणून विद्यार्थ्यांच्याच दृष्टिकोनातून व्याकरणाच्या अध्ययन-अध्यापनाची एक नवी पद्धती (शूप्द्) विकसित करून, हे पुस्तक सिद्ध करण्यात आलं आहे. यातील प्रत्येक विभाग अत्यंत कष्टपूर्वक संपादित करण्यात आला आहे. शिवाय मराठी भाषेत विस्तारपूर्वक स्पष्टीकरण देऊन, पारिभाषिक शब्दांचा अडथळा दूर करण्यात आला आहे. सोप्या सोप्या उदाहरणांच्या साहाय्यानं इंग्रजी हा विषय सुलभ व रोचक करण्यात आला आहे.*

*माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी व विशेषकरून स्पर्धात्मक परीक्षार्थी व इंग्रजीचे अभ्यासक या सर्वांना हा ग्रंथ सतत हाताशी ठेवावासा वाटेल.*

### ('A Methodical English Grammer' पुस्तकाविषयी)

जी.डी. मोरे यांनी इंग्रजी शिकविण्याची प्रचलित पद्धत बाजूला सारली. नवे नवे प्रयोग केले. इंग्रजी व्याकरणाचे नियम तपासले, सूत्रे शोधून काढली व एक नवे तंत्र मोरे यांनी आत्मसात केले. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून इंग्रजीचा विचार केला, तेव्हा त्यांच्या अडचणी मोरे यांच्या लक्षात आल्या. त्यातूनच इंग्रजी शिकविण्याची एक नवी पद्धती (method) विकसित झाली. मुलांच्या मनांत इंग्रजीबद्दल गोडी निर्माण करणे, जिज्ञासा उत्पन्न करणे व शेवटी आत्मविश्वास वाढीस लावणे, हा मोरे यांचा हे प्रयोग करण्यामागचा उद्देश होता. त्यांच्या या प्रयोगांचा परिपाक म्हणजे 'A Methodical English Grammar' हे पुस्तक. या पुस्तकातील सर्व exercises ची उत्तरे शेवटी दिली आहेत.

इंग्रजी भाषेतील क्रियापदे finites, non-finites, infinitives, participles, gerunds, काळ व त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण उपयोग, prepositions, constructions, transformations, clauses, direct & indirect व वाक्यरुपांतर – या भागावर मोरे यांनी विशेष मेहनत घेतली आहे. मराठीत स्पष्टीकरण दिल्याने पारिभाषिक शब्दांचा अडथळा दूर केला आहे. इंग्रजी हा विषय अनेक सोप्या उदाहरणांच्या मदतीने सुलभ व रोचक करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.


तसेच हे पुस्तक कसे अभ्यासावे, लिप्यंतर याविषयीही माहिती दिली आहे. शाळा-ज्युनियर कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी व विशेषकरुन स्पर्धात्मक परीक्षार्थी व इंग्रजीचे अभ्यासक, या सर्वांना या पुस्तकाचा उपयोग होईल.

◆

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## अभिप्राय


### प्रो. जी. पी. प्रधान



"तुमचे इंग्रजी ग्रामर वरील पुस्तक काळजीपूर्वक पाहिले. पुस्तक विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांनाही अतिशय उपयुक्त आहे."

आपला,
ग. प्र. प्रधान

### प्रो. सदानंद वर्दे



शिफारस :

माझे सहकारी श्री. गोपीनाथ मोरे यांनी हे पुस्तक लिहिताना विद्यार्थ्यांच्या गरजा आणि अडचणी नेमकेपणाने लक्षात घेतल्या आहेत. विद्यार्थ्यांना अत्यावश्यक होणारे हे पुस्तक उपयुक्त आहे. इंग्रजी भाषा समजणे व बोलणे याबाबत हे पुस्तक मुलांना नक्की उपयुक्त ठरेल.

सदानंद वर्दे



(बब्बड मालिकेतील 'चंपी मालीश आणि था... था... था...!' पुस्तकातून)

# चंपी मालीश आणि था... था... था...!

- राजीव तांबे

दोन दिवस झाले. मी हॉस्पिटलमधून आमच्या घरी आले.

आमचं घर त्या हॉस्पिटलपेक्षा एकदम वेगळं आहे बरं! इथे पांढऱ्या कपड्यातली नर्स नाही. कॉटवर पण पांढऱ्या चादरी नाहीत. मुख्य म्हणजे इथे संध्याकाळी सात वाजता कर्कश्श घंटा वाजत नाही व भेटायला आलेल्या माणसांना इथे कुणी हाकलून पण देत नाही!

मी दिवसभर माझ्या आईकडेच असते, तरीपण मला माझ्या इतर मित्र-मैत्रिणींची खूप आठवण येते. आम्ही सगळे एकाच खोलीत असायचो. आम्ही सगळे मिळून हसायचो, सगळे मिळून रडायचो, दररोज सगळे मिळून शंभर दुपटी भिजवायचो तर कधी-कधी रंगवायचो!

आमच्या घरात माझ्यासाठी आणि माझ्या आईसाठी एक वेगळीच खोली आहे. खोलीत भिंतीवर मोठमोठी रंगीबेरंगी चित्रं चिकटवलेली आहेत. माझ्यासाठी तर स्पेशल कॉट. कॉटवर फुलाफुलांची रंगीत चादर. छोटीशी उशी. त्याखाली आईच्या आणि आजीच्या जुन्या साड्यांची मऊ-मऊ दुपटी! कपडे ठेवायला वेगळं कपाट. ह्या कपाटात औषधं ठेवायला, माझ्यासाठी खाऊ ठेवायला वेगवेगळे कप्पे. माझ्यासाठी उघड-बंद होणारी खास रंगीत मच्छरदाणी आणि दोन-दोन बादल्या भरून खेळणी! नुसती मज्जाच-मज्जा! मला वाटतं ह्या घरात इतर कुणाचे इतके लाड होतच नसणार!

हॉस्पिटलमधे संध्याकाळीच दिसणारी खूपशी मंडळी आता आमच्या घरात कधीकधी दिसतात. मला कळेना, ह्यांना कसं कळलं आमचं घर? आमच्या पाठोपाठ ही मंडळी इकडे कशी काय आली? मी मोठ्या माणसांचं बोलणं लक्षपूर्वक ऐकलं, तेव्हाच मला सारं समजलं.

जे अधेमधे येऊन माझे लाड करतात, माझ्या आई बाबांशी गप्पा मारतात, ते आमच्या आजूबाजूचे काका मावशी. म्हणजे आमचे शेजारी.

जे खूप-खूप प्रेमळ आहेत ते माझे आजी आजोबा. आमच्याच घरात राहतात हे माझे आजी आजोबा. हे दिवसभर माझ्या आजूबाजूला असतात. पण ह्या आजी आजोबांचा मुलगा मात्र, मला फक्त संध्याकाळीच भेटतो.

अहो, असं काय बघताय? माझे बाबा हो ते! माझे बाबा सकाळी लवकर जातात, तेव्हा मी झोपलेली असते ना! काय करणार?

'बाबांना टाटा करण्यासाठी सकाळी लवकर उठायचं' असं मी ठरवलं होतं... पण कसचं काय नि कसचं काय? हे माझ्या दिवसभर लक्षात राहातं... पण रात्री आईच्या कुशीत झोपल्यावर, सगळं विसरून जातं!

काल संध्याकाळी बाबा आले, तेव्हा बाबांनी मला उचलून घेतलं. मी खुष झाले! मी लगेच बोलायला सुरुवात केली, ''गुर्र गुर्र,गुर्र फुर्र,फुर्र फुर्र!!''

पण अगंबाई! बाबांना काही कळलंच नाही.

मी बाबांना सांगत होते, ''आज पार्वतीबाई आल्या होत्या. त्यांनी मला घाबरवलं, मग मी काय-काय केलं... ''

हं, तर काय झालं,

आज सकाळी-सकाळी पार्वतीबाई आल्या.

मी झोपले होते.

आई म्हणाली, ''उठवू नका हो बब्बडला. आत्ताच झोपलीय ती.'' पार्वतीबाई ठसक्यात म्हणाल्या, ''आवो, आनखी चार घरची कामं हैत. तुमी काय बी काळजी करू नका. मी समदं ठीक करते.''



मी काही गाढ झोपले नव्हते. तशी माझी झोप सावधच आहे.

पार्वतीबाईंनी पडदे ओढले. चांगली सकाळ असून पण त्यांनी दिवा लावला! दार बंद केलं. कोपऱ्यात ठेवलेला उभा पाट घेतला आणि तो जमिनीवर आडवा ठेवला. त्यांनी साडी वर खोचली आणि पाय लांब करून बसल्या की पाटावर!

पाटावर बसून आईला म्हणाल्या, ''द्या तिला हिकडं...''

मी हळूच एक डोळा उघडून आईकडे पाहिलं.

आई मला उचलणार, इतक्यात पार्वतीबाईंनी बसल्या-बसल्या हात लांब केला, मला उचललं आणि पायावर सरळ आडवं घातलं!
ही काय वागण्याची पद्धत? लहान मुलांना कडेवर घेतात, कुशीत घेतात की, स्वत: पाटावर बसून मुलांना पायावर आडवं घालतात? मला काही कळेचना.

मी डोळे उघडून पाहिलं तर... मला जमीनच दिसली!!

म्हणजे, 'खाली पोट, वरती पाठ. पोटाखाली जमीन सपाट.'

इतक्यात, माझ्या पाठीवर कुठलीतरी चिकचिकीत, बुळबुळीत, थलथलीत, बलबलीत, थंडगार वस्तू पडली! ती बुळबुळीत, बलबलीत वस्तू माझ्या पाठीवरच इकडून तिकडे पळू लागली! पाठीवर सरपटू लागली! पळू लागली!

मला किळस आली! माझ्या पाठीवर 'हे कोण रांगतंय' तेच मला कळेना? मी हाताच्या मुठी आवळून मोठ्यानं ओरडले, ''ईऽऽऽऽथूर्रऽऽऽऽफूर्रऽऽऽऽ...''

मला आईची पावलं, इकडून तिकडे पळताना दिसली.

त्याच वेळी पार्वतीबाईंनी ती वस्तू माझ्या पाठीवर खसाखसा चोळायला सुरुवात केली.

उगाच आई घाबरेल म्हणून मी न ओरडताच पडून राहिले.

पार्वतीबाईंनी कमालच केली! मी ओरडत नाही, त्यांना काही बोलत नाही, हूं का चूं करत नाही हे पाहिल्यावर त्यांना चेव चढला!! त्या काय वाट्टेल ते करायला लागल्या.

पाठ चोळता-चोळता त्या माझे पाय चोळू लागल्या! पाय चेपू लागल्या. पायाची बोटं ओढू लागल्या. पोटऱ्या कुस्करू लागल्या!

तरी पण मी शांत राहिले!

## तेनालीराम मालिका - मंजूषा आमडेकर

बुद्धिमान तेनालीराम / जगावेगळा तेनालीराम / चतुर तेनालीराम / न्यायप्रिय तेनालीराम / समयसूचक तेनालीराम / लाडका तेनालीराम / प्रसंगावधानी तेनालीराम / निर्भय तेनालीराम / राज्याचे भूषण तेनालीराम / हजरजबाबी तेनालीराम / हुशार तेनालीराम / विनोदवीर तेनालीराम मजेदार तेनालीराम / परोपकारी तेनालीराम




















**१४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत ८४०/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**

मी शांत राहिल्यानं पार्वतीबाई धीट झाल्या! त्या आता माझे खांदे चेपू लागल्या. माझ्या पाठीवरच्या चिकचिकीत चिखलात त्या आपली बोटं नाचवू लागल्या!

तरीपण मी धीरानं घेतलं!

त्या आता माझी मान चेपू लागल्या. आईचं लक्ष नाहीसं पाहून चिमटे काढू लागल्या!

मी डोकं शांत ठेवण्याचा प्रयत्न करू लागले... तर...

त्या माझं डोकंच चेपू लागल्या! माझ्या डोक्यावर 'धा धिन् आपटा, धा धिन् आपटा, धिन् धिन् धिन् धा आपटा-थोपटा' असा तबला वाजवू लागल्या!

'कडकट् धोपटा, कडकट् धोपटा' असा ताशा बडवू लागल्या.

मी हैराण होऊन चुळबुळ करायचा प्रयत्न करणार... तर...

मला जाम दाबून धरत, त्यांनी माझे कान धरले. 'तुडूम तुडूम छुन्, तुडूम तुडूम छुन्,' माझ्या कानाच्या त्यांनी झांजा केल्या!

पार्वतीबाईंना बहुधा झांजा आवडत नसाव्यात. म्हणून त्यांनी लगेचच, 'चिक चिक चून चून चूं, चिक चिक चून चून चूं' माझ्या कानाच्या चिपळ्या केल्या.

तबला-ताशा, झांजा-चिपळ्या, सतार-बेन्जो, सनई-पिपाणी, गिटार-फिटार अगं आईऽऽगं! माझ्या डोक्यात पुरा ऑर्केस्ट्रा वाजायला लागला!! माझं डोकं गरगरू लागलं! भरभरू लागलं!!

इतक्यात, माझं डोकं फिरलं! संपूर्ण डोकं फिरलं!! गर्रकन डोकं फिरलं!!!

म्हणजे, 'मी उपडी झोपले होते ना, ती आता उताणी झाले!'

मी भीत भीत पार्वतीबाईंकडे पाहिलं, आणि... नक्की कुणाचं 'डोचकं फिरलंय' तेच मला समजेना?

पार्वतीबाईंनी पाय जुळवून घेतले. हातातल्या बांगड्या मागे केल्या. कपाळावरचे केस मागे सारले; तेव्हा मला त्यांचे चिकचिकीत, तेलकट हात दिसले.

तेलकट हात दिसले.

आणि मला लगेचच समजलं.....

मघाशी वाजला तो 'उपडा आर्केस्ट्रा'!

आणि आता वाजणार 'उताणा आर्केस्ट्रा'!

मी चमकून आईकडे पाहिलं.

वॉऽऽव! आई किती उंच दिसते!

आँ!! अचानक ही उंच कशी काय झाली? काय झालं बरं?

क्षणभर मी गांगरलेच! पण नीट पाहिल्यावर मला समजलं. माझं मलाच मग हसू आलं!!

मी नेहमी आईच्या मांडीवर झोपून असायचे. आईच्या जवळ असायचे. पण आज मी उताणी पडले होते पार्वतीबाईंच्या पायावर. आणि आई माझ्या बाजूला उभी होती!

मला क्षणभर वाटलं, 'मी खोल-खोल विहिरीतूनच आईकडे पाहतेय!!'

माझ्या मनातलं आईला कळलं.

माझ्याकडे पाहत, डोळे मोठे करून आई हसली. आई माझ्या बाजूला बसली.

माझ्या चिकचिकीत डोक्यावरून आईनं मायेनं हात फिरवला.

◆



(चित्रमय रंगतदार कथा भाग १ मधील
'बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी' या पुस्तकामधून)

# एक दिवस फूलपरीचा

**- उज्ज्वला केळकर**

सकाळ झाली. सूर्याचे कोवळे किरण झोपलेल्यांना गुदगुल्या करू लागले. सारंग बागेतील फुले हळू हळू डोळे किलकिले करू लागली. जास्वंदीच्या लाल जर्द फुलाने कळ्यांच्या फटीतून बाहेर पाहिले. आऽऽ हाऽऽ करत जांभई देण्यासाठी तोंड उघडले. तशी फुलातली फूलपरी पुटुकन् बाहेर आली. केव्हाची जागी झाली होती ती! आणि फुलाला 'दार उघड. दार उघड.' म्हणत होती. पण, फूल आपलं ढिम्मचं! डोळे बंद नि तोंड मिटून गप्प. एकदाची फुलाने पाकळी उघडली अन् फूलपरी फुलातून बाहेर पडली.

फूलपरी इकडे तिकडे नाचत नाचत निघाली. आपल्या तंद्रीतच होती ती! इतक्यात, एका चतुराने तिला पाहिले. 'वा! आज सकाळी अगदी चवीष्ट फराळ मिळणार मला,' असं म्हणून मिटक्या मारत तो फूलपरीच्या मागे लागला. आता तो तिला अगदी पकडणार, एवढ्यात तिला त्याची चाहूल लागली. इतकं धस्सं झालं तिला! गडबडीने खूपशी पाने असलेल्या एका फांदीच्या शेंड्यावर ती टेकली आणि हळूहळू अगदी सरपटत ती फांदीच्या सुरुवातीकडे निघाली. चतूर चक्रावून गेला. आता इथे उडणारी फूलपरी गेली तरी कुठे? पानांच्या पसाऱ्यात ती छानच लपून गेली होती. फांदीच्या भोवतीनं खूपशा चकरा मारूनही फूलपरीचा ठावठिकाणा लागेना. शेवटी, कंटाळून चतूर निघून गेला, तेव्हा कुठे फूलपरीच्या छातीतलं धडधडणं थांबलं.



फूलपरी आता इकडे तिकडे पाहू लागली. एक छोटीशी पतंगाची आळी भराभर झाडाची हिरवी पानं खात होती. बघता बघता टुम्म फुगत चालली ती! एवढ्यातल्या एवढ्यात चांगली वीस पंचवीस पाने

तिने फस्त केलेली होती. 'काय हावरट नि खादाड आहे ही आळी!' फूलपरीला वाटलं ती म्हणाली,

'खादाडताई, खादाडताई
हिला दुसरं कामच नाही'

आळीला असं चिडवत डिवचत ती तिथून उडाली. ती आंब्याच्या डेरेदार वृक्षावर!

आंब्याच्या वृक्षावर सुरेल आवाजात कोकिळा गात होती. तिची आलापी ताना ऐकताना कितीतरी वेळ मजेत गेला. तिच्या स्वरांच्या झोक्यावर फूलपरी झुलत राहिली. पण, हळूहळू तिला त्याचाही कंटाळा आला. गाणं अगदी गोड, सुरेल असलं म्हणून काय झालं? किती वेळ ऐकायचं? आणि कोकिळेला गाण्याशिवाय काहीच कसा उद्योग नाही? बाकी सगळे पक्षी आपापली घरटी बांधण्यात दंग झालेले होते. चिमण्या घरटे बांधत होत्या. आणि गवत काड्यांच्या भिंती सारख्या ढासळत होत्या.

'चिमणुताई चिमणुताई
मन लावून काम करा बाई'

असं चिमणीला चिडवत फूलपरी तिथून उडाली. एका विस्तीर्ण तळ्याकाठी आली. तिथे झाडांच्या पानांच्या शिरांपासून सुगरण (शिंपीण) एक सुरेखसे घरटे विणत होती. तिची कलाकुसर पाहून फूलपरी थक्कच झाली.

फूलपरी तळ्याकाठच्या एका झाडावर विसावली. आता तिचे लक्ष वर आभाळाकडे गेले. आभाळात एक पतंग उडत होता. अगदी इवल्याशा टिकलीएवढा दिसत होता तो. 'काय मज्जा येत असेल नाही इतक्या वर?' फूलपरीने झाडावरून विचारले.

'होय तर! खूपच मज्जा! आपण अगदी उंच! उंच! बाकी सगळे खाली... खूप खूप खाली...'

'मलासुद्धा यावसं वाटतंय रे तिथं!' फूलपरी म्हणाली.

'मग ये ना!' पतंग म्हणाला.

'पण कशी येणार? माझे पंख तर अगदी इवलेसे आहेत!'

'हात्तीच्या! एवढंच ना! तू माझा मांजा पकड.' पतंगाने युक्ती सांगितली.

'मांजा? म्हणजे रे?' फूलपरीने विचारले.

'म्हणजे दोरा ग! त्या दोऱ्यामुळे तर मी इतका उंच आलो. तू पण माझा दोरा पकड आणि त्यावरून सरपटत सरपटत माझ्याकडे ये' पतंग म्हणाला.

फूलपरीने पतंगाचा मांजा पकडला. त्यावरून सरपटत सरपटत ती वर चढू लागली. तिला अगदी जपून चढावं लागत होतं, कारण मांजा अगदी धारदार होता. काचेची पूड लावली होती ना त्याला! आता ती पतंगाच्या खूपच जवळ पोचली.

'दोऱ्यावर स्वार झाले मी,
सूर्याला धरायला चालले मी'

पायांनी पतंगाचा मांजा धरून ठेवत नि पंखांनी टाळ्या वाजवत फूलपरी गाऊ लागली. सूर्य तर अजून खूपच वर होता. नि हे काय? एवढा जोराचा हिसका कसला बसला? पतंगाचा मांजा कटला होता. वाऱ्याने त्याला कुठल्या कुठे लांब हेलपाटत नेले. एका झाडाच्या फांदीत पतंग अडकला नि थोडासा फाटलासुद्धा! त्या हिसक्याने, पतंगाबरोबरच्या थोड्याशा मांजाला चिकटून असलेली फूलपरी दाण्णदिशी जमिनीवर आदळली.

'कुठला सूर्य नि कुठलं काय?



आमचे आपले जमिनीवर पाय'

फूलपरीच्या मनात आलं.

फूलपरी जमिनीवर आदळली. तिला चांगलेच लागले होते. 'अग, आई ग!' असं म्हणत कण्हत ती उठली. तिने आसपास पाहिलं, तर ओळखीचं काहीच दिसेना. आपण कुठे आलो? आपली सारंगबाग कुठे आहे? फूलपरीला काही उमगेना. कुणाला विचारावं, तेही कळेना. रडायलाच लागली ती! पतंग अडकला होता, त्या झाडावर एक बुलबुलाची जोडी घरटं बांधत होती. घरट्यासाठी आणलेला मोठासा लव्हाळ्याचा तुकडा खाली पडला म्हणून तो उचलायला बुलबुलबाई चिर्रचिर्रत खाली आली. फूलपरीला रडताना पाहून ती म्हणाली, 'कोण ग तू? कुठून आलीस? रडतेस कशाला?'

मग फूलपरीने सगळी हकीकत सांगितली.

'सारंगबागेत रहातेस होय? आता आलं लक्षात! मिठ्ठू पोपट बऱ्याचदा जातो तिथे. तिथली जांभळं आणि चिक्कू खूपच गोड आहेत म्हणे!' बुलबुलबाई म्हणाली.

'होय. खूपच फळं आहेत त्या बागेत! शिवाय, रसाळसुद्धा! मिठ्ठूदादा पोचवेल मला सारंगबागेत?' फूलपरीने विचारले.

'पोचवलं असतं ग! तसा तो खूपच प्रेमळ आहे पण, तो झाडावर आहे कुठे? तो केव्हाचा गेलाय भटकायला. येईल आता सूर्य बुडाल्यावर!'

'मग मला रस्ता तरी सांगा सारंगबागेचा,' फूलपरी काकुळतीने म्हणाली.

'अगं, मला तरी कुठे नक्की माहीत आहे? नदी पलिकडे आहे म्हणे कुठेतरी! नदीच इथून कितीतरी दूर आहे...'

बुलबुलबाई एवढं बोलून आणि लव्हाळ्याचा तुकडा उचलून झाडावर निघून गेली. वेळ कुठे होता तिला थांबायला. बाकीच्यांची घरटी बांधून झाली होती. तिचे सारखे मोडत होते.

'नाकतोडेदादा, नाकतोडेदादा, मला सारंगबागेत नेता?'

नाकतोडा म्हणाला, 'सारंगबाग तर नदी पलीकडे आहे. मला काही नदी पार करता येणार नाही. पण, तुला नदीकाठी नेतो हवंतर!' फूलपरी म्हणाली 'ठीक आहे' फूलपरीला मानेवर बसवून नाकतोडा उडत उडत

निघाला. फूलपरीला नदीकाठी उतरवून तो निघून गेला.

फूलपरी पुन्हा रडू लागली. इतक्यात, तिथे आला रोहीत पक्षी, लांब मानेचा नि लांब गुलाबी चोचीचा रोहीत पक्षी मोठा सुरेख दिसत होता. सूर्य मावळल्यावर आभाळ जसं दिसतं, तसे त्याचे नारिंगी, शेंदरी पंख दिसत होते. रोहीत पक्षाने फूलपरीला नदीपार न्यायचे कबूल केले. रोहीत पक्ष्याच्या पाठीवर बसून फूलपरी निघाली. एखाद्या नावेत बसून आपण जातोय, असं फूलपरीला वाटत होतं. नदीच्या काठांना हिरवी शेतं होती. खूप दूरवर निळसर जांभळे डोंगर दिसत होते. इतकी मज्जा! आपल्याला जन्मात कधी करायला मिळाली नव्हती, फूलपरीला वाटलं. आपल्या अवती भोवतीची गंमत पहाता पहाता अगदी तंद्री लागली तिची! इतक्यात, एक भला मोठा मासा आपला करवतीसारखा जबडा उघडून फूलपरीला गट्टम करायला आला. बरं तर बरं! रोहीत पक्षाचं वेळीच लक्ष गेलं. त्याने आपल्या चोचीने पटकन फूलपरीला पंखाखाली दडवले आणि भराभरा पायांची वल्ही मारत तो पुढे निघाला. करवतमासा आता खूपच मागे पडला होता.

रोहीत पक्षाने फूलपरीला नदीच्या पैलतिरी पोचवले, तेव्हा संध्याकाळ झाली होती. सूर्य मावळला होता. पण, संधीप्रकाश दिसत होता. बगळ्यांचा एक थवा नदीच्या काठाशी उतरला होता. फूलपरीने ओळखले, हाच थवा सारंगबागेतील जांभळाच्या झाडावर वस्तीला असतो. बगळे दलदलीतले किडे वेचत असताना फूलपरी एका बगळ्याच्या पाठीवर चढली. थवा थेट जांभळाच्या झाडावर उतरला.

फूलपरी तिथून जास्वंदीच्या झाडाकडे निघाली. पण, दिवसभरच्या दगदगीने आणि धसक्याने ती इतकी दमून गेली होती की तिला आपले पंख पसरताच येईनात. ती उडायला गेली अन् पडली. बरं तर बरं तुतीच्याच झाडावर पडली. खाली पडली असती तर भरलीच असती तिची शंभर वर्षं!

तुतीच्या झाडावर सकाळी पाहिलेली पतंगाची आळी स्वतःभोवती रेशमी धाग्याचा कोष विणत होती. फूलपरीला फांदीवर आपटलेलं तिनं पाहिलं, नि मायाळूपणे विचारलं,

‘लागलं तर नाही ना कुठे?’

फूलपरी म्हणाली, ‘पाठ थोडीशी आपटली फांदीवर. फारसं लागलं नाही पण, आता मी घरी कशी जाऊ? मला तर उडायचं बिल्कूल त्राण उरलेलं नाही.’

मग आळी म्हणाली, ‘माझ्या तोंडातून बाहेर पडणारा धागा तू पकड आणि तुझ्या घराच्या दिशेने जा. तू मुळीच पडणार नाहीस.’

फूलपरीने धागा पकडला. सकाळी याच आळीला आपण चिडवलं होतं. फूलपरीला आठवलं.


‘आळीताई, मला क्षमा कर!’ फूलपरी म्हणाली.

‘हे बघ! रात्र होत चाललीय. आता बोलण्यात वेळ घालवू नकोस!’ आळी म्हणाली.

तिने दिलेला धागा धरून फूलपरी निघाली. ती जसजशी पुढे जाईल तसतसा आळीच्या पोटातून धागा बाहेर पडत होता. फूलपरी जास्वंदीच्या झाडावर अलगद उतरली. पायात धरलेला रेशमाचा धागा सोडून देऊन फूलपरीने पंख हलवत पतंगाच्या आळीला म्हटले,


‘अच्छा! आळीताई! शुभरात्री... शुभरात्री...’

◆



(वि. स. खांडेकर यांच्या सूर्यास्त पुस्तकातून)

## अनाथ




ते अनाथ पोर भीक मागत-मागत एका गावात आले. समोरासमोर असलेल्या दोन टोलेजंग वाड्यांकडे त्याचे पाय आपोआप वळले. त्यातल्या एका ना एका वाड्यात आपल्याला पोटभर जेवायला मिळेल या कल्पनेने त्याच्या तोंडाला पाणी सुटले.

पहिला वाडा एखाद्या भव्य देवालयासारखा दिसत होता. त्याच्या द्वारावर एक धिप्पाड पहारेकरी उभा होता. पोर त्याला म्हणाले, ''शिपाईदादा, मला मालकांना भेटायचं आहे.''

पहारेकरी गुरगुरला, ''मालक देवपूजेला बसले आहेत.''

''पूजा केव्हा संपेल?''

''चार घटकांनी.''

पोराच्या पोटाला चार घटका चार युगांसारख्या वाटत होत्या. पण नेट धरून ते त्या वाड्याच्या दाराशी तिष्ठत उभे राहिले. मग त्याला मालकाचे दर्शन घडले.

मालकाच्या कानातल्या भिगबाळीचे मोती किती सुंदर दिसत होते! पोर वेड्यासारखे ती भिगबाळी पाहात उभे राहिले.

मालक हसत म्हणाले, ''अरे बाबा, ही सारी देवाची कृपा आहे हं! बोल, तुझं काय काम आहे?''

''मी दोन दिवस उपाशी आहे महाराज. मला काही तरी खायला...''

''तुझा देवावर विश्वास आहे ना?''

''आहे.''

''मग अशी भीक मागत का फिरतोस? अरे वेड्या, त्या अनंत कोटी ब्रह्मांडनायकाची लीला अगाध आहे. पाखराच्या पिलाला काही नुसती चोचच देत नाही तो. तो त्याच्यासाठी चाराही निर्माण करतो. तुझ्या पोटाची व्यवस्था

त्यानं कुठं ना कुठं केली आहेच. देवावर श्रद्धा ठेवून वाट पाहात राहा.''

जपाला बसण्याकरिता मालक निघून गेले.

पोर खाली मान घालून वाड्याबाहेर पडले. एखादे प्रेत उठून चालू लागावे, तसे ते दिसत होते.

समोरच दुसरा वाडा एखाद्या मदोन्मत्त हत्तीसारखा उभा होता. हत्तीने पाणी घेऊन उंच केलेल्या सोंडेसारखा ह्या वाड्याचा वरचा बुरूज दिसत होता. तिथे मोठमोठ्या आवाजात पुष्कळ माणसे काही तरी बोलत होती. खवळलेल्या समुद्राचा भास होत होता ते ऐकून.

भीत भीत पोर वाड्याच्या पायऱ्या चढू लागले. दारावर एक गलेलठ्ठ पहारेकरी उभा होता. तो खेकसून म्हणाला, ''ए कारट्या, कुठं चाललास? चोरीबिरी करायचा बेत आहे वाटतं?''

पोर गयावया करीत उत्तरले, ''मालकांना भेटायचंय मला.''

''मालक पंडितांशी वादविवाद करण्यात गुंतले आहेत.''

''केव्हा भेटतील?''

''चार घटकांनी.''

प्रत्येक पळ युगासारखे वाटत होते. पण पोटासारखे लाचार जगात दुसरे कुणीच नाही. ते पोर मुकाट्याने वाड्याच्या दारात तिष्ठत उभे राहिले.

चार घटकांनी वरचा वादविवाद थांबला. किती तरी पंडित काखेत जाड्या-जाड्या पोथ्या घेऊन हळूहळू वाड्याबाहेर पडले.

पोराला मालकाचे दर्शन झाले.

मालकांनी प्रश्न केला, ''काय काम आहे रे तुझं?''

''दोन दिवस उपाशी आहे मी महाराज, काही तरी खायला...''

''देवावर विश्वास आहे तुझा?''

मघाशी आहे म्हणून सांगितले होते. पण त्याचा काही काही उपयोग झाला नव्हता, आता नाही म्हणून सांगावे असा पोराने विचार केला. ते ताडकन उत्तरले, ''नाही.''

आपल्या उंच भरजरी बैठकीवरून उतरून मालक पुढे आले. पोराची पाठ थोपटीत ते म्हणाले, ''वा वा! इतक्या लहान वयात इतकं ज्ञान मी कुठंच पाहिलं नव्हतं.''

''मला काही तरी खायला...'' पोर मोठ्या आशेने मध्येच म्हणाले.

‘‘खायला? अरे वेड्या, या जगात देव नाही हे तुला ठाऊक आहे ना? मग तुला खायला कोण देणार? ते ज्याचं त्यानंच मिळवायला हवं. दोन गोष्टी लक्षात ठेव. पृथ्वी विशाल आहे आणि प्रयत्न हाच माणसाचा परमेश्वर आहे. तुझं पोट कुठंही भरेल.’’

खाली मान घालून पोर त्या वाड्यातूनही बाहेर पडले. गावातल्या इतर घरांकडे पाहण्याचा त्याला धीरच होईना. एखाद्या भुतासारखे ते मुकाट्याने चालू लागले.

अर्धमेल्या सशावर गिधाडाने पुन्हा-पुन्हा टोचा मारीत राहावे, त्याप्रमाणे भूक त्याच्या पोटातली आतडी कुरतडत होती.

ते पोर कसेबसे गावाबाहेर पडले, पण आता पोटात वणवा पेटला होता. तो कसा विझवायचा हे त्याला कळेना.

एका झाडाखाली पत्रावळीवर पसरलेले भाकरीचे तुकडे चघळीत बसलेली एक म्हातारी त्याला दिसली. त्याचे डोळे आशाळभूतपणाने त्या पत्रावळीकडे पाहू लागले. त्याचे पाऊल पुढे पडेना.

खाता-खाता त्या म्हातारीने सहज आजूबाजूला पाहिले. ते पोर तिला दिसले. त्याच्या डोळ्यांत आक्रोश करीत उभी असलेली भूक तिच्या हृदयाला जाणवली. तिने खुणेने त्याला आपल्याकडे बोलावले. धडधडणारे काळीज हातांनी दाबून धरीत तो पुढे गेला. त्याचा हात धरून म्हातारीने त्याला आपल्याजवळ बसविले. त्या पत्रावळीवरला एक घास घेऊन तो तिने त्याच्या तोंडात घातला. काही तरी बोलायची तिची इच्छा होती. पण तिच्या तोंडून शब्दच फुटेना. तिच्या डोळ्यांत पाणी मात्र तरळले. त्या पाण्याचा एक थेंब त्या पोराच्या गालावर पडला.


आपल्या पोटातला वणवा विझला, आपली सारी तगमग थांबली, जगन्माऊली आपल्याला भेटली असे त्या पोराला वाटले. ते हसू लागले.

चार घास पोटात गेल्यावर पोराने विचारले, ‘‘आजी, जगात देव आहे काय ग?’’

विचित्र हातवारे करीत ती उत्तरली, ‘‘कुणास ठाऊक. मी एक वेडी म्हातारी आहे बाबा.’’

◆

मराठी साहित्यातील श्रेष्ठ लेखक कै. वि. स. खांडेकर यांचा 'अस्थी' हा खास कुमारवयातील मुलांसाठीचा कथासंग्रह.




सत्ता, पैसा, मोठेपणा, यांच्या राक्षसी हव्यासापोटी माणूस कधीकधी आपल्या जिव्हाळ्याच्या नात्यागोत्यांचा, सदसद्विवेकबुद्धीचा आणि माणुसकीचाही गळा घोटतो. मृत व्यक्तीच्या अस्थी गंगेत टाकून त्या व्यक्तीला मुक्ती दिल्याचं समाधान तरी मानता येतं, पण मेलेल्या माणुसकीच्या अस्थी कोठे टाकायच्या?......

लेखक वि. स. खांडेकर आपल्या कथांतून असे मूलभूत प्रश्न उपस्थित करत वाचकांच्या सदसद्विवेकबुद्धीला जाग आणतात आणि अलगद त्यांच्या मनावर उच्च नैतिक मूल्यांचे संस्कार करतात.

◆

उमलत्या वयात मुलांचं मन अत्यंत संवेदनक्षम असतं. कुटुंबातली माणसं, मित्रमैत्रिणी, शाळा, शिक्षक, इतकंच नव्हे, तर झाडं-पानं-फुलं, नद्या, डोंगर, आकाश, चांदण्या या निसर्गाशीही त्यांचं जिवाभावाचं नातं जडलेलं असतं. या नात्यांचे, भोवतालच्या वातावरणाचे, घडामोडींचे त्यांच्या मनावर विविधरंगी तरंग उमटत असतात. त्यातून उमलतात त्यांच्या जाणिवा आणि निर्माण होतात अनेक समज-गैरसमज आणि प्रश्नचिन्हं!




या कथांत वि. स. खांडेकर यांनी लहान मुलांच्या याच भावविश्वाची अकृत्रिम शैलीत, अतिशय तरल चित्रं रेखाटली आहेत. मुलांच्या भावभावना व त्यातले सूक्ष्म बारकावे टिपताना त्यांची लेखणी खूप हळुवार होते आणि त्यांच्या मनावर अलगद जीवनातील शाश्वत मूल्यं आणि आदर्श यांचा ठसा उमटवते. खळबळ माजलेल्या अथांग सागरात आपली छोटीशी होडी 'सत्व' सांभाळून कशी हाकारून न्यायची, ही जाणीवच जणू या कथांतून फुलते.

◆



'मध्यरात्र' हा मराठी साहित्यातील श्रेष्ठ लेखक कै. वि. स. खांडेकर यांचा कुमारवयातील मुलांसाठीचा कथासंग्रह. मात्र यातील कथा प्रौढांनाही अंतर्मुख करून आपले विचार आणि कृती तपासून पाहायला उद्युक्त करतात.

मुलांवर लहानपणापासून घरातली वडीलधारी माणसं, शिक्षक, वाचन यांचे संस्कार होत असतात. त्यातून त्यांच्या मनावर काही मूल्यं ठसतात. काही आदर्शांच्या प्रतिमा कोरल्या जातात; परंतु प्रत्यक्ष जीवनात जर त्यांना ही मूल्यं कधी पायदळी तुडवली गेलेली दिसली, ज्यांचे आदर्श बाळगले त्यांच्या प्रतिमांना तडे गेले, तर त्यांचं मनोविश्व डळमळू लागतं......


सगळंच चांगलं खोटं असतं का?... ढोंग असतं का?... मग खरं काय?... अशा वेळी अंधारातल्या प्रकाशरेखेसारखं हळूच कुणीतरी त्यांचं बोट धरून त्यांना वाट दाखवतं !!

वि. स. खांडेकर यांनी आपल्या कथांतून नेमकं हेच साधलं आहे. कधी ते अतिशय बालसुलभ, सहज शैलीत अशा भांबावलेल्या मुलांना सावरतात व योग्य मार्ग दाखवतात; कधी रूपककथांतून जीवनातल्या चिरंतन मूल्यांशी त्यांची गाठ घालून देतात; तर कधी हसत हसत जीवनाचं सार सांगतात.

◆

'यज्ञकुंड' हा मराठी साहित्यातील श्रेष्ठ लेखक कै. वि. स. खांडेकर यांचा कुमारांसाठीचा कथासंग्रह. अतिशय सहज, अकृत्रिम शैलीतील या कथा कुमारांनाच नव्हे, तर प्रौढांनाही अंतर्मुख करतात.

आपल्या देशाला पारतंत्र्याच्या शृंखलेतून मुक्त करण्यासाठी अगणित लोकांनी आपलं सर्वस्व पणाला लावलं. गांधीजी, नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, लाला लजपतराय, टिळक यांच्यासारख्या नेत्यांनी पेटवलेल्या यज्ञकुंडात त्यांनी आपल्या व्यक्तिगत जीवनाची, आशाआकांक्षांची आहुती दिली. त्यांनी पाहिली आदर्श समाजाची स्वप्नं !...




परंतु स्वतंत्र देशातली पुढची पिढी ही बांधिलकी मानते का?... केवळ व्यक्तिगत उत्कर्षासाठी व स्वार्थासाठी त्यांनी स्वत:चे वेगळे मार्ग चोखाळले तर... देशप्रेमाचं हे यज्ञकुंड विझेल का?... जीवनकलहाच्या आरंभी जोपासलेली मूल्यं तरी शेवटपर्यंत तशीच लखलखीत राहतात का?

'जीवनासाठी कला' असे मानणारे वि. स. खांडेकर आपल्या कथांतून, जीवनातील उच्च नैतिक मूल्यांचा उद्घोष करत हे प्रश्न उपस्थित करतात.

◆


## टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.


या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!


१०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा.

पोस्टेज खर्च अतिरिक्त


# विज्ञानविश्व










*विज्ञान या विषयाची गोडी बाल/कुमार गटांतील मुलांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने डी. एस. इटोकर यांनी जवळ जवळ अकरा पुस्तकं लिहिली आहेत. या पुस्तकांमधून त्यांनी कधी माहिती दिली आहे, तर कधी प्रयोग दिले आहेत, जे प्रयोग मुलं सहजतेने करू शकतील. या पुस्तकांपैकी 'वाचनातून विज्ञान' या पुस्तकातील छोटासा अंश आम्ही उद्धृत केला आहे आणि बाकी पुस्तकांचा कव्हरसह थोडक्यात परिचय दिला आहे. यावरून विज्ञानाची व्यापकता तर अधोरेखित होतेच, पण इटोकरांनी हे विज्ञान मुलांसमोर किती विविधतेने आणि रंजकतेने आणलं आहे, हेही लक्षात येतं. तेव्हा ज्ञानवृद्धीबरोबरच रंजन करणाऱ्या विज्ञान मालिकेची ही एक झलक.*










('वाचनातून विज्ञान') पुस्तकातून

## आकाशात विजा चमकत असताना झाडाखाली उभे राहणे का धोक्याचे आहे ?

आकाशात जेव्हा विजा चमकतात त्यावेळी विद्युतभारित मोठमोठे ढग इकडे तिकडे फिरत असतात. जेव्हा त्यांच्यावर जमा झालेला विद्युतभार खूप वाढतो तेव्हा तो प्रभार दुसऱ्यांना देण्यासाठी ते ढग जवळच्या वस्तुकडे ओढले जातात. एखाद्या सपाट पटांगणावर उभे असलेले झाड जमिनीपेक्षा त्यांना जवळ असते व विद्युतभारित ढग झाडाच्या शेंड्याकडे ओढले जातात. झाडाच्या ओल्या खोडातून ढगावरील विद्युतप्रभार जमिनीत जोराने निघून जातो. ही घटना क्षणात घडते पण प्रभार मोठा असल्यामुळे तो ओल्या खोडातून वाहताना खूप उष्णता तयार होते व त्या उष्णतेने खोडातील पाण्याची वाफ होते. ही वाफ खोडाला फोडून जोराने बाहेर निघते व झाड नष्ट होते. ही क्रिया घडत असताना झाडाखाली एखादी व्यक्ती उभी असली तर तिला इजा होऊ शकते.

## आपणास ऐकू कसे येते ?

आपल्या चेहऱ्यावर दोन कान ठराविक अंतरावर असतात. बाहेर दिसणाऱ्या भागास कानाची पाळी म्हणतात. त्याच्या आत नाजूक अशी कानाची रचना असते. दोन्ही कानातून ध्वनीलहरी आत जातात. तेथे असलेली हवा व पडदा त्यामुळे कंप पावतो. त्याला कंप सुटला की त्याला जोडलेली लहान हाडाची साखळी कंप पावू लागते. त्यामुळे कानाच्या आतील शंखकृती पडदा व त्यावर बारीक केसाप्रमाणे असणाऱ्या पेशीही कंप पावतात. त्यांच्यामार्फत श्रृतीनस चाळवते. या नसेकडून मेंदूकडे आवाजाचा संदेश पाठविला जातो व आपणास आवाजाचे ज्ञान होते.




## आकाशगंगा म्हणजे काय ?

काळोख्या रात्री आकाशात अनेक तारकापुंजाचा एक मोठा दुधाळ पट्टा आकाशाच्या माध्यमातून साधारणत: दक्षिण-उत्तर दिशेने पसरलेला दिसतो. त्या पट्ट्याला आकाशगंगा असे म्हणतात.

## आपल्या आयुष्याच्या कालावधीत आपल्या हृदयाचे किती ठोके पडतात?

माणसाचे सरासरी आयुष्य ७० वर्षांचे मानले तर एवढ्या काळात आपल्या हृदयाचे अडीचशे कोटी ठोके पडत असावेत. या काळात हृदयाने ६ कोटी १५ गॅलन रक्ताचे अभिसरण केलेले असते. हृदयात येऊन गेलेल्या रक्ताचे वजन दोन लक्ष २८ हजार टन इतके भरते; आणि रक्ताचे एखादे सरोवर तयार केले तर त्याची लांबी १ मैल व रूंदी १५० फूट व खोली १० फूट इतकी होईल.

◆





ज्या मुलांना काही तरी करावेसे वाटते; पण नक्की काय करावे, हे त्यांना किंवा त्यांच्या पालकांना सांगता येणार नाही, त्यांच्यासाठी हे पुस्तक नक्कीच मार्गदर्शक ठरेल व ही 'वैज्ञानिक खेळणी' तयार करता-करता त्यांमागील सिद्धान्तांचा संबोध स्पष्ट होईल...

◆




वैज्ञानिक तत्त्वांवर आधारित सुटसुटीत, सोपी रचना असलेली खेळणी, उपकरणे या माध्यमातून रंजकतेबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, जिज्ञासापूर्ती व्हावी, हा या पुस्तक-लेखनाचा उद्देश पूर्णपणे सफल झाला आहे. अनेक प्रयोग आणि उपकरणांतून वैज्ञानिक दृष्टीने चमत्कारामागील कारणपरंपरा शोधणे व अंधश्रद्धेला छेद देणे ही महत्त्वाची उपलब्धी या पुस्तकाने दिली आहे. प्रायोगिकता व उपकरणाची उपयोगिता हा दृष्टिकोन समोर ठेवून अनेकविधी समस्यांवर मूलभूत उपाय शोधण्याचे व शोधक बुद्धीला चालना देण्याचे कार्य ह्या पुस्तकाद्वारे निश्चित होईल, असा विश्वास वाटतो. पुस्तकाची भाषा मुलांशी हितगुज केल्यासारखी आहे. क्लिष्टता टाळलेली आहे. स्वतंत्रपणे वाचून, कोणाचीही मदत न घेता, प्रयोग अथवा उपकरण सिद्ध करता येते. प्रत्येक वैज्ञानिक खेळणे व उपकरण यामागे लेखकाने केलेल्या चिंतनाची जाणीव होते.


◆



आजच्या शिक्षण पद्धतीत वाचणे, लिहिणे आणि अंकगणित यांबरोबर विद्यार्थ्याने सामान्य विज्ञानातही प्रावीण्य मिळवायला हवे, अशी नवी विचारधारा वाहू लागली आहे. हे सामान्य विज्ञान शिकवण्याहून त्याचे सहज सोपे प्रत्यक्ष प्रयोग विद्यार्थ्याकडून करवून घेतले, तर त्यांना ते लवकर आत्मसात करता येते, हाही एक प्रत्यक्षानुभूत निष्कष. 'श्री. डी. एस. इटोकर' यांनी विद्यार्थ्यांना विनासायास अगदी सहज उपलब्ध होतील, अशा वस्तूंतून, चिंतनातून आणि कृतीने सामान्य विज्ञानातील निवडक सिद्धान्तांच्या मूलतत्त्वांना प्रायोगिक रूप दिले आहे. वैयक्तिक व सामूहिकरीत्या हे प्रयोग करून पाहिल्यास विद्यार्थ्याचा बौद्धिक स्तर उंचावण्यास नि:संशयपणे होईल.


◆

'खेळ खेळणे' हा लहान मुलांचा स्थायीभाव आहे. अगदी रांगायला लागल्यापासून मुलांना खेळण्यांचे आकर्षण असते. आणि ही खेळणी त्यांना




स्वत:लाच करायला सांगितली तर? त्यांना किती आनंद होईल याची कल्पना करु शकाल? 'मी हे करु शकतो; मी हे केले' या अभिजात कृतीला योग्य वाव देण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. हा प्रयत्न किती सफल झाला, हे वाचकांनीच ठरवायचे आहे.

◆



अगदी हसत खेळत व ताण-तणाव बाजूला ठेवून मुलांना विज्ञानाचे शिक्षण देता देता विज्ञानातले सिद्धांतही माहित करुन देण्याच्या उद्देशाने श्री. डी.एस. इटोकर यांनी या पुस्तकाची रचना केली आहे.
विज्ञान विषयक सुमारे पन्नास खेळणी स्वत: तयार करुन त्यांच्याबरोबर खेळणे व मित्रांना दाखविणे यात मुलांना आनंद तर मिळेलच, पण त्याचबरोबर त्यांच्या विज्ञानविषयक ज्ञानात भर पडून विज्ञानाची अभिरुचीही वृद्धिंगत होईल.

◆




रोजच्या व्यवहारात विज्ञानातील अनेक शब्द, संज्ञा वापरल्या जातात. शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात विज्ञानावर आधारित अनेक सिद्धांत व उपकरणे अभ्यासली जातात परंतु त्यांचे अर्थ कित्येकदा माहीत नसतात. त्यासाठीच 'A to Z विज्ञान'ची निर्मिती झाली आहे. या पुस्तकात इंग्रजी 'A' या आद्याक्षरापासून 'Z' पर्यंत जास्तीत जास्त शब्दांची आवश्यक त्या ठिकाणी आकृती काढून समजण्यास सोपी अशी मांडणी केली आहे वैज्ञानिक खेळण्यांची, प्रयोगांची मनोरंजक पुस्तके देणाऱ्या डी. एस्. इटोकर यांचे हे वेगळे पुस्तक बाल, कुमार वाचकांबरोबर आबालवृद्धांनाही आवडेल असा विश्वास वाटतो.


◆

आपण आपल्या घरगुती गरजांमध्ये व व्यवहारात लहान-लहान अशी खूप यंत्रे वापरतो. ही यंत्रे अगदी सरळ, सोपी असतात म्हणून यांना 'साधी

## हितोपदेश कथा - मोहन वेल्हाळ





**हितोपदेश बोधप्रद कथा**





**हितोपदेश मनोरंजक कथा**

'हितोपदेश' या नीतिकथांच्या संग्रहाचा कर्ता नारायण अकराव्या-बाराव्या शतकात होऊन गेला. 'पंचतंत्र' या प्रसिद्ध कथासंग्रहातील मूळ कथांवर त्याने या कथा बेतलेल्या आहेत. हा कथासंग्रह 'हितोपदेश'च्या आधी जवळजवळ एक हजार वर्षांपूर्वी लिहिला गेला होता. 'हितोपदेशा'तील सर्व कथा चार स्वतंत्र अध्यायांत विभागलेल्या आहेत : मित्रलाभ, सुहृद्भेद, विग्रह आणि संधी. या छोट्या पुस्तिकेत संग्रहित केलेल्या 'हितोपदेशा'तील कथा आमच्या छोट्या-छोट्या वाचकांचे मनोरंजन तर करतीलच; शिवाय भारताच्या गौरवशाली भूतकाळाचेही दर्शन त्यांना घडवतील.




**हितोपदेश प्रेरक कथा**




**हितोपदेश रोचक कथा**

**४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत २६०/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**




यंत्रे' म्हणतात. प्रत्येक गुंतागुंतीच्या यंत्रात साधी यंत्रे वापरलेली असतात. 'रहाट', 'अडकित्ता', 'सांडशी', 'सायकल' यांपासून 'फ्रीज', 'गीझर', 'थर्मास फ्लास्क' यांपर्यंत विद्युत उपकरणे तरीही वापरण्यास साध्या-सुलभ यंत्राची माहिती देणारे पुस्तक!



'विज्ञान' हा विषय अतिशय रंजक आहे. त्याच्या अभ्यासाने ज्ञान तर वाढतेच, पण आपल्या दैनंदिन जीवनात ज्या अनेक घटना घडतात, त्यांचे आकलनसुद्धा होते. अशीच या विज्ञानाची रंजकता जाणून घ्या, साध्या तत्त्वावर आधारलेल्या खेळणी किंवा उपकरणांमधून...!



'विज्ञान' हा विषय समजण्यास कठीण असतो, अशी सर्वांची धारणा असते. त्याचेच दडपण मुलांच्या मनावर असते.


हा विषय प्रयोगाच्या माध्यामांतून सहज-सोपा करण्यासाठी, त्यातून स्वनिर्मितीचा आनंद मिळवण्यासाठी एवढंच काय त्यातून आत्मविश्वास मिळवण्यासाठी... मुलांचे मार्गदर्शक असणारे पुस्तक विज्ञानातील गमतीजमती!





मुळा, गाजर, बीट यांना कोणत्या वनस्पती म्हणतात? ज्वारी, बाजरी, मका, सूर्यफूल यांना फळे व फुले येतात का?... खोडाच्या प्रकारावरून वनस्पतींचे भाग कसे पडतात?...या आणि अशांसारख्या वनस्पती-विज्ञानातील प्रश्नांची उत्तरं शोधा सहज-सोप्या भाषेत आणि सचित्र प्रयोगांच्या माध्यमांतून...!

# जातक कथा - निर्मला सारडा


आपण कसं वागावं, बोलावं हे लहानपणापासून शिकवलं जातं. तेच ‘संस्कार.’ काही वेळा गोष्टी आपल्यावर हे संस्कार नकळत करत असतात. अशाच मनोरंजनातून संस्कार करणाऱ्या या जातक कथा...





प्रेरक जातक कथा




मनोरंजक जातक कथा




रोचक जातक कथा





शिक्षाप्रद जातक कथा


**४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत २४०/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**


# 'निसर्ग' मालिका


**लेखिका - मधुमती शिंदे**


निसर्ग आणि पक्षी यांच्यात एक अनोखं नातं आहे. निसर्गाच्या ऋतूंप्रमाणे पशू-पक्ष्यांचं मनही बदलत असतं. दुबळे जीव हिंस्र पशूंचं सहज भक्ष्य होतात. त्यांच्या तुलनेने आपले बंदिस्त असलेले मानवी जीवन सुरक्षित आहे, या कल्पनेने आपण सुखावतो. निष्पाप निरागसतेला काहीच अर्थ राहत नाही. प्राण्यांची जगण्यासाठी असलेली धडपड केविलपाणी वाटते; पण त्यांना कधीतरी वाचवायला त्यांचे मित्र एकत्रित येतात. जसे नागाचा फडशा पाडून पोपट व मुंगूस खारूताईसाठी धावून येतात. मदत करायची वृत्ती प्राण्यांमध्येही दिसून येते. जसं वाट चुकलेल्या देवमाशाला राजहंस समुद्रात परत पोहोचवतो आणि गवा सहानुभूतीने लांडग्याचा प्राण वाचवितो. पशू-पक्ष्यांच्या जीवनातले अनेक बारकावे पाहून आपण थक्क होऊन जातो. वृक्ष, प्राणी व पक्षी आपल्या स्वाभाविक प्रेरणांनी जगत असतात आणि त्यांच्या माध्यमातून रंगीबेरंगी सौंदर्याच्या वेगवेगळ्या छटा परमेश्वराने पृथ्वीला वरदान म्हणून दिलेल्या आहेत, असं वाटतं. परमेश्वर एक श्रेष्ठ चित्रकार आहेच.



('निसर्ग' या मालिकेतील 'गीर जंगल आणि इतर गोष्टी' या पुस्तकातून)

# आधार

ऊन कललं होतं, तरी त्याचा ताव कमी झाला नव्हता. त्या तावात सारी धरणी पोळून निघाली होती. गावाबाहेरचा माळ त्या उन्हात तावत होता. माळावर झळा उठत होत्या. तरीही हिरवीगार शेती दिमाखात उभी होती. सूर्य प्रतिस्पर्धी असूनही पृथ्वीला ती गारवा द्यायचा प्रयत्न करीत होती. माळातून गेलेली एक तांबडी पायवाट उठून दिसत होती. वाटेच्या दोन्ही हातांना नारळाची टवटवीत, लांब पानांची झाडे फळांनी लगडलेली होती. बाहेर पडलेल्या नारळाच्या सावलीत धापा टाकत एक डुकराचं पिल्लू बसलं होतं. गावातील दोन कुत्री भुंकत त्याच्या पाठीमागे लागली होती. कसंबसं त्यांना चुकवून ते गावाबाहेर असलेल्या माळावर पोहोचलं. दमूनभागून व भयभीत झाल्यामुळे ते त्या झाडाखालच्या गारव्यामध्ये झोपी गेलं व झोपेतच ते नारळाच्या झाडाला जोरजोरात पाय आपटू लागलं. अचानक त्याच्या डोक्यावर जोरात एक नारळ पडला. त्याचबरोबर माकडांचा समूह झाडावर पेंगत बसला होता. त्यातल्याच एका मादीच्या हातातून एक बच्चा खाली आपटला. आपटल्यामुळे तो बच्चा जोरजोरात ओरडायला लागला. मादी चवताळून खाली आली. आल्या-आल्या ती डुकराच्या पिलाच्या सणसणीत दोन थोबाडीत मारते. तिला वाटतं की, त्या डुकरानंच झाड हलवलं व खाली पडून तिच्या पिलाला दुखापत झाली.

डुकराचं पिलू भयभीतपणे म्हणालं, ''मी तर गाढझोपलो होतो. मी कसा तुझ्या पिल्लाला खाली पाडेन? माझ्या डोक्यात पण केवढ्या जोरात नारळ पडला व रक्तपण वाहू लागलं आहे. मला ना आई, ना बाप. म्हणून मी एकटाच गावातल्या वांड कुत्र्यांपासून बचाव करून इथे येऊन झोपलो.''

माकडिणीला त्याची दया आली व पश्चात्ताप झाला. ती म्हणते, ''चुकलं लेका. तुला आई नाही हे मला आता कळलं. तू आता गावात जाऊच नकोस. या नारळाच्या जवळपासच राहा.''

डुक्कर म्हणतं, ''खरंच, आईचं प्रेम किती विशाल! ती किती दयाळ व प्रेमळ असते, हे तुझ्या बोलण्यावरून कळलं; पण मी इथे बागेत राहिलो, तर

माझं पोट कसं भरणार? गावात गेलो तर भीती आहे. माझ्या आई-वडिलांना पण या गावच्या वांड कुत्र्यांनी मारून टाकलं. मी कसाबसा त्यांच्या तावडीतून सुटून तुझ्यासमोर आहे.''

आजूबाजूच्या झाडांवर बसलेली माकडे हा कोलाहल ऐकून त्यांच्याभोवती जमा होतात. त्यांतलं एक वयोवृद्ध माकड म्हणतं, ''लेका, माणसाच्या वस्तीत एकटं राहणं सोपं नाही. तुझं प्रेमाचं छत्र तू हरवलंस, म्हणून त्यांच्या प्रेमाची तुला जाणीव होती. आमच्या मुलांचं आम्ही रात्रंदिवस संरक्षण करतो. त्यांना आयती फळं खायला देतो. माणसाच्या वस्तीत गेल्यावर आपला बचाव करायला व समूहातच राहिलं की शत्रूपासून बचाव होतो, हे शिकवतो; पण आमच्या मुलांना आमची कदर नाही. आम्ही उपदेश केला की ती म्हणतात, 'तुमचा काळ वेगळा होता,' असं म्हणून हसण्यावारी नेतात व स्वत: अतिहुशार असल्याचं भासवतात; पण कठीण परिस्थितीत आमचा आधार घ्यायला विसरत नाहीत. तू पोरका आहेस आणि तुला आयुष्याचं मार्गदर्शन करायला कुणीच नाही. तू मोठा होईपर्यंत आम्हीच तुझा सांभाळ करू.''

सर्व माकडांना उद्देशून वयस्कर माकड म्हणतं, ''तुम्ही सर्व जण याची काळजी घ्याल ना?''

डुकराच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागतात. ना माझ्या जातीत, ना संगतीत, तरी अजाण असून मला या लोकांनी आधार दिला. रात्र जसजशी चढत गेली, तशी सर्वांना विश्रांतीची गरज भासू लागली. हळूहळू एकेका माकडानं काढता पाय घेतला व आपापल्या झाडावर जाऊन झोपी गेली. ती माकडाची मादी मात्र आपल्या पिल्लाला व डुकराला जवळ घेऊन नारळाच्या झाडाला टेकून झोपी गेली.

थंडीचे दिवस. भल्या पहाटेची वेळ होती. फिका चंद्र आकाशात दिसत होता. पूर्वेला सोनेरी सूर्याची किरणं ढगांमधून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत होती. तसं पाहायला गेलं, तर सर्व जग अंधूकच होतं. त्या अंधूक प्रकाशातच माकडांचा कळप हळूहळू जागा झाला. त्या वृद्ध माकडानं डोंगरमाथ्यावर बहरून आलेल्या फळांच्या बागेत जायचं ठरवलं. त्या धुक्यातून त्यानं दूरवर पाहिलं, तर अजूनही माणसाची चाहूल दिसत नव्हती.

वृद्ध माकड डुकराला उद्देशून म्हणालं, ''आम्ही तुझ्यासाठी फळं आणतो. संध्याकाळ व्हायच्या आत आम्ही परत येऊ. तू कुठेही जाऊ

नकोस.’’

सर्व माकडे डोंगरमाथ्यावरून झरझर पावलं टाकत टापू उतरू लागली. सारं शिवार वाटाण्याच्या शेंगा, भाजीपाला व केळीच्या हिरव्यागार रोपांनी सजलेलं होतं. हे सर्व पाहून माकडं आनंदित झाली व आज चांगलीच मेजवानी मिळणार याची खात्री वाटून त्यांनी एक-एक करून फळांच्या व शेंगांच्या बागेत जाऊन बसकण मारली. बेटावरच्या पांढऱ्या बगळ्यांचा थवा आभाळात चुरमुरे विस्कटावेत तसा गेला व शिवारात धुडगूस घालू लागला. खाण्यापरास यांचं नुकसान दांडगं. थोड्या काळातच सारा बगीचा साफ झाला. गोफणीनं शेतकऱ्यानं दगड मारला की ते उंच झाडाच्या शेंड्यावर इकडे एक पाय व तिकडे एक पाय सोडून साहेबासारखं बसायचे व दात विचकून माणसालाच ते किती हुशार आहेत ते दाखवायचे. थंडीचा मोसम म्हटलं की, पशू-पक्षी, मनुष्यप्राणी यांना सकस व ताजं अन्नधान्य भरपूर मिळतं.

डुकरानं आता थोडासा आळस झटकला व उंचवट्यावर येऊन नजर टाकली. माकडांचा कळप त्याला दिसेनासा झाला. सूर्याच्या पहिल्या किरणांनी सारी सृष्टी लगबगीनं जागी झाली. त्या सृष्टीचं मोहक रूप पाहून डुकराला तरतरी आली.

तांबडा रस्ता त्यानं नदीपर्यंत न्याहाळला. रस्त्यावर कुणीसुद्धा नव्हतं. रस्ता सुनसान होता. माकडानं सांगितलेला आदेश तो विसरून गेला. रसरशीत तरुण रक्त असल्यामुळे त्यानं त्याची पर्वा केली नाही. त्यानं ठरवलं, की आता नदीवर जायचं. खरचटलेलं अंग पाण्यात धुऊन काढायचं; मनसोक्त डुंबायचं, या विचारातच हळूहळू त्याची पावलं नदीकडे वळली. सारे मळे उघडे पडले होते. बेटावरील हिरवीगर्द झाडी दिसत होती. ऊन चढायच्या आत तो भरभर पावलं टाकीत पाण्यात उतरला. पाण्यात पाय टाकताच त्याला बरं वाटलं व तो मनसोक्त डुंबू लागला. बराच वेळ तो गार पाण्यात बसून राहिला. त्याच्या डोक्यात अनेक विचार थैमान घालत होते. ही माकडाची जात- मला सांभाळेल का? लोक म्हणतात, त्यांचा एका ठिकाणी वास नसतो. ती आज इथं तर उद्या तिथं. संध्याकाळी ती येतील याची त्याला शाश्वती वाटत नाही. गावात जाऊन आपल्या बांधवांच्या कळपात राहिलेलं बरं. याच विचारात मग्न असताना त्याच्या कानांवर कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज ऐकू आला. दोन-चार कुत्री डुकरांच्या पाठीमागे लागलेली होती व

डुकरांचा कळप अधूनमधून त्या कुत्र्यांवर चाल करीत होता. भुंकून-भुंकून कुत्री डुकरांसमोर नि:शस्त्र झाली व आल्या वाटेनं परत गेली. घामाघूम झालेली डुकरं माळावर आली व त्या निळ्याशार शांत पाण्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले. डुकराच्या पिल्लाला पाहून ती डुकरं त्याच्याजवळ पोहत आली.

एक डुक्कर म्हणालं, ''कुठं होतास? किती शोधलं आम्ही तुला. कळप सोडून आईला हुडकायला गेला होतास का? तुझी आई आता नाही. ती देवाघरी गेली. आम्हीच तुझे रक्षणकर्ते. यापुढे कळपातच राहा.''

डुक्कर म्हणतं, ''माझ्या पाठीमागे गावातली वांड कुत्री लागली होती. कसाबसा त्यांच्यापासून नजर चुकवून मी नारळाच्या झाडाखाली घाबरून बसलो होतो. तेव्हा त्या माकडांनी मला बरीच मदत केली व आधार दिला. तीपण माझी काळजी घेतील, हा वायदा करून गेली. मी पोरका म्हणूनच परमेश्वरानं तुम्हाला व माकडांना माझं रक्षण करायला पाठवलं. आता मी कधीच तुम्हाला सोडून दूर जाणार नाही. तुमच्या छत्राखालीच राहीन.'' हवा पुन्हा उत्साहभरी झाली. डुक्कर पण आनंदानं साथी मिळाल्यामुळे डोलू लागलं; कारण एक आधार त्याला मिळाला.

**तात्पर्य - कळपाच्या आधारे संकटांवर मात करू शकतो.**



('निसर्ग' या मालिकेतील 'जीवदान आणि इतर गोष्टी' या पुस्तकातून)

# सावली

दड्डी हे गाव महाराष्ट्र व कर्नाटकच्या सीमेवर वसलेलं जरासं मागासलेलं गाव. तरीपण थोडं दूधदुभतं, थोडीफार शेतीभाती आहे. बेरड व धनगर जातीचे तेथील लोकही समाधानी व साधे आहेत. ना धर्म, ना कूळ, ना उच्च, ना नीच. भेदभाव न करता गुण्यागोविंदानं राहत आहेत. गावाला वळसा घालत घटप्रभा नदी बारा महिने तुडुंब भरून वाहून आजूबाजूच्या परिसराला तृप्त करीत आहे. तिचं पात्र रुंदीला भलं मोठं; त्यामुळे गावाला पाण्याची कमतरता नाही. तिच्याशेजारी गर्द जंगल, दाट झाडी. त्यात छोटी-मोठी जनावरं, ससे, भेकर, हरिण, रानडुकरं सर्व जण राहतात.

दुपारची उन्हं चढत होती. गाव तसं शांत झालं होतं. म्हातारी माणसं एका कट्ट्यावर बसून चिलीम फुंकत होती. तेवढ्यात एक पांढऱ्या रंगाची लांबलचक मोटार येऊन त्यांच्यासमोर उभी राहिली. गाडीकडे बघत असताना एका म्हाताऱ्याच्या चिलमीतील विस्तव अंगावर पडतो. ते झटकायला तो उभा राहतो, तेव्हा गाडीतला गृहस्थ म्हाताऱ्याच्या जवळ येतो व म्हणतो,

''यशवंत पाटलाचं घर कुठं आहे? मला दाखवता काय?''

तो म्हातारा त्या गृहस्थाला घेऊन यशवंत पाटलाच्या घरी जातो व उलटपावली परत येतो. म्हातारा मनातल्या मनात म्हणतो, 'जेवढे माणसाचे व निसर्गाचे संबंध आहेत, त्यापेक्षा कितीतरी अधिक पैलूंमध्ये हे संबंध व्यापक आहेत. आपल्या अस्तित्वापेक्षा निसर्गाचं अस्तित्व महत्त्वाचं आहे. मानवी जीवनाला पोषक व जीवनाचा अर्थ समजावून सांगणारे असे हे वृक्ष आहेत. निसर्गाचा वर्तमान बदलत असतो. त्या बदल्यात चैतन्य व नवनिर्मितीचं बीज पेरलेलं असतं; म्हणूनच त्याचं आपण रक्षण करावं. पाटलाच्या डोक्यात कुणीतरी कीड घातली आहे. हा चांगला माणूस पैशाच्या आहारी जाणार. गावाच्या आजूबाजूची वृक्षवल्ली हव्यासापोटी नष्ट करणार. माणूस आणि झाडं यांचा युगानुयुगांचा संबंध नाहीसा करणार.''

लाकडाचा व्यापारी पाटलाच्या वाड्यात प्रवेश करतो. तो भव्य, जुना,

लाकडी वाडा बघून व्यापारी पाटलाची कुवत ओळखतो.


पाटील म्हणतो, ''या, मी तुमचीच वाट बघत होतो. हा आमचा तीन पिढ्यांचा वाडा. संपूर्ण लाकडाचाच आहे. उन्हाळ्यात गारवा नि थंडीत ऊब हे याचं वैशिष्ट्य आहे; पण याला आता डागडुजीची गरज आहे.''

व्यापारी म्हणतो, ''अशा खापऱ्यांच्या मोडक्या वाड्यात राहण्यापेक्षा तू काँक्रीटचा बंगला बांधशील. चारचाकी गाडी घेशील. पन्नाशीला आलास तरी, तू अजून दुचाकी गाडी घेऊन फिरतोस.''

पाटील म्हणतो, ''माझ्या आई-वडिलांची समजूत घालून तुम्हाला टपाल धाडलं होतं. झाडांचा सौदा आपण पक्का करायचा.''

पाटील व तो व्यापारी 'झाडं कधी तोडायची... किती माणसं लागणार... सौदा कधी होणार...' असं बोलत नदीच्या किनारी येतात. दाड झाडांची हिरवी सावली सगळीकडे निवांत पसरलेली होती. हातात हात गुंफून पानांनी झाडांच्या माथ्यावर फेर धरला होता. तप्त उन्हातही जमीन गार होती. नदीकिनारी झाडाझुडपांनी आपला तळ ठोकला होता. झुडपात बसलेली पाणकोंबडी त्या दोघांचं संभाषण ऐकत होती. गावातलं चिटपाखरू पण तिथं नव्हतं. आता पाटील व व्यापाऱ्याला मोकळेपणानं बोलायला हरकत नव्हती. दोघांचं संभाषण ऐकून एक भित्री पाणकोंबडी घाबरून लांब पायांवर ढांगा टाकत, आपल्या छोट्या शेपटीला झटके देत व मान हलवत आपल्या पिलांकडे पळत जाते.

अंधकार गर्द झाडीतून धीम्या गतीनं पृथ्वीवर उतरत असतो. पृथ्वी गार ई-बुक स्वरूपात उपलब्धवाऱ्यानं मोहरून जाते. तिने उन्हाचे चटके सोसले होते व तो गार वारा तिला हवाहवासा वाटतो. तिच्या निळ्याशार रूपामध्ये चंद्रम्याचं पांढरंशुभ्र प्रतिबिंब नदीला भेटायला उतरलं होतं. तिला तिच्या पोटात त्या चंद्राचं शीतल प्रतिबिंब सामावून घ्यायचं होतं. पानांची सळसळ, नदीचा खळखळाट वातावरणाला सोबत देत होता.



पाणकोंबडी हे सर्व दृश्य पाहून म्हणते, ''परमेश्वरा, तूच खरा चित्रकार आहेस. पहाटेचं कोमल, रंगीबेरंगी रूप, दुपारचं क्रोधित रूप व रात्रीचं शांत, विलोभनीय, शांत

रूप. आपल्या सर्व जिवांना गाढनिद्रा येण्यासाठी अंधकार तू पृथ्वीवर पाठवतोस. याबरोबरच तू रंगांच्या अनेक छटा दाखवतोस; पण उद्या हीच माणसं हे दृश्य एका क्षणात नष्ट करतील.'' हा विचार करीत पिल्लांबरोबर ती झोपी जाते. हळूहळू पहाट गगनात पसरू लागते. पक्ष्यांचा किलबिलाट झाडावरून उडून दाही दिशांना निघून जातो. झाडं हताश होऊन आपल्या फांद्या व पानं हलवू लागतात. त्यांचे अश्रू पाणकोंबडीच्या अंगावर पडतात. पाणकोंबडी चमकून वर बघते आणि म्हणते,

''आता पावसाचा ऋतू नाही की दवाचा, मग हे थेंब कुठले?''
तिची नजर वर जाते, तर झाड रडत असतं. झाड म्हणतं, ''माझे उद्या हात-पाय तुटतील व एका भल्यामोठ्या वखारीत मशिनवर माझे तुकडे होतील. तू दुसरीकडे स्थलांतर करू शकतेस; पण माझं काय? हा मनुष्य एका दमात आमची वसाहत नष्ट करील. आम्ही मनुष्याला फळं, फुलं, सावली दिली; तोच मनुष्य आमच्या जिवावर उठला आहे.''

पाणकोंबडी म्हणते, ''आपण मनुष्यासमोर हतबल आहोत. माझ्या पिल्लांना पैलतीरी न्यावं म्हणते.''

झाड म्हणतं, ''कासवदादाला सांग, तो तुला नक्कीच मदत करील.''

पाणकोंबडी म्हणते, ''कासवदादा, माझ्या पिल्लांना पैलतीरी न्यायला मदत करशील का?'' कासव म्हणतं, ''का? इथं छान घर वसवलं आहेस की!'' पाणकोंबडी म्हणते, ''उद्या तो लाकडाचा व्यापारी सर्व झाडांची कत्तल करणार आहे. त्या पाटलानं झाडं विकली आहेत. माझी पिल्लं एका क्षणात झाडांखाली चिरडली जातील.''

कासव म्हणतं, ''घाबरू नकोस, मी व माझा दोस्त तुला नक्की मदत करू.'' पहाटेला पक्ष्यांचा किलबिलाट तिला ऐकू येतो. तिनं रात्र तशीच जागून काढलेली असते. ती केव्हापासून पहाटेची वाट पाहत असते. आपले पंख हलवून पिलांना घेऊन तुरुतरू नदीकाठी जाते. कासव व त्याची पत्नी तिची वाट पाहत असतात. त्यांना बघून तिला आनंद होतो.

कासव म्हणतं, ''चला, दोन पिल्लांना माझ्या पाठीवर व दोन पिल्लांना हिच्या पाठीवर बसव. पिल्लांनो तुम्ही घट्ट पकडून बसा.''

पाणकोंबडी आपले लांब पाय कमळाच्या पानांवर ठेवत अलगद उड्या मारून कासवाच्या पाठोपाठ पैलतीरी पोहोचते. पैलतीरी पोहोचल्यावर पाणकोंबडी पुढे जाऊन एका झुडपाची टेहळणी करते व पिल्लांना त्या

झुडपात सुखरूप बसविते. कासव व कासवीण आनंदानं आपल्या घरी परततात. एक सत्कर्म केल्याचा त्यांना आनंद होतो.

दड्डी गावावर उन्हं हळूहळू चढत असतात. त्यात धुळीचा लोट मिसळत गावाची शांतता भंग करीत चार-पाच ट्रक आपल्या गोंगाटासहित नदीकिनारी पोहोचतात. त्याबरोबरच तीस-चाळीस माणसं कुऱ्हाडी घेऊन झाडांच्या भोवताली उभी राहतात. पैलतीरी हा गोंगाट पाणकोंबडीला ऐकू जातो. झाडं कळवळून रडत असतात. ती झाडं भुईसपाट केली जाऊन ट्रक भरून लाकडं शहराकडे नेली जात होती. बघता-बघता एका आठवड्यात ती गर्द हिरवी झाडी होती का नव्हती, असं दृश्य दिसू लागतं.

महिन्यामागून महिने उलटतात. त्याचबरोबर वर्षे उलटत जातात. गावातला शेतकरी आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट बघत राहतो. उन्हाचे चटके वाढतात. आभाळ भरून येत असतं; पण काळे ढग पोटात पाणी घेऊन न थांबता, ते गाव सोडून दुसरीकडे वाऱ्याबरोबर सरकतात. पाऊस तिथे थांबतच नसतो; त्यामुळे पिकं होरपळून जातात. शेती ओस पडू लागते. तरुण वर्ग गाव सोडून अन्नासाठी दाहीदिशा निघून जातो. राहतात ती फक्त म्हातारीकोतारी.

पाणकोंबडीचं चित्त या दड्डी गावाकडेच लागलेलं होतं. ती मनातल्या मनात म्हणते, ''केवढं विलोभनीय गर्द झाडीचं दृश्य होतं. नदीवर गाई-म्हशी घेऊन मुलं पोहायला यायची. बायका कपडे धुवायला यायच्या. आता सर्व चित्रच बदललंय. आता फक्त भलं मोठं पटांगण धूळ उडवत बसलं आहे. या स्वार्थी माणसांनी पैशासाठी झाडं तोडून सर्व सृष्टीचा नाश केलाय. आता थोड्याच कालावधीत त्याला याचं फळ भोगायला लागेल.''

मनुष्य स्वार्थापोटी, हव्यासापोटी बघता बघता हिरव्या पृथ्वीचा झपाट्यानं नाश करायला लागला आहे. निसर्ग आपल्याला प्रेमापोटी दोन्ही हातांनी भरभरून देतो; पण याची आपण कदर करीत नाही. उन्हाच्या प्रखर, सोनेरी किरणांच्या सैन्याला थोपविण्यासाठी परमेश्वरानं वृक्षांना मनुष्य व सृष्टीच्या संरक्षणासाठी पृथ्वीतलावर हे हिरवेगार नटलेले, डोळ्यांना आल्हाददायक वृक्ष दिले आहेत.

◆

(‘निसर्ग’ या मालिकेतील ‘सृष्टी आणि इतर गोष्टी’ या पुस्तकातून)

# कपट

भर उन्हाळ्याचे दिवस असतात. झाडे अर्धी बोडकी दिसत असतात. जंगलाला नुकतीच पहाटेची चाहूल लागलेली असते. पहाटेच्या मंद वाऱ्याच्या झुळकीने झाडाला राहिलेली थोडीफार पाने हलत असतात. झाडाच्या पायथ्याशीही पाचोळा गोळा झालेला असतो. सूर्याची सोनेरी किरणे त्या पानांवर पडल्यामुळे ती पाने सोन्यासारखी चमकत असतात. एक अस्वल डोहाच्या काठाशी झाडाला टेकून हे रूप डोळ्यांत साठवत असते. पाण्याच्या खळखळाटाकडे त्याचे लक्ष जाते व आपले भले मोठे मस्तक ते पाण्यात बुडविते. त्याला गार स्पर्श बरा वाटतो. पाण्याचे तुषार आपल्या अंगावर घेत, ते पाण्यात फतकल मारून बसते. त्याच्या अंगाची लाही हळूहळू कमी होत जाते. त्याला तरतरी येते व ते बाहेर उठून येणार एवढ्यात त्याला एक गवा- रंगाने तपकिरी, काळ्या, तुकतुकीत मोठ्या शिंगांचा, कपाळावर राखी रंग- असा हा रानरेडा फुत्कार टाकत संथ गतीने पाण्यात



उतरतो. पाण्याचे तुषार अस्वलाच्या अंगावर उडतात. अस्वल अंग झटकत म्हणते, ''काय नाक फुगवून आला आहेस? कोणावर एवढा राग? आजूबाजूला न बघता बेदखल पाण्यात बसलायस.''

गवा आपली लालबुंद नजर अस्वलावर रोखत म्हणतो, ''तो लांडगा रे, अचानक माझ्या पाठीमागून आला. मी बेसावध असताना त्यानं जोरात माझा पाय धरला. त्याला मी लाथ मारली; पण तो चिवट प्राणी परत माझ्या अंगावर धावून आला. शेवटी नाइलाजानं शिंगांनी त्याला भोसकलं. त्याची मांडी फाटली वाटतं. आता तो कुईकुई करत झुडपात पडलाय.''

गवा पाण्यातून बाहेर येतो. उन्हाच्या झळा त्याला असह्य होत असतात. अस्वल व गवा एका भल्या मोठ्या वृक्षाखाली बसतात. गवा आपली पायाची जखम चाटत शांतपणे बसतो.

अस्वल म्हणते, ''जखम मोठी आहे का रे? ती लांडग्याची भक्ष्यावर चटावलेली नजर पाहून हे दुष्ट प्रवृत्तीचे प्राणीच वाटतात. त्यांना आपल्यापेक्षा मोठ्या प्राण्यांची शिकार करायला फार आवडते. ते झुंडीने हिंडतात व आपल्या काटकुळ्या पायांनी दूरवर पळू शकतात. त्यांना कुठल्याही प्राण्याबद्दल दयामाया नाही. भूक असो वा नसो; ते त्याचा फडशा पाडतात व अर्धवट खाऊन तसेच टाकून निघून जातात.''

लांडगा कण्हत एका झुडपात पडलेला असतो. त्याचे मित्र त्याला शोधत असतात व त्याची ही अवस्था बघून एक लांडगा म्हणतो, ''काय झालं? असा कसा पाय मोडला? आणि अंगभर रक्तानंही माखला आहेस. दुर्गंधीपण येत आहे.''

जखमी लांडगा, ''अरे, मी नदीकिनारी दगडातला खेकडा पकडायला गेलो. पंजानं जरा दगड हलवला, तर तो भला मोठा दगड गडगडत येऊन माझ्या पायावर पडला. तो काढताना या जखमा झाल्या. दोन दिवसांनी मी बरा होईन. मला तुम्ही दोन दिवस भक्ष्य आणून दिलं तर बरं होईल.''

एक म्हातारा लांडगा म्हणतो, ''अक्कल नाही आधीच तुला. त्यात तुझ्या फुशारक्या ऐकून कंटाळा आलाय. कळप सोडून एकटाच हावरटासारखा शिकार करायला जातोस. सर्वांबरोबर मिळेल ते खायला तुला आवडत नाही. तुझी ही स्थिती पाहवत नाही. आम्ही तुला दररोज शिकार आणून देऊ, तू बरा होईपर्यंत. सांभाळ स्वत:ला; धडपड करू नकोस.''

लांडगा मनातल्या मनात म्हणतो, 'ह्यांना काही दयामाया आहे की

नाही? मित्र म्हणे! नुसता उपदेश देऊन गेले. मी बरा झालो की बघतोच एकेकाला.'

काही दिवसांनंतर लांडगा त्या झुडपात आपल्या पायांनी इकडेतिकडे घसटत राहतो. उन्हाचे चटके त्या जखमांना ऊब देत असतात. जखम बरी व्हायला अजून बराच अवधी लागेल. अंगात शक्ती नसते. त्याचे मित्र दोन-चार दिवस भक्ष्य आणून देतात; पण नंतर कुणीच त्याच्याकडे फिरकत नाही. लांडगा स्वत:शी म्हणतो, 'त्या गव्याने किती जोरात शिंगे खुपसली माझ्या मांडीत! मांडी शिंगांनी फाडली व मला जोरात दूरवर फेकलं. मला तो प्राणी संथ, धूड मोठे; पण अक्कल कमी वाटली. दया नाही. त्याचे ते लाल डोळे म्हणजे .... नको रे बाबा! आता तो दिसला तरी लांब पळायचं. कठीण परिस्थितीत कोणी कोणाचं नसतं. मित्रांच्या जिवावर मी शिकारीचं धाडस केलं; पण मीच फसलो गेलो. एकटा पडलो.'

दुपारची वेळ. जोराचा वारा रानावनांत घुमू लागतो. झाडे एकमेकांना घासू लागतात. वाऱ्याच्या घोंघावणाऱ्या आवाजामुळे जंगल हादरून जाते. पशुपक्षी घाबरून आपल्या निवाऱ्याकडे धाव घेतात. बघता-बघता जंगलात वणवा पेटतो. जो-तो आपला जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागतो. त्याचे मित्र झुंडीने त्याच्याजवळून पळत गेले; पण कुणीच त्याच्याकडे पाहिले नाही. लांडगा केविलवाणा होऊन त्याला वाचवण्याची याचना प्रत्येकाकडे करू लागतो. लांडगा झाडावरून उड्या मारणाऱ्या माकडाला कण्हत म्हणतो, "मला मदतीची भीक द्या. मला फरफटत का होईना, झाडावरून सुखरूप जागेवर न्या."

माकड म्हणते, "ताकद व कुवतीपेक्षा जास्त मस्ती केलीस, ती तुला नडली. जसे करावे तसे भरावे. तो गवा संथपणे चाललेला. तो केवढा अजस्र; तू केवढा, याचा विचार तरी करायचा. बरं, मी जातो. तू व तुझे नशीब."

अग्नीचे लोट जिभल्या चाटत हळूहळू लांडग्याच्या दिशेने येऊ लागतात. झळांचा लोट हळुवारपणे साऱ्या जंगलात पसरतो. लांडग्याला वाटते, 'आता हा आपला शेवटचा क्षण. पृथ्वीवर कोणी कुणाचं नाही. परमेश्वरा, मला माफ कर,' असे म्हणून तो गुपचूप पडून राहतो. तेवढ्यात जमीन हादरल्याचा त्याला भास होतो. आता त्याच्या कानांवर टापटाप असा

असंख्य पायांचा आवाज येऊ लागतो. तो डोळे उघडून बघतो, तर अनेक गवे आपली शेपटी वर करून भयभीतपणे पळत होते. अचानक लांडग्याजवळ एक गवा थांबतो. त्याने आपले भलेमोठे लाल डोळे लांडग्यावर रोखले व आपली शिंगे जमिनीवर टेकवली.

लांडगा म्हणाला, 'आता मी मेलोच.'

गवा म्हणाला, ''घाबरू नकोस, मी तुला माझ्या शिंगांवरून पाठीवर घेतो. गच्च धरून बैस. रान पेटलंय व ते पेटत इथपर्यंत येईल. चल, बैस लवकर.''

लांडगा गडबडीने कण्हत कसाबसा गव्याच्या पाठीवर बसतो. रेडा त्याला धीम्या गतीने नदीपलीकडे सुखरूप पोहोचवतो.

लांडगा डोळ्यांत अश्रू आणून म्हणतो, ''मी किती दुष्ट आहे! तुला चावायला निघालो. बेसावध असताना तुझ्यावर हल्ला केला; पण आज तूच मला वाचवलंस. माझे सवंगडीपण मला सोडून गेले. विपरीत काळी कुणी कुणाचं नाही बघ. तूच मला जीवदान दिलंस. तुझा रंग काळा, शरीर अजस्र; पण तुझं मन मोठं, कोमल व स्वच्छ आहे. शेवटी तूच मला वाचवलंस. थँक्स मित्रा.''

गवा म्हणतो, ''असू दे रे. नीट राहा. कपटी स्वभाव सोडून दे. सुखी राहशील. स्वच्छ मन ठेव. सर्व जग तुझं होईल. कुणी बेसावध असताना त्यावर हल्ला करू नकोस. आपली कुवत बघून शिकार कर. सांभाळ स्वत:ला.''

◆


फेसबुक प्रतिक्रिया

नॉट विदाऊट माय डॉटर





खरी कथा... छान मांडणी... उत्कंठावर्धक...
प्रेरणादायी... स्त्री शक्तीची अनुभूती देणारं दर्जेदार पुस्तक...

- विशाल पाटील

# दोस्ती

**मधुमती शिंदे**




**किंमत १२०/- रु.**
**पोस्टेज ५०/- रु.**





कथेतील पात्रांच्या चित्रणातून पशुपक्ष्यांच्या भावनांचा माणसांच्या स्वभावाशी मिळताजुळता वेध घेतला आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून साथ केली आहे. आपल्या अवतीभोवती अनेक पशु-पक्षी गुण्यागोविंदाने बागडताना दिसतात, पण उपद्रवी मनुष्यच त्यांचं जगणं-बागडणं एका क्षणात नष्ट करतो.

पक्ष्यांच्या सवयी आणि शरीराची रचना यावर त्याचं निवासस्थान अवलंबून असतं. जसं, चिमणी धिटाईने वाळत घातलेलं धान्य टिपते, कावळा मनुष्यवस्तीजवळच बिनधास्तपणे राहतो. प्रत्येक पशु-पक्ष्याच्या वागणुकीची एक तऱ्हा, एक लकब असते, असे या पुस्तकातून दिसून येते.






या कथांमधून प्राण्यांची जगण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी चाललेली धडपड आणि कधी कधी हतबल होऊन जीवनासाठी चाललेला संघर्ष दिसून येतो. मुलांना पशु-पक्ष्यांविषयी जिज्ञासा, प्रेम वाटायला लावणारं हे पुस्तक आहे.

# ‘गोष्ट डॉट कॉम’ मालिका

**लेखिका - ज्ञानदा नाईक**


आयुष्य अनेक छोट्याछोट्या गोष्टींनी घडत जातं. त्या गोष्टी ठाऊक करून घेणं, जीवनात रुजवणं, वागण्यात बाणवणं म्हणजे खऱ्या अर्थाने जगणं. फुलासारखं फुलण्यात, गंध पसरवण्यात, वृक्षवेलींसारखं समृद्ध होत वाढत राहण्यात भलेपणा आहे. तुम्हाला स्वत:चं आयुष्य कसं जगायचं आहे, कसं घडवायचं आहे, कुठलं ध्येय गाठायचं आहे, ते लिहून काढा आणि पाहा त्यातल्या किती गोष्टी झाल्या. आम्हीही ‘गोष्ट डॉट कॉम’मधून तुमच्याबरोबर या उपक्रमात तुम्हाला साथ देऊ. बघा, तुम्ही तुमचं आयुष्य अधिक सुंदरपणे, समृद्धपणे जगता की नाही!

('गोष्ट डॉटकॉम' या मालिकेतील
'चेटकिणीशी गट्टी जमली आणि इतर बोधकथा' या पुस्तकातून)

# श्वेताची परी झाली

रेडिओ मिर्ची ऐकत आपल्या छोट्याशा गुबगुबीत पांढऱ्याशुभ्र 'परी' मांजरीच्या अंगावरून हात फिरवताना श्वेताच्या मनात आलं,' रोज किती वैताग येतो आपल्याला. सकाळी उठलं नाही की आई रागावते. गृहपाठ झाला नाही तर बाई ओरडतात. अभ्यास करावा लागतो. गणितं आली नाहीत तर दादा धपाटे घालतो. त्यापेक्षा या परीचं आपलं बरं आहे. जो येतो तो लाड करतो. आईच्या पायाला अंग घासलं की ती म्हणते, 'अगं लबाडे, दूध हवंय होय?' दादा अभ्यासाला बसला की ही परी दोन पावलांमध्ये लाडाने शिरते. दादा म्हणतो, 'गुणी परी आहे आमची.' अभ्यास नाही, परीक्षा नाही. नुसतं खायचं आणि झोपायचं. वर सगळ्याकडून लाड करून घ्यायचे. खरंच, आपणही या परीसारखं मांजर झालो तर?'



परीने श्वेताकडे पाहून डोळे मिचकावले. हळूहळू श्वेताला विचित्र वाटायला लागलं. सगळ्या अंगाला खाज सुटली. तिने पाय हलवून पाहिले तर काय आश्चर्य पायावर चक्क संत्र्याच्या रंगाचे मऊ मऊ केस उगवले होते. एवढेच नाही तर गोंडस शेपूटही आलं होतं. श्वेताला कळेना आपल्याला काय होतंय ते? पायांना लांबुडकी नखं आल्याचं तिला जाणवलं. तिनं तोंडावरून हात फिरवला तर चेहेरा मांजरासारखा, अगदी मिशांसह. आजूबाजूला घरचा हॉल, रेडिओ काही नव्हतं. बाग होती. कोपऱ्यात एक पिटुकला उंदीर नाचत होता. एरवी उंदराला घाबरणाऱ्या श्वेताला उंदीर पाहून फार आनंद झाला आणि ती त्याला पकडायला धावली. उंदीर इकडेतिकडे धावू लागला. श्वेता म्हणाली, ''अरे वेड्या, घाबरतोस काय. मीच तुला घाबरते.''

पण उंदीर जीव मुठीत घेऊन एका बिळात दडून बसला. एक छान उन्हाच्या कवडसा पाहून ती बसली. एक चिमणी तिला पाहून फडफड करत उडाली. श्वेताला मजा वाटत होती. अभ्यास, शाळा, कुणाचं रागावणं काहीच नाही. तिला भूक लागली. नेहमीच्या 'मॉडर्न स्वीट'च्या दुकानात ती निघाली. तोच वाटेत एक मोठ्ठा काळा कुत्रा शेपूट हलवत, डोळे वटारून, कान टवकारून तिचा रस्ता अडवून उभा होता. आईला, दादाला हाक मारावी तर जवळ कुणीच नव्हते. तिने ओळखलं त्याला. समोरच्या जाधवकाकांचा 'शेरू' होता तो. नेहमी तिच्याजवळ लाडाने यायचा; पण आज...? त्याच्या तावडीतून ती निसटली आणि खायला शोधू लागली. पाहते तो गुंडू बोका घशातून विचित्र आवाज काढत तिला गुरकावत होता. उलटं फिरून ती धावत सुटली. खूप दम लागला होता. ती कशीबशी घरी आली. पाहते तर कोचावर श्वेता मजेत बसली होती. मांडीवर गुबगुबीत परी लोळत होती. श्वेता तिच्या अंगावरून बोटं फिरवत होती. तिला पाहून परीने हळूच डोळे मिचकावले आणि ती मिशीतल्या मिशीत हसली.

तुमची कल्पनाशक्ती वापरून कविता, गोष्टी लिहा, चित्रं काढा किंवा कल्पनेच्या राज्यात भटका. स्वत:च्या कल्पकतेला वाव द्या. तिचा वापर करा. आयुष्य कितीतरी रसपूर्ण होईल.

◆

('गोष्ट डॉटकॉम' या मालिकेतील
'हत्ती आला घरी आणि इतर बोधकथा' या पुस्तकातून)

# सोनलचं धाडस

दगडू कासवाला आपल्या तळात राहण्याचा फार कंटाळा आला होता. तळ्यातलं कंटाळवाणं आयुष्य सोडून त्याला वेगळं जीवन जगायचं होतं. दगडू तळ्यातून बाहेर आला आणि चालत राहिला. किती तास, दिवस गेले ठाऊक नाही. अचानक त्याला पूर्वी कानावर न पडलेले आवाज ऐकू येऊ लागले. आजूबाजूने वेगाने काहीतरी पळत जाई. नाकातोंडात धूळ जाई. एवढा मोठा आवाज करत वेगाने पळणारे प्राणी त्याने पूर्वी कधी पाहिले नव्हते. रस्त्यावर त्याचे पाय चिकटत होते. त्याला अचानक हवेत वर घेतलं गेलं. दगडूला वाटलं, कुणा घारीने आपल्याला पकडलं आहे. त्याने चारी पाय, मान आपल्या कवचात ओढून घेतली. उग्र वासाची शू खूप प्रमाणात केली. त्या वासाने शत्रू दूर जाईल असं त्याला वाटलं. दगडूला वाटलं तसं काही घडलं नव्हतं. तो एका शहरात शिरला होता. डांबरी रस्त्यावर चालताना एका मोटारीखाली तो चिरडणार, एवढ्यात त्या माणसाने कचकन ब्रेक दाबले. रस्त्याने एवढ्या संथपणे हलणारी छोटी आकृती पाहण्यासाठी तो खाली उतरला. लहान शहाळ्याच्या आकाराचं, अंगावर लिंबोणी रंगाच्या चांदण्या असणारं ते कासव पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्याने दगडूला अलगद उचललं आणि घरी येऊन आठ वर्षांच्या सोनलला दिलं. ते जिवंत, सुंदर खेळणं, नवा मित्र पाहून सोनल किंचाळली, ''अय्या, कासव? माझ्यासाठी? मी पाळू याला. घरी राहील आपल्या.''

सोनलच्या संगतीत दगडू छान रमला. तळ्यात यायचा तसा कंटाळा त्याला येईना. आई भाजी निवडायला बसली की तो देठं फस्त करी. काकडी, द्राक्षं, टोमॅटो, कलिंगड त्याला फार आवडायचं. शिवाय फरसबी, फ्लॉवर, कोबी यावर तो ताव मारायचा. सोनल त्याला मित्र-मैत्रिणींच्यात खेळायला नेई. त्याची नखं कापे. त्याला अंघोळ घाले. बाबा वाचत बसले की तो पायाला लाडाने हळूच चावे. मग बाबा त्याला उचलून मांडीवर घेत. आई लाडाने त्याला कोवळी भाजी निवडून देई.

एकदा सोनल आणि दगडू गच्चीत खेळत असताना अचानक एका डोमकावळ्याने दगडूवर झडप घातली. दगडू घाबरला. त्याने चटकन डोके आणि पाय कवचात घेतले. कावळा दगडूला पायात उचलण्याचा प्रयत्न करू लागला. धारदार चोचीने त्याच्यावर फटके मारू लागला. एवढ्यात 'दगडूऽऽऽ' अशी सोनलची किंकाळी आईने ऐकली. कोपऱ्यातली बॅट उचलून सगळं बळ एकवटून सोनलने बॅटचा टोला कावळ्याला मारला. बेसावध कावळा कोलमडत बाजूला पडला आणि धडपडत उठून उडून गेला. दगडूला छातीशी कवटाळून रडं आवरत सोनल म्हणाली, ''यापुढे तुला एकट्याला सोडून मी कधीच जाणार नाही.'' तिने पाहिलं, दगडूच्या दोन्ही डोळ्यांतून पाणी येत होते. जणू त्याला म्हणायचे होते, 'तुला सोडून मी तरी जगू शकेन का?'

धावत गच्चीवर आलेल्या आईने रडणाऱ्या सोनलला आणि छोट्या दगडूला मिठीत घेतलं.

मैत्री म्हणजे केवळ एकत्र खाणं-पिणं, खेळणं, मोबाइलवर बोलणं, चित्रपट एकत्र पाहणं नव्हे. चांगला मित्र होण्यासाठी मित्राची काळजी घेणं, त्याला कुठली अडचण आहे का, त्याला तुमच्या मदतीची गरज आहे का, या गोष्टींकडे लक्ष देऊन आवश्यक ती कृती करणं मैत्रीत आवश्यक असते.

**संकल्प : मी मित्रांची काळजी घेईन.**



('गोष्ट डॉटकॉम' या मालिकेतील
'हत्ती आला घरी आणि इतर बोधकथा' या पुस्तकातून)

# तळ्याकाठची मैत्री

प्रणव तळ्यावर फार खूश होता. बाबांची बदली झाली म्हणून शाळा, मित्र सगळं सोडून नव्या गावी जायला तो फार नाराज होता. शिवाय गावही छोटं होतं. कसं करमणार तिथे, असा विचार करणारा प्रणव हल्ली घरी फारसा नसायचाच. ऊठसूट तळ्याकाठी जायचा. तिथं तळ्यात मासे पोहत असायचे. छोटी काळी कासवं डोकं पाण्यावर काढून पोहताना दिसायची. तळ्याकाठी पक्षी यायचे. भुंगे फुलपाखरं... सगळी अद्‌भुत दुनिया होती.

एके दिवशी तळ्याकाठी गवतात बसलेल्या प्रणवपाशी तळ्यात पोहणारं बदक आलं. त्याने पिसं हलवून पाणी उडवलं. मग थोडा वेळ गवतातले किडे त्याच्या चपट्या चोचीने टिपले. प्रणवला वाटलं, 'आपण हललो तर बदक घाबरेल. किती सुंदर आहे. तपकिरी पांढरी पिसे, त्यांची तयार झालेली नक्षी, टपोरे डोळे आणि पायांच्या बोटांमधले प्लॅस्टिकच्या पिशवीच्या कागदासारखे दिसणारे पडदे.' बदक त्याच्यापासून चार फुटांवर पाठीत चोच खुपसून डोळे मिटून निर्धास्त झोपून गेलं. प्रणवला वाटलं, घरी जायला उठलो तर बिचाऱ्याची झोप मोडेल. बदक जागं होण्याची वाट पाहत तो बसून राहिला. थोड्या वेळाने बदक जागं झालं आणि ठुमकत पाण्याकडे निघून गेलं.

त्या रात्री प्रणवला बदकाचीच स्वप्नं पडत होती. दुसऱ्या दिवशी बाबांना त्याने विचारलं, ''बदकं काय खातात? माझा एक मित्र आहे बदकुल्या.''

बाबांनी त्यांच्या बी-बियाण्यांच्या डब्यातून मूठभर दाणे काढून त्याला दिले. त्या दिवशी बदकुल्याची आणि प्रणवची खूप गट्टी जमली. एके दिवशी प्रणवने हातावर ठेवलेले दाणेसुद्धा 'बदकुल्या'नं धीटपणे खायला सुरुवात केली. प्रणवचा आनंद गगनात मावेना. शाळेत सगळ्या मित्रमैत्रिणींना तो बदकुल्याच्या गमती सांगायचा. घरी आईबाबांशी बोलताना दुसरा विषय नसायचा.

एके दिवशी बदकुल्या थोडा लंगडत प्रणवकडे आला. प्रणव काळजीत




पडला. काय झालं बरं याला? काय करावं? त्याला काही सुचेना. दुसऱ्या दिवशी तो शाळेत गेला नाही. बाबांना घेऊन गावातल्या प्राण्यांच्या डॉक्टरकडे गेला. ‘‘होईल नीट. दोनतीन दिवस वाट पाहा. नाही बरा झाला तर मी येईन तुझ्याबरोबर.’’ डॉक्टर म्हणाले. आणि खरंच बदकुल्या दोन दिवसांत बरा झाला.

एके दिवशी बदकुल्या कुठेच दिसेना. प्रणवने वाट पाहिली. हाका मारल्या. संध्याकाळी बाबा म्हणाले, ‘‘अरे, तो त्याच्या देशात निघून गेला. थंडीपुरता इथे आला असणार. पुढच्या वर्षी पुन्हा येईल.’’ प्रणव रोज तळ्याकाठी जातो. आता त्याला आणखी नवे मित्र मिळाले आहेत.

बदल घडत राहतात. कुठलीच गोष्ट कायम राहत नाही. अशा वेळी आपण बदल स्वीकारायला हवा. गोष्टी बदलल्या, दुरावल्या म्हणून दुःख करण्यात काय अर्थ आहे?

◆

**फेसबुक प्रतिक्रिया**



**अश्रू**

खूप छान कादंबरी आहे. मानवी जीवनाचा लेखाजोखा उत्तम पद्धतीने मांडला आहे.

- इंद्रजित लोकमते

('कांगारु देशीच्या गोष्टी' या मालिकेतील 'रात्रीचे राक्षस' या पुस्तकातून)

# रात्रीचे राक्षस

हसरी कुकाबुर्रा बसली होती झाडावर,
खुश होती फार सकाळ झाल्यावर,
तिच्या मित्रांनी घातली होती भीती,
'बघ हं! राक्षस येतो रात्री.'

म्हणून तर तिनं तिच्या मित्रांना गोळा केलं,
हेच बरं होईल, असं तिला वाटलं,
एकमेकांना अनुभव सांगत शोधून काढलं खरं,



अन भीती पळवून लावली, तर होईल जरा बरं.
डुलडुल्या वॉंबट होता एक नंबरचा भटक्या,
म्हणाला, 'पाहिलं मी, चेटकिणीला काळ्या,
पाहिली तिची टोपी अन चेहरा तिचा विचकट,
खरंच सांगतो ऐकली तिच्या दातांची खटखट!

घरापुढे उभ्या उभ्या
मी जामच टरकलो,
बिळाखाली माझ्या झटकन सरकलो,
भीतीपोटी रात्रभर नुसता बसून राहिलो.'
'आता माझी पाळी,' म्हणाला कांगारू दंगेबाज,
'पाहिला एक राक्षसी साप, खरं सांगतो आज,
हिस्स् असा जोरदार ऐकला मी आवाज,
हादरलो अस्सा की गेला सगळा माज.'
'एरवी तसा आहे मी हिंमतवाला खूप,
पण पळावं लागलं मला तिथून धूमऽऽ,

लटपटत्या गुडघ्यांनी पळत सुटलो बुम,
अन आपटलो की तोंडावर धडाऽऽमधूम.'

गंभीर साळींदर लागली चौफेर न्याहाळू,
उसासे टाकत बोलली हळूच,
'शप्पथ सांगते, भला मोठा डायनासोर पाहिला,
पाहता मला तो अस्सा गुरगुरला.'



'घाबरून जाऊन अश्शी मी कापत होते चळचळ,
नखांची अन काट्यांची होत होती सळसळ,
भीती होती राक्षसाला ऐकू जाईल सारं,
विसरता नाही यायचं त्या रात्रीचं वारं.'
डोरिस डिंगोलाही होतं बोलायचं,
खोल श्वास घेत तिनं विचारलं,
'मोठ्या अस्वलाचा आवाज ऐकला का कुणी?
रेकत आणि गुरगुरत तो जात होता बाजूनी?'

'भलं मोठं अस्वल माझ्या लागलं होतं पाठी,
मागे मागे आलं माझ्या तुडवत चिखल-माती,
जमेल तशी जीव खाऊन अश्शी मी धावले,
घसरला पाय असा की चिखलातच लोळले.'



वॉलीस वॉलबी हळूच खिशातून
डोकावली, 'माझ्याकडेही आहे किस्सा,'
म्हणत बोलायला लागली, 'ऐकली आहे
मीही ड्रॅगनच्या पंखांची थरथर, विश्वास
ठेवा खरं आहे, सांगत नाही वरवर.'

'टुणकन आईच्या खिशात मारली मी उडी,
पाय माझे बाहेर, लटकत होते तरी,
वाटत होतं मला आत खूप उबदार,

तरीही आतून दुखावलो होतो फार.’
पॅडल प्लॅटिपसनी खुटखुट वाजवली चोच,
आता माझी पाळी म्हणत बोलू लागला तोच,
‘भुताच्या घोरण्याची ऐकली मी हो घुर्रघुर्र,
बघता बघता उठून बसला की हो बकासुर.’



‘भयंकर डोळे त्याचे होते हिरवे-निळे,
तोंडावरती वण त्याच्या होते काळे काळे,
फोडली त्यानं किंकाळी, मिटले मी डोळे,
घसरत गेलो खाडीमध्ये, झाले माझे कडबोळे.’



पृनेल्ला पोसम आली झाडावरून खाली,
म्हणाली, ‘पटणार नाही तुम्हाला की काय हकिकत
झाली, अंधाऱ्या जंगलात पाहिला मी राक्षस पळताना,
पळता पळता ऐकलं त्याला डरकाळी फोडताना.’

‘घाबरगुंडी उडाली अशी, पडले मी झाडावरून,
आपटले धाडकन, घसा गेला ओरडून,
आपटले डोक्यावर, नाक की हो चेपलं,
मला तर वाटलं की शेपूटच ठेचलं.’



तोच एक विचित्र ऐकू आला गोंगाट,
भीषण रडू ऐकून झाला एकच बोभाट,
आलं तिथं भूत एक घाबरले सगळे पार,
मुळीच बसेना त्यांचा डोळ्यांवर विश्वास.

भुतावर झेप टाकत गेली कुकाबुर्रा जोरात,
पंख फडफडवत ओरडली तोऱ्यात,
‘लॅरी लायरबर्ड, लपतोच कसा बघते लबाड,

नकला करून घाबरवतो द्वाड.'

'नव्हता कुणी ड्रॅगन आणि नव्हता डायनासोर,
घोरणारं भूत नव्हतं, की नव्हता कुणी चोर,
तूच होतास लपलेला जंगलाच्या आत,
कंटाळा येतो म्हणून काढत बसलास आवाज.'

लायरबर्ड म्हणाला, 'मी आहे झकास नकलाकार,
पण आता लाज वाटते माझी मलाच,
अर्धवट झोपेत होता सगळे तुम्ही,
भीतीनं गाळण उडली माझ्या नकलांनी.'

'नव्हता कुणी राक्षस मोठा नि भयाण,
की नव्हतं कुणी अस्वल खतरनाक केसाळ,
मीच काढत होतो आवाज कसले कसले,
माफ करा, तुम्हाला उगाच घाबरवले.'

'कुणीच नव्हती चेटकीण विकट तोंडवाली,
नव्हता कुणी साप पळणारा झाडाखाली,
तुम्ही रात्री ऐकलेले आवाज होते माझे,
सगळेच्या सगळे नकला करतानाचे.'

'रहायचो मी शेताजवळ सॅली ग्रीनच्या,
खटखट आवाज होता तो तिच्या गेटचा,
हवा गेल्या टायरचा हिस्स् होता आवाज,
त्या दिवशी सॅलीला उशीर झालेला फार.'

'सॅली ग्रीनच्या शेतावर यायचे आवाज खूप,
दोन आवाज ऐकून मात्र व्हायचो मी खूश
सुसाट बाईकचा आवाज जोरदार,

अन पांढऱ्या कोकॅटूचा कर्कश्श आवाज.'
सगळे प्राणी बसले होते कान देऊन ऐकत,
हळूहळू चालली होती भीती त्यांची ओसरत,
मग त्यांनी केलं कौतुक लायरबर्डचं,
ज्याला आधी नव्हतं कधी बोलायला सुचायचं.
प्राणी सगळे म्हणाले, 'आहेस तू खरा भारी नकलाकार,
आमंत्रण देतो तुला आम्ही खुशाल,
आमच्यासोबत रहा मित्र बनून प्रेमळ,
घाबरवून आमची मात्र नको करू पळापळ.'
कुकाबुर्रा खळखळून लागली हसू,
झाडावर धडपडत लागली बोलू,
'राक्षस, चेटकीण आणि भुताच्या गोष्टी मोठ्या मोठ्या,
सगळ्या होत्या अगदी
शंभर टक्के खोट्या,

आवाज होते सगळे या
हुशार पक्ष्याचे,
आपण मात्र कल्पनेचे तोडत बसलो तारे,
कळलं ना आता, आपलं जंगल आहे सुरक्षित,
झोपू शकतो निवांत आपण डोकं खुपसून मऊ उशीत!'

◆



('विक्रम वेताळ' या मालिकेतील
'गुप्त खजिना आणि इतर कथा' या पुस्तकातून)

# गुप्त खजिना

**- वैशाली कार्लेकर**



त्या रात्री स्मशानात मिट्ट काळोख पसरला होता. कधी फिदिफिदि हसण्याचा आवाज, तर कधी किंकाळ्यांनी तो परिसर दणाणून जात होता. एखाद्या शूरवीरालाही भीतीनं घाम फुटावा अशा त्या वातावरणात राजा विक्रम मात्र निधड्या छातीनं एकेक पाऊल पुढे टाकत होता. नेहमीच्याच जुनाट झाडावर उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर टाकून तो परतीची वाट चालू लागला.

चकित होऊन वेताळ म्हणाला, ''राजा, पुन्हापुन्हा हे अवघड काम तू का करतो आहेस? जर काही न बोलता तू मला नेणार असलास, तरच मी येईन. नाहीतर निघून जाईन हे तुला चांगलंच माहीत आहे.''

राजानं होकारादाखल मान हलवली आणि तो चालू लागला. वेताळानं नवी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

एका छोट्याशा गावात गंगाराम नावाचा एक गरीब माणूस राहत होता. त्याला तीन मुली होत्या. मुली आता मोठ्या झाल्या होत्या, पण त्यांच्या लग्नासाठी त्याच्याकडे काहीच पैसे नव्हते. गंगारामनं पूर्वी राजाच्या सैन्यात

काम केलं होतं. त्यामुळे राजा आपल्याला काहीतरी मदत करेल या आशेनं त्यानं राजाला भेटायचं ठरवलं. मजल दरमजल करत दोन दिवसांनी तो राजधानीत पोहोचला. राजाला त्यानं स्वत:ची अडचण सांगितली आणि मुलींच्या लग्नासाठी काही रक्कम मदत म्हणून मागितली. राजा दयाळू होता पण त्याचाही नाईलाज होता. आदल्याच दिवशी राज्यातल्या पन्नास गावांना पुराचा तडाखा बसला होता. त्या गावांचं पुनर्वसन झाल्याशिवाय खजिन्यातून कुणालाही मदत, दान किंवा बक्षिसं मिळणार नाहीत, असं त्यानंच जाहीर केलं होतं. त्यामुळे सध्यातरी राजाही त्याला मदत करू शकत नव्हता. निराश होऊन गंगाराम परत आपल्या गावी जायला निघाला.

त्याचा रस्ता जंगलातून जात होता. भराभर चालूनही गंगारामला काळोख पडण्यापूर्वी जंगलातून पलीकडे जाता आलं नाही. शेवटी तिथेच एखादा सुरक्षित निवारा शोधून थांबण्याचं त्यानं ठरवलं. इकडे तिकडे फिरता फिरता त्याला जवळच एक गुहा दिसली. बाहेरून अंदाज घेत घेत गंगाराम हळूहळू आत गेला. गुहा खूप मोठी होती. गंगारामनं रात्री तिथेच मुक्काम करण्याचं ठरवलं. तेवढ्यात त्याला मागून मोठ्यानं हसण्याचा आवाज आला. त्याने वळून पाहिलं तर काय... भीतीने त्याचे हात-पाय थरथर कापू लागले. एक काळी आकृती त्याच्या दिशेनं येताना त्याला दिसली. गंगारामची घाबरगुंडी पाहून ते भूत म्हणालं, ''अरे, घाबरू नकोस. मी भूत असलो तरी तुला काही करणार नाही.'' हे एकून गंगारामला धीर आला. तो म्हणाला, ''मला... मला इथून बाहेर जायचंय.'' यावर ते भूत हसून म्हणालं, ''घाबरू नकोस. मी तुला मदतच करेन. बोल तुला किती पैसे हवेत?'' हे ऐकून गंगाराम म्हणाला, ''मला जर तीस सोन्याच्या मोहरा मिळाल्या तर मला माझ्या मुलींची लग्न करता येतील.'' हे ऐकून गडगडाटी हसत भूत म्हणाले, ''फक्त तीस मोहरा! या गुहेत तीस लाखांहून जास्त मोहरा आहेत, बोल तुला किती पाहिजेत? हं! मात्र त्याआधी तुला एक छोटंसं काम करावं लागेल. तुला गयेला जाऊन माझं श्राद्ध करावं लागेल. मगच ही सर्व संपत्ती तुला मिळेल.'' हे ऐकून गंगाराम म्हणाला, ''पण एवढी संपत्ती तुमच्याकडे कुठून आली?'' ''ती एक मोठी गोष्टच आहे.'' भूत सांगू लागलं, ''खूप वर्षांपूर्वी या जंगलात एक दरोडेखोर राहायचा. इथून येणाऱ्या-जाणाऱ्या श्रीमंत व्यक्तींना लुटून तो आणि त्याचे साथीदार खूप संपत्ती मिळवत. काही वर्षांनी राजाच्या सैनिकांकडून दरोडेखोराचे सर्व साथीदार मारले गेले. जिवाच्या भीतीनं तो दरोडेखोरही

गुहेत लपत-छपत राहू लागला. त्यातच एकदा वाघानं त्याला मारून टाकलं. मग त्याचं भूत इथे राहू लागलं. बऱ्याच वर्षांनी एक वाटसरू त्या गुहेत आला. त्यानं भुतानं सांगितल्याप्रमाणे गयेला जाऊन भुताचं श्राद्ध केलं. भुताला मुक्ती मिळाली. मग तो वाटसरू इथेच एक घर बांधून राहू लागला. मृत्यूनंतर त्याचंही भूत झालं. ते इथे राहून संपत्तीचं रक्षण करू लागलं. ते भूत म्हणजे मीच.''

भुताचं हे बोलणं ऐकून गंगाराम म्हणाला, ''ठीक आहे, तुम्हाला मुक्ती मिळण्यासाठी मी गयेला जाऊन तुमचं श्राद्ध करून येतो. मला इथून बाहेर पडण्याचा रस्ता दाखवा.''

भुतानं त्याला जंगलातून बाहेर पडण्याचा रस्ता दाखवला. गंगारामनं गयेला जाऊन श्राद्ध केलं. दोन दिवसात तो गुहेत परत आला. भुताला खूप आनंद झाला. तो गंगारामला घेऊन खजिन्याकडे गेला. तो खजिन्याचं दार उघडणार तोच गंगाराम म्हणाला, ''जरा थांबा, मला आत्ता खजिना पाहायचा नाही. मी नंतर येतो.'' भुताला आश्चर्य वाटलं. ते म्हणालं, ''ठीक आहे. आता ही संपत्ती तुझीच आहे. तू केव्हाही ये आणि घेऊन जा.'' असं म्हणून भूत तिथून अदृश्य झालं. गंगाराम लगेच राजाकडे गेला. त्यानं राजाला विचारलं, ''महाराज, गावाचं पुनर्वसन करण्यासाठी तुम्हाला किती संपत्ती हवी आहे?'' राजाला कळेना, की चार दिवसांपूर्वी तीस मोहरा मागणारा हा गरीब माणूस आज आपल्यालाच किती संपत्ती हवी आहे असं का विचारतो आहे? तरी पण राजा म्हणाला, ''वीस लाख मोहरा'', मग चला, मी तुम्हाला तीस लाख मोहरा असलेली गुहा दाखवतो.'' गंगाराम उत्साहानं राजाला म्हणाला. राजाला वाटलं, गंगारामला वेडबिड तर नाही ना लागलं. पण त्याचा प्रामाणिकपणा पाहून राजा काही सैनिकांना घेऊन त्याच्याबरोबर निघाला. गंगारामनं ती खजिन्याची गुहा राजाला दाखवली. सोनंनाणं, मोहरा पाहून सर्वांचे डोळे दिपून गेले. ''महाराज ही सर्व संपत्ती आजपासून आपली आहे, याचा स्वीकार करा.'' गंगारामचे हे शब्द ऐकताच राजा भानावर आला. त्यानं सैनिकांकरवी ती सर्व संपत्ती राज्याच्या खजिन्यात जमा केली. पूरग्रस्त गावांच्या पुनर्निर्माणासाठी त्या संपत्तीचा उपयोग करण्यात आला. तरीही काही संपत्ती शिल्लक राहिली. राजा गंगारामला म्हणाला, ''तू या संपत्तीमधला काही भाग तरी घ्यायला हवा.'' ''छे! महाराज, मी हा खजिना तुम्हाला भेट म्हणून दिला आहे. मग त्यातला काही भाग परत कसा घेऊ?''



गंगारामनं त्याची बाजू स्पष्ट केली. ''मग तू माझ्या खजिन्यातून तरी काहीतरी घ्यायलाच हवं!'' असं म्हणून राजानं पन्नास हजार सोन्याच्या मोहरा देऊन गंगारामचा सन्मान केला.

इथपर्यंतची गोष्ट सांगून वेताळ राजा विक्रमला म्हणाला, ''राजा, मला सांग, त्या खजिन्याचं रक्षण करणाऱ्या दोघांनीही आपलं आयुष्य खजिन्याचं रक्षण करण्यात घालवलं. मात्र, मृत्यूनंतर भूत झाल्यानंतर दोघंही संपत्ती सोडून द्यायला का बरं तयार झाले? अजून एक म्हणजे गंगारामनं खजिना पहायलाही का नकार दिला आणि तो राजाला का देऊन टाकला?'' तुला याचं उत्तर माहीत असेल तर लगेच सांग. नाही तर तुझ्या डोक्याची हजार शकलं होऊन तुझ्याच पायावर पडतील हे लक्षात ठेव.

क्षणभर विचार करून राजा विक्रम म्हणाला, ''साधारणत: मनुष्याला संपत्तीचा लोभ असतो, त्यानुसार या दोघांनीही संपत्तीचा उपभोग न घेता तिच्या मालकीतच जास्त आनंद मानला. मृत्यूनंतर ही मालकी त्यांच्याकडे राहिली पण संपत्तीचा उपभोग घेण्याची त्याची क्षमता संपली होती. संपत्तीऐवजी मुक्ती मिळवणं त्यांना जास्त महत्त्वाचं वाटत होतं. म्हणूनच दोघंही मुक्तीच्या बदल्यात संपत्ती सोडून द्यायला तयार झाले. गंगाराम सर्वसामान्य असला तरी लोभी नव्हता. संपत्तीच्या लोभापायी या दोघांची जी

अवस्था झाली ती त्याला समजली होती खजिना पाहून आपल्याला लोभ वाटला तर आपणही मृत्यूनंतर भूत बनून इथेच अडकून राहू अशी भीती त्याला वाटली. म्हणून खजिना न पाहताच तो सर्व राजाला भेट म्हणून देण्याचं त्यानं ठरवलं. तसंच ही संपत्ती लोकांना लुटून, मारहाण करून मिळवलेली होती. अनेकांना दु:खी करून हा खजिना मिळवण्यात आला होता. त्यामुळे या खजिन्याचा उपयोग दु:खी लोकांना सुखी करण्यासाठी होणंच योग्य आहे, आपल्याला ही संपत्ती नको असं गंगारामला वाटलं आणि ते योग्यच होतं.

राजा विक्रमाचं हे उत्तर ऐकून वेताळानं मान डोलावली. हसून तो म्हणाला, ''अगदी बरोबर, पण तू बोललास म्हणून आता मी परत चाललो... ही... ही... ही...!''

अंधारात झेप घेत क्षणात वेताळ अदृश्य झाला. खांदे झटकून राजा विक्रमानं वेताळ अदृश्य झाला त्या दिशेकडं पाहिलं आणि तो त्याला आणण्यासाठी पुन्हा स्मशानाच्या दिशेनं चालू लागला.

◆

**फेसबुक प्रतिक्रिया**




# परीघ


पैसा आला की माणूस का बदलतो? पैसा नसताना दडलेले अवगुण पैसा आला की बाहेर येतात.... कंजूस माणूस श्रीमंत झाला की लोभी बनतो. अधाशी माणूस जमीनजुमला खरेदी करतो. स्वार्थी माणूस विलासी बनतो. उदार माणूस दानी बनतो. ज्यांना पैशाचा मोह नाही, त्यांना पैसा असला काय नसला काय; काहीच फरक पडत नाही. पैशामुळे खऱ्याखुऱ्या मानवी संबंधांचं दर्शन घडतं.

- अशुतोष कुलकर्णी

## गुरुशिष्य कथा - शरद दळवी



**कसोटी**
**आणि इतर कथा**



**सत्त्वपरीक्षा**
**आणि इतर कथा**

गुरू आणि ईश्वर उभे. कुणा वंदन करू?
ज्ञान देऊनी ईश्वर दावी सर्वश्रेष्ठ तो गुरू

अशा श्रेष्ठ गुरूंच्या तसेच स्वत:चे कष्ट व गुणांनी अपार ज्ञान, महान यश आणि कीर्ती मिळविणाऱ्या सुप्रसिध्द शिष्यांच्या कथांची ही मालिका.

**किंमत प्रत्येकी ६०/- रु.**
**पोस्टेज अतिरिक्त**

('विक्रम वेताळ' या मालिकेतील
'टेकडीवरचं देऊळ आणि इतर कथा' या पुस्तकातून)

# टेकडीवरचं देऊळ

**- वैशाली कार्लेकर**

त्या रात्री स्मशानात मिट्ट काळोख पसरला होता. कधी फिदीफिदी हसण्याचा आवाज तर कधी किंकाळ्यांनी तो परिसर दणाणून गेला होता. एखाद्या शूरवीरालाही भीतीनं घाम फुटावा अशा त्या वातावरणात राजा विक्रम मात्र निधड्या छातीनं एकेक पाऊल पुढे टाकत होता. नेहमीच्याच जुनाट झाडावर उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर टाकून तो परतीची वाट चालू लागला.

चकित होऊन वेताळ म्हणाला, "राजा, पुन्हा पुन्हा हे अवघड काम तू का करतो आहेस? जर काही न बोलता तू मला नेणार असलास तरच मी येईन. नाहीतर निघून जाईन हे तुला चांगलंच माहीत आहे."

राजानं होकारादाखल मान हलवली आणि तो चालू लागला. वेताळानं नवी गोष्ट सांगायला सुरुवात केली.

शिवपुरी नावाचं छोटंसं गाव उंच टेकड्यांच्या गर्द झाडीत वसलं होतं.



त्यांपैकी सर्वांत उंच टेकडीवर एक मंदिर असल्याचं गावात बोललं जायचं. पण तिथे भुताखेतांचा वावर असल्याच्या समजानं वर्षानुवर्षं तिकडे कुणीही फिरकलं नव्हतं. त्या गावात भोला नावाचा सतरा-अठरा वर्षांचा एक मुलगा राहत होता. लहानपणापासून ऐकलेल्या टेकडी आणि मंदिराच्या गोष्टींनी त्याला त्या मंदिरात जाण्याची जबरदस्त ओढ लागून राहिली होती.

एक दिवस त्यानं त्याच्या आईला मंदिराबद्दल विचारलं. त्याचा टेकडीवर जाऊन येण्याचा विचार ऐकताच आई खूपच रागावली. ''अरे बाळा, असा वेडेपणा मुळीच करू नको. त्या टेकडीवर भुतं-खेतं राहतात म्हणे. आपल्या गावातल्या शिवानंदनं एकदा टेकडीवर जाण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यात त्याला आपला एक डोळा गमवावा लागला आणि अर्ध्या वाटेवरून परत यावं लागलं.'' आईचं हे बोलणं ऐकून भोला विचारात पडला. ''बरं, बरं, नाही जात मी तिकडे.'' असं म्हणून भोलानं हा विषय इथेच थांबवला. पण त्याच्या डोक्यातून हा विषय गेला नव्हता.

दुसऱ्या दिवशी भोला शिवानंदला भेटायला गेला. शिवानंदनं त्याला सर्व हकिकत सांगितली. ''टेकडीवर चढणं तेवढं कठीण नाही आणि तुझ्यासारखा मुलगा तर सहजपणे टेकडी चढू शकतो. तसाच मीही त्यावेळी टेकडी चढून वर पोहोचलो होतो. थोडं अंतर चालल्यावर मला तिथे एक यक्ष दिसला. तो दगडात काहीतरी खोदत होता. मी त्याला जवळ जाऊन काही विचारणार तोच तो चिडून माझ्या अंगावर ओरडला, ''अरे क्षुद्र माणसा, आमच्या भागात येण्याची तुझी हिंमतच कशी झाली? तुझ्यासारख्या माणसांमुळे आम्हाला इथे अडकून पडावं लागलं आहे. आत्ताच्या आत्ता इथून निघून जा.'' मी काही बोलणार तोच माझ्या एका डोळ्यापुढे अंधारी आली. यक्षाच्या शापानं मी एक डोळा गमावला होता. मग मात्र तिथे न थांबता घाबरून मी लगेच खाली उतरलो.''

शिवानंदची ही हकिकत ऐकून भोलाला सुद्धा थोडी भीती वाटली; पण शिवानंदनं त्याला धीर दिला. ''तू थोडं हुशारीनं वागून त्या यक्षाशी मैत्री कर. नशिबानं साथ दिली तर तू ते मंदिरही पाहू शकशील.'' शिवानंदच्या बोलण्यामुळे भोलाची भीती थोडी कमी झाली आणि टेकडीवर जाऊन ते मंदिर पाहायची त्याची उत्सुकता जास्तच वाढली.

अखेर एक दिवस पहाटे घरात कोणालाही न सांगता भोलानं टेकडीच्या

दिशेनं वर चढायला सुरुवात केली. झाडंवेलींमधून मार्ग काढत दुपारपर्यंत भोला टेकडीच्या माथ्यावर पोहोचला. टेकडीवरची हवा अगदी थंड होती. तिथल्या वातावरणामुळे भोलाला खूप प्रसन्न वाटलं. तो तिथलं मंदिर शोधू लागला. तेवढ्यात त्याला कुणाच्यातरी ओरडण्याचा आवाज आला. ''ए! कोण आहेस तू? इकडे कशाला आलास?'' भोलानं घाबरून तिकडे पाहिलं तर शिवानंदनं सांगितलेल्या हकिकतीतला यक्ष तिथे काहीतरी कोरीव काम करत होता. भोला धावतच त्याच्याकडे गेला आणि त्यानं त्याला साष्टांग नमस्कार केला.

''महाराज, माझं नाव भोला. मी शंकराचा भक्त आहे. मी तुमच्या कामात काही मदत करू का?'' भोलाचं नम्र व लाघवी बोलणं ऐकून यक्षाचा राग जरा



शांत झाला.

''हं! मला हे शिवलिंग तयार करायला जरा मदत कर.'' यक्ष म्हणाला. भोला उत्साहानं त्याला मदत करू लागला.

''महाराज, या शिवलिंगाला तर भेगा पडल्या आहेत. आपण दुसरं शिवलिंग तयार करायचं का?'' भोलानं यक्षाला विचारलं. ''तीच तर अडचण आहे. आम्ही केलेल्या प्रत्येक शिवलिंगाला भेगा पडतात आणि आमची इथून सुटका होत नाही.'' यक्ष म्हणाला. ''म्हणजे काय महाराज?'' भोलानं त्याला विचारलं.

''ऐक तर.'' यक्ष सांगू लागला. ''खूप खूप वर्षांपूर्वी आम्ही काही यक्ष या

टेकडीवर शिकारीसाठी आलो होतो. त्यावेळी आमच्या हातून शंकराची भक्ती करणारा एक पुजारी जखमी झाला. शिवाय तो ज्या शिवलिंगाची पूजा करत होता त्या शिवलिंगाचेही आमच्या बाणांनी तुकडे झाले. हे पाहताच भगवान शंकरांनी आम्हाला शाप दिला. जोपर्यंत एका मंदिरात आम्ही अखंड शिवलिंगाची स्थापना करत नाही तोपर्यंत आम्हाला इथेच राहावे लागेल असा शाप आम्हाला मिळाला. त्यानुसार आम्ही एक सुंदर मंदिर केव्हाच बांधलं आहे. पण, अखंड शिवलिंग काही आमच्या हातून अजूनही तयार झालेलं नाही. शंकराच्या शापानुसार खरीखुरी भक्ती करणारे हात शिवलिंगाला लागल्याशिवाय हे काम पूर्ण होणार नाही.''

हे ऐकताच भोलाच्या डोळ्यात पाणी आलं. त्यानं भगवान शंकराची प्रार्थना करून यक्षाला यश देण्याची विनवणी केली. भोलाचे हात शिवलिंगाला लागताच एक चमत्कार झाला. त्याच्या भेगा जाऊन ते अखंड झालं आणि तिथून नाहीसं झालं. हा चमत्कार पाहताच यक्ष धावत मंदिरात गेला. त्याला तिथल्या गाभाऱ्यात त्या शिवलिंगाची स्थापना झालेली दिसली. भोलाच्या निस्सीम भक्तीमुळे ही किमया झाली होती. हे पाहताच यक्षाला खूप आनंद झाला. त्यानं त्याच्या इतर मित्रांनाही तिथे बोलावलं. भोलामुळे त्या सर्वांची भगवान शंकराच्या शापातून मुक्तता झाली होती. सर्वांनी भगवान शंकराची प्रार्थना करून भोलाचे आभार मानले. तो यक्ष भोलाला म्हणाला, ''आमचं इथलं काम पूर्ण झाल्यामुळे आता आम्ही यक्षलोकात परत जाणार आहोत. तू शंकराचा निस्सीम भक्त असल्यामुळे यानंतर तूच या मंदिराची सर्व व्यवस्था पाहावीस असं आम्हाला वाटतं.'' यक्षाचं बोलणं ऐकून भोलानं काही वेळ विचार केला. नंतर नम्रपणे तो म्हणाला, ''आपण आमच्यासाठी एवढं सुंदर मंदिर तयार केलं याबद्दल आम्ही सर्वजण आपले कायम ऋणी राहू. जर तुम्हाला मला काही द्यायचंच असेल तर कृपा करून शिवानंदचा गेलेला डोळा त्याला परत द्या. मात्र या मंदिराची व्यवस्था पाहण्याचं काम मला करता येणार नाही. मला माफ करा.'' एवढं बोलून भोला तिथून घरी परतला.

इतपर्यंतची गोष्ट सांगून वेताळ राजा विक्रमाला म्हणाला, ''राजा, भगवान शंकराची भक्ती करण्याची एवढी मोठी संधी भोलानं केवळ मूर्खपणानं नाकारली की याचं काही वेगळं कारण होतं? लवकर सांग. याचं उत्तर माहीत असूनही तू सांगितलं नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकलं

होऊन तुझ्याच पायावर पडतील हे लक्षात ठेव.

राजा विक्रमानं क्षणभर विचार केला, आणि तो म्हणाला, ''भोलाच्या धाडसी स्वभावानुसार तो टेकडीवर पोहोचला. नंतर त्याच्या नि:स्वार्थ भक्तीमुळे घडलेला चमत्कार त्यानं पाहिला. त्यामुळे त्याचं मन अपार भक्तीनं भरून गेलं. अशा वेळी देवळाची व्यवस्था पाहण्याचं काम हे बक्षीस म्हणून नसून एक जबाबदारी आहे असं भोलाला वाटलं. देवळाची व्यवस्था पाहणं हे तसं कटकटीचं काम असून त्यामुळे देवाची आराधना करण्यात अडथळा येऊ शकतो. याचमुळे भोलानं शिवानंदचा गमावलेला डोळा परत मागून यक्षांना नम्रपणे नकार दिला.


राजा विक्रमाचं हे उत्तर ऐकून वेताळानं मान डोलावली. हसून तो म्हणाला, ''अगदी बरोबर, पण तू बोललास म्हणून आता मी परत चाललो... ही... ही... ही...!''

अंधारात झेप घेत क्षणात वेताळ अदृश्य झाला. शांतपणानं, खांदे झटकून राजा विक्रम वेताळाला आणण्यासाठी स्मशानाच्या दिशेनं पुन्हा चालू लागला.


◆



## जंगल कथा - शरद दळवी




**इमानी मित्र आणि इतर कथा**



**पंचरंगी खार आणि इतर कथा**

ज्ञान आणि मनोरंजनाच्या महापुराचे हे युग. पण बुद्धीबरोबर मनाची मशागत नसेल तर माणूस जिवंत रोबो बनेल. जगा आणि जगू द्या हा निसर्गदेवतेचा नियम सांगणाऱ्या या... जंगलकथा.

**किंमत प्रत्येकी ६०/- रु.**
**पोस्टेज अतिरिक्त**

('विक्रम वेताळ' या मालिकेतील
'राजाचे रक्षण आणि इतर कथा' या पुस्तकातून)

# कृतघ्न चंदन

- वैशाली कार्लेकर



त्या रात्री स्मशानात मिट्ट काळोख पसरला होता. कधी फिदिफिदि हसण्याचा आवाज, तर कधी किंकाळ्यांनी तो परिसर दणाणून जात होता. एखाद्या शूरवीरालाही भीतीने घाम फुटावा अशा त्या वातावरणात राजा विक्रम मात्र निधड्या छातीनं एकेक पाऊल पुढे टाकत होता. थोड्याच वेळात नेहमीच्याच जुनाट झाडावर उलट्या लटकणाऱ्या वेताळाला खांद्यावर टाकून तो परतीची वाट चालू लागला. चकित होऊन वेताळ म्हणाला, ''राजा, तुझ्या कृतीचं कारण मला कळत नाही. काही काही माणसं अतिशय कृतघ्न असतात. पण तू तर कुणाच्या कृतज्ञतेपोटी हे कंटाळवाणं काम करतोयस, हेही मला सांगत नाहीस. ठीक आहे मी तुला एका कृतघ्न मुलाची गोष्ट सांगतो. मग तूच सांग तो कृतघ्न आहे की नाही ते. अर्थात जर काही न बोलता तू मला नेणार असलास, तरच मी येईन. नाहीतर निघून जाईन हे तुला चांगलंच माहीत आहे.''

राजाने होकारादाखल मान हलवली आणि तो चालू लागला. वेताळाने

कृतघ्न चंदनची गोष्ट सांगायला सुरुवात केली.

माधवपूर नावाच्या एका गावात चंदन नावाचा एक दहा वर्षांचा मुलगा राहत होता. गरिबीमुळे त्याचे आईवडील त्याला शिक्षणासाठी गुरुगृही पाठवू शकत नव्हते. मात्र चंदन हुशार होता. तो बरोबरीच्या मुलांशी खेळताना, घरातील-आजूबाजूची मोठी माणसं यांच्या बोलण्यातून ऐकून शिकत होता.

एकदा चंदन त्याच्या मित्रांबरोबर चेंडूने खेळत होता. खेळताना चेंडू जोरात जाऊन चिखलात पडला. एवढंच नाही तर तिथूनच जाणाऱ्या रामस्वामी नावाच्या एका संतापी माणसाच्या अंगावर त्यामुळे चिखल उडाला. रामस्वामीला पाहताच बाकीची मुलं घाबरली. पण चंदनने पुढे जाऊन त्यांची माफी मागितली. हा मुलगा आपल्याला न घाबरता येऊन बोलला याचं रामस्वामीला आश्‍चर्य वाटलं. तो म्हणाला, ''मी तुझ्यावर संतापेन याची तुला भीती नाही वाटली?'' चंदन म्हणाला, ''नाही, चंद्रप्रकाश कुणाला भाजून काढतो का?'' रामस्वामीला त्याच्या बोलण्याचं आश्‍चर्य वाटलं. तो म्हणाला, ''मी चंद्र आहे हे तू कशावरून सांगतो आहेस, मी सूर्याप्रमाणे भाजूनही काढू शकतो तुला.'' चंदन म्हणाला, ''जर तुम्ही सूर्य असतात तर तुमच्याकडे पाहणंही शक्य झालं नसतं, मग डाग पाहणं तर दूरच. पण मी तुमच्याकडे पाहू शकतो आणि तुमच्या कपड्यांवर चंद्राप्रमाणे डाग शोभा देत आहेत.'' एवढ्याशा मुलाचे हे चतुर उद्‌गार ऐकून रामस्वामी चकित झाला. तो म्हणाला, ''बरं मग या चंद्राचा प्रकाश घेण्यासाठी रोज संध्याकाळी माझ्या घरी येत जा. मी तुला रोज विद्या देत जाईन.'' चंदनला खूप आनंद झाला. त्याने घरी येऊन आईवडिलांना ही बातमी सांगितली. त्यांनाही आपल्या मुलाला उत्तम गुरूकडून विद्या मिळणार याचे समाधान वाटले. चंदन दररोज रामस्वामीकडे जाऊ लागला.

अशीच काही वर्षं गेली. चंदन अठरा वर्षांचा झाला. एक दिवस संध्याकाळी चंदन घरी परतत असताना त्याने एक गुंड एका माणसाला चाकूने धमकावताना पाहिलं. चंदन लगेचच त्या माणसाच्या मदतीसाठी गेला. त्याने चाकू हातात असलेल्या गुंडावर असा काही हल्ला केला की त्याच्या हातातला चाकू लांब जाऊन पडला आणि तो गुंड जोरात खाली पडला. त्याबरोबर त्या माणसाने आपली सुटका करून घेतली आणि दोघांनी मिळून त्या गुंडाला जेरबंद केलं. चंदनने ज्या माणसाला सोडवलं तो

गावातला श्रीमंत व्यापारी होता. तो चंदनवर फारच खूश झाला. त्याने त्याला काय बक्षीस हवं म्हणून विचारलं. पण चंदन म्हणाला, ''सध्या तरी मला धनाची गरज नाही. नंतर कधी गरज असली तर मी मागून घेईन.'' तो श्रीमंत ठीक आहे म्हणाला.

चंदनने पकडून दिलेला गुंड हा त्या भागातला कुप्रसिद्ध गुंड होता. अशा गुंडाला पकडून देणारा चंदन नक्कीच कुस्ती, युद्धशास्त्र यात प्रवीण असला पाहिजे असे सर्वांना वाटलं. पण चंदन म्हणाला, ''मला यातलं काहीच येत नाही. फक्त त्या माणसाला सोडवायचं म्हणून मी पुढे गेलो.'' त्याचं हे बोलणं ऐकून गोवर्धन नावाचा एक कुस्तीगीर पुढे आला. तो म्हणाला, ''पोरा, न शिकता पण तुला एवढं येत असेल तर मी तुला कुस्ती शिकवली, तर तू कुणालाही हार जाणार नाहीस. ये उद्यापासून माझ्या तालमीत.'' मग चंदन गोवर्धनच्या तालमीत कुस्तीचे डाव शिकायला जायला लागला. लवकरच तो कुस्तीमध्येही निपुण झाला. अशा प्रकारे शस्त्र व शास्त्र अशा दोन्हीमध्ये कुशल चंदनचे नाव गावात सर्वतोमुखी झालं.

शिक्षण पूर्ण झाल्यावर चंदनला वाटलं की आता आपल्या गुरूंना गुरुदक्षिणा द्यावी. त्याने दोघांनाही तसं विचारलं. पण दोघेही म्हणाले की नुकतंच तुझं शिक्षण संपलं आहे. तुझं स्वतःचं कर्तृत्व सिद्ध कर आणि मग आम्ही आमची गुरुदक्षिणा घेऊ. चंदनने ते मान्य केलं.

काही दिवसांतच राजाकडून गावोगावी एक दवंडी देण्यात आली. राजाने राजधानीमध्ये युद्धकला व विद्वत्चर्चा आयोजित केली असून दोन्ही स्पर्धा जिंकणाऱ्या तरुणाशी राजकन्या विवाह करेल, असं दवंडीमध्ये सांगण्यात आलं. चंदनला वाटलं की आपण स्पर्धेत भाग घ्यायला काय हरकत आहे. केवळ जिंकण्याच्या हेतूने नाही, तर देशोदेशींचे पराक्रमी व हुशार युवक येतील त्यांच्याशी स्पर्धा करता येईल, काही नवीन गोष्टी शिकता येतील. पण भाग घेण्यासाठी एक हजार सुवर्णमुद्रा असं शुल्क होतं. ज्यांना जिंकण्याची खात्री आहे त्यांनीच भाग घ्यावा, या हेतूने राजाने असं शुल्क ठेवलं होतं. या वेळी चंदनला गुंडाच्या तावडीतून सोडवलेल्या श्रीमंत माणसाची आठवण झाली. तो आपल्याला एक हजार सुवर्णमुद्रा देईल, या हेतूने तो त्याच्याकडे गेला. त्याने अर्थातच त्याला तेवढ्या सुवर्णमुद्रा दिल्या. चंदन म्हणाला, ''खूप आभारी आहे. शक्य होईल तेव्हा मी तुमच्या

सुवर्णमुद्रा नक्की परत करेन.''

चंदन स्पर्धेत भाग घेण्यासाठी राजधानीत गेला. तिथे देशोदेशींचे राजकुमार, सरदारपुत्र आणि अनेक युवक जमले होते. स्पर्धा सुरू झाल्या. चंदन एकेक स्पर्धा जिंकत चालला होता. अखेर शस्त्रस्पर्धेचा तो विजेता झाला. मग त्याला शास्त्रस्पर्धेच्या विजेत्याशी जिंकायचं होतं. त्या दोघांमध्येही शस्त्र आणि शास्त्रस्पर्धा झाली. शेवटच्या या अटीतटीच्या लढतीत आपल्या गुरूंनी दिलेलं ज्ञान आठवून अखेर चंदनच बाजी जिंकला. चंदनचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. एका छोट्या गावातून आलेला आलेला गरीब चंदन आपल्या कर्तृत्वावर राजाचा जावई बनणार होता. त्याचं हे यश पाहून त्याच्या आईवडिलांच्या डोळ्याचं पारणं फिटलं. सर्वत्र आनंदीआनंद झाला.

गावकऱ्यांनी चंदनला मिरवणुकीतून गावात आणलं. गावातले सारे जण त्याला भेटायला, कौतुक करायला येऊ लागले. रामस्वामी पण आले. त्यांना त्यांच्या शिष्याचा खूपच अभिमान वाटत होता. चंदन म्हणाला, ''गुरुजी आज तरी माझ्याकडे गुरुदक्षिणा मागावी. आज मी कर्तृत्वाने मोठा झालो आहे.'' रामस्वामी म्हणाले, ''ठीक आहे. तू मला राज्याचा मुख्य प्रधान कर.'' रामस्वामीची ही इच्छा ऐकून चंदन विचारात पडला. तो म्हणाला, ''गुरुजी प्रधानपदासाठी महाराजांनी काही निकष ठरविले असतील. ते आपण पूर्ण केले तरच आपण प्रधान होऊ शकाल. त्याऐवजी तुम्ही आपल्या गावात गुरुकुल स्थापन करण्यासाठी धन मागू शकता. माझ्या वैयक्तिक



मिळकतीतून ते मी देईन.'' हे ऐकताच रामस्वामी चिडले. ते म्हणाले, ''तू महाराजाचा जावई होणार म्हणून माझे ऋण विसरून गेलेला दिसतो आहेस. मी तुला शिकवलं म्हणून तू इथे पोहोचला आहेस. असा कृतघ्नपणा तू करशील असं मला वाटलं नव्हतं.'' चंदनशी काही न बोलता ते रागाने निघून गेले.

नंतर गोवर्धन चंदनला भेटायला आला. त्यालाही चंदनने गुरुदक्षिणा मागण्याची विनंती केली. त्याने गुरुदक्षिणा म्हणून चंदनकडे सेनापती पद मागितलं. चंदनला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, ''ही नियुक्ती महाराज करतात. मी त्यांचा भावी जावई आहे. म्हणून मी तुमच्या नियुक्तीचा आग्रह धरणं बरोबर नाही. तुम्ही महाराजांना भेटा आणि त्यांना तुमची इच्छा सांगा.'' चंदनचं हे बोलणं ऐकून गोवर्धनही चिडून तिथून निघून गेला. काही वेळानंतर चंदनला एक हजार सुवर्णमुद्रा देणाऱ्या श्रीमंताचं आगमन झालं. त्याला पाहून चंदनला आनंद झाला. तो म्हणाला, ''तुम्ही दिलेल्या सुवर्णमुद्रांमुळे मी स्पर्धेत भाग घेऊ शकलो. आता तुम्ही दुप्पट सुवर्णमुद्रा स्वीकारून मला ऋणातून मुक्त करावं.'' तो श्रीमंत म्हणाला, ''चंदन, त्यापेक्षा तू माझ्या कन्येचा पत्नी म्हणून स्वीकार केलास तर मला जास्त आनंद होईल.''

श्रीमंताचं हे बोलणं चंदनला अगदीच अनपेक्षित होते. तो म्हणाला, ''माझा राजकन्येशी विवाह ठरला आहे. तयारी सुरू आहे आणि पुढील महिन्यात विवाह होणारही आहे. अशा वेळी आपल्या कन्येशी विवाह ठरविणं मला योग्य वाटत नाही.'' चंदनचं हे उत्तर ऐकताच श्रीमंत चिडून म्हणाला, ''तुला राज्यप्राप्तीचा लोभ आहे म्हणून तू माझ्या कन्येला नकार देतोयस. माझ्या मदतीमुळेच तू या स्पर्धेत भाग घेऊ शकलास. पण ही तुझ्या अडचणीच्या काळात तुला केलेली मदत तू विसरलायस.'' तोही काही न बोलता तिथून निघून गेला. गोष्ट इथे थांबवून वेताळ राजा विक्रमाला म्हणाला, ''राजा, आपले गुरू, उपकारकर्ता यांच्या इच्छेला मान न देऊन चंदनने कृतघ्नपणाचा कळस केला आहे. त्यांच्या मागण्या मान्य करणं चंदनला शक्य होते तरीही त्याने त्या अमान्य केल्या. याचं योग्य उत्तर काय ते तुला माहीत असेल तर सांग. तुला याचं उत्तर माहीत असूनही तू सांगितलं नाहीस, तर अर्थातच तुझ्या डोक्याची हजार शकलं होऊन तुझ्याच पायावर


पडतील, हे लक्षात आहे ना.''

राजा विक्रमाने क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला, ''हो, मला याचं उत्तर माहीत आहे. चंदनने केलं ते अगदी बरोबर केलं. त्याने गुरूंना योग्य दक्षिणा द्यायला हवी हे खरं आहे आणि ते देण्याची तयारी त्याने दाखवली होती. पण गुरूंनी जे मागितलं ते चंदनच्या दृष्टीने त्याच्या अधिकारात नव्हतं. आणि भविष्यात चंदनला नियुक्तीचे अधिकार मिळाले तरी त्या पदासाठी असलेले निकष पूर्ण केल्याशिवाय तो कोणत्याही व्यक्तीला, अगदी त्याच्या गुरूंनाही त्या पदांवर नियुक्त करणार नव्हता, हे त्याच्या वागण्यावरून जाणवत होतं. श्रीमंताच्या कन्येशी विवाह करणंसुद्धा या परिस्थितीत योग्य नव्हतं. एकतर श्रीमंताने आधीच हा प्रस्ताव चंदनसमोर मांडला असता तर आणि त्याने तो स्वीकारला असता, तर गोष्ट वेगळी होती. राजकन्येशी विवाह करण्याचं निश्चित झाल्यानंतर दुसरा प्रस्ताव स्वीकारणं ही गोष्ट नक्कीच अयोग्य ठरते.''

राजाचं हे उत्तर ऐकून वेताळाने मान डोलावली. हसून तो म्हणाला, ''बरोबर सांगितलंस राजा, पण आपलं काय ठरलं होतं? उत्तर बरोबर आलं तरी तू बोललास. तर आता मी जाणार. चाललो मी परत... हीऽऽ हीऽऽ!''


स्मशानाच्या दिशेने अंधारात झेप घेत वेताळ अदृश्य झाला. राजा विक्रमाने आपले खांदे झटकून वेताळ गेला त्या दिशेला पाहिलं आणि वेताळाला आणण्यासाठी तो पुन्हा स्मशानाच्या दिशेने चालू लागला.

◆



# अभिप्राय






## अमृत पंथाचा यात्री

**दिनकर जोशी**

**अनु. डॉ. सुषमा करोगल**

**पृष्ठसंख्या : २०८**
**किंमत : रु. २२०**
(ई-बुक स्वरुपात उपलब्ध)

**रवींद्रनाथ टागोर यांचे रसाळ जीवनचरित्र**

रवींद्रनाथ टागोर (ठाकूर) यांच्या जीवनचरित्राचे कादंबरी स्वरूपात केलेले रसाळ वर्णन म्हणजे ‘अ-मृत पंथाचा यात्री.’ भारतीय समाज मनावर रवींद्रनाथांची प्रतिमा ‘असामान्य बहुमुखी प्रतिभावंत’ अशीच उमटलेली आहे. साहित्य, संगीत या क्षेत्रातील त्यांची उच्चतम सृजनशीलता आणि शिक्षण क्षेत्रातील उत्तुंग कार्य सर्वविदित आहे; पण तत्कालीन परतंत्र भारत, बंगालचे सामाजिक व राजकीय वातावरण आणि त्या अनुषंगाने स्वत: रवींद्रनाथांचे राजकीय जीवन व त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष याविषयी विशेष माहिती सहसा वाचनात येत नाही.

लेखक दिनकर जोषी यांनी मात्र या साऱ्याच पैलूंचा अभ्यासपूर्ण तरीही थोडक्यात आढावा घेतला आहे. सुमारे दोनशे पानांच्या पुस्तकात एका महान व्यक्तीच्या आयुष्याचा सर्वंकष आलेख मांडणे हे अतिशय कठीण आव्हान लेखकाने पेलले आहे. कादंबरीची सुरवातच तत्कालीन बंगाल आणि ठाकूरांच्या जमीनदार घराण्याच्या वर्णनाने झाली आहे. धनसंपन्नतेबरोबरच गीत, संगीत, नृत्य, नाट्य या कलांनीही तिथले वातावरण समृद्ध होते.

बुद्धिमान आणि रसिक सभासदांनी ठाकूरांचा विशाल परिवार गजबजलेला असे. अशा कलासक्त वातावरणात रवींद्रनाथांच्या मनाची जडणघडण झाली. देवेंद्रनाथ आणि शारदादेवी यांचे ते चौदावे अपत्य होते. साहजिकच मोठ्या परिवाराचे प्रचंड खटले चालवताना या बालकाकडे त्यांचे तसे दुर्लक्षच झाले. आईच्या प्रेमाला आसावलेल्या रवींद्राचे संगोपन नोकरांहातीच झाले. कदाचित म्हणूनच भरल्या घरातही एकाकी असणारे हे बालक कवितांमध्ये अधिक रमले असावे. पुढे किशोरवयात त्यांना कादंबरी या समवयस्क भावजयीकडून मैत्रिपूर्ण प्रोत्साहन मिळाले.

शालेय अभ्यासात रस नसणाऱ्या रवींद्रनाथांच्या काळजीपोटी त्यांना जिल्हा न्यायाधीश असणाऱ्या सत्येंद्रनाथ या त्यांच्या मोठ्या भावाकडे अहमदाबादला पाठवण्यात आले. नंतर काही काळाने मुंबईला डॉ. तर्खड यांच्या कुटुंबात पाठवण्यात आले. बुजऱ्या स्वभावाच्या रवींद्रनाथांची लंडन वास्तव्याची पूर्वतयारी म्हणून ही योजना केली गेली. इथे त्यांना अन्नपूर्णा ऊर्फ अनू ही धीट मैत्रीण मिळाली. पुढे लंडनला गेल्यावरही अभ्यासात ते खास रमले नाहीत. उलट काव्यामुळे यजमान कुटुंबातल्या मुलींशी त्यांची मैत्री वाढू लागल्याचे लक्षात आल्यामुळे त्यांना भारतात परत बोलावले गेले.

भारतात परतल्यावर त्यांचा भवतारिणी अर्थात मृणालिनीशी विवाह झाला. याच दिवशी त्यांच्या घरी एक दुर्घटना घडली. त्यानंतरही जणू दुर्दैवाची मालिका असल्याप्रमाणे त्यांच्या अनेक प्रियजनांचा मृत्यू झाला. एकीकडे त्यांची संसारवेल बहरत होती, त्याचबरोबर लहान वयातच चार मुलांची माता बनलेल्या मृणालिनीदेवींची प्रकृती बिघडत चालली होती. ठाकूरांच्या स्थावर मालमत्तेची जबाबदारी स्वीकारताना त्यांना कामकरी वर्गाची विपन्नावस्थाही व्याकूळ करत होती. कामानिमित्त सततच्या स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणाची समस्या जाणवत होती नि शिक्षणव्यवस्थेतले फोलपणही लक्षात येत होते. याचा परिपाक म्हणून शांतिनिकेतनची कल्पना उदयाला आली. हे शिवधनुष्य पेलतानाही अनेक समस्या आल्या. आर्थिक समस्या, व्यवस्थापन पाहणाऱ्या पुत्रवत बालेंद्रचा मृत्यू, यातून सावरेपर्यंत पत्नी मृणालिनीचा मृत्यू झाला.

व्यक्तिगत पातळीवर इतक्या समस्यांना तोंड देत असतानाच टागोर कलेच्या व शिक्षणाच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत राहिले. या साऱ्या घडामोडींचे वर्णन करणारे अनेक प्रसंग लेखकाने रंगवले आहेत. त्यावेळची

देशांतर्गत परिस्थिती पाहता वंगभंग, जालियनवाला बाग यांसारख्या प्रकरणांमुळे मनात नसतानाही त्यांना राजकारणात उतरावे लागले. स्वतंत्र विचारसरणीमुळे इथेही मतभेद व संघर्षाला तोंड द्यावे लागले. शांतिनिकेतनच्या कार्यासाठी देशविदेशांत दौरे करताना स्वत:च्या कलागुणांच्या आधारे निधी जमवण्याचा त्यांनी अटोकाट प्रयत्न केला; पण दैव त्यांच्यावर नाराजच राहिले.

दु:खात सुख म्हणजे शांतिनिकेतनची भरभराट व एकुलता एक मुलगा रथींद्र व सून प्रतिमा यांचा सहवास. यातच आनंद शोधत कालक्रमणा करत असताना गुरुदेवांना किडनीच्या असाध्य रोगाने गाठले. मग मात्र अकाली मृत्यू पावलेल्या आपल्या तीन मुलांची त्यांना आठवण होऊ लागली. उपचार चालू होते. त्यांच्या मनात नसतानाही शस्त्रक्रिया करावी लागली; पण त्यातून ते परत शुद्धीवर आलेच नाहीत. एखाद्या शापित देवदूताचे आयुष्य ते जगले. संपन्नता तरीही एकाकीपण, अफाट लोकप्रियता तरीही कडवा विरोध अशा परस्परविरोधी गोष्टी त्यांच्या वाट्याला आल्या. कर्तृत्वसंपन्न दीर्घायुष्य लाभले, पण प्रियजनांचा चिरविरह सोसावा लागला; पण एकामागून एक प्रियजन मृत्युपंथावर जात असतानाही स्वत:चे दु:ख बाजूला ठेवून त्यांनी समाजहिताची अमृतमयी वाटचाल सुरूच ठेवली.

गुरुदेवांचे हे बहुरंगी चरित्र रंगवताना लेखकाने कमालीचा संयम बाळगला आहे. गुरुदेवांची विचारसरणी व्यक्त करताना अभ्यासपूर्ण चिंतन व कौटुंबिक जिव्हाळ्याचे छोटे छोटे प्रसंग रंगवताना रंजकता वापरून चरित्राचा तोल साधला आहे. सारांशाने सांगायचे तर एका महान प्रतिभावंताचे चरित्र मूळ गुजराथी लेखक दिनकर जोषी यांनी अतिशय रसाळपणे मांडले आहे व डॉ. सुषमा करोगल यांनी त्याचा मराठी अनुवादही तितकाच सरस केला आहे. प्रत्येकाने जरूर वाचावी अशी ही कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने तितक्याच आकर्षक स्वरूपात वाचकांसमोर आणली. २०१२मध्ये द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, न्यू दिल्ली तर्फे उत्कृष्ट प्रकाशन प्रथम पुरस्कार या कादंबरीला प्राप्त झाला आहे.

**- प्रतिमा रवींद्र कुलकर्णी, पुणे**

◆




# द facebook इफेक्ट

**डेव्हिड कर्कपॅट्रिक**
**अनु. डॉ. वर्षा वेलणकर**

**पृष्ठसंख्या : ४०८**
**किंमत : रु. ३९५**

## फेसबुकची सोशल कथा...

आजपासून दहाएक वर्षांपूर्वी ‘तुम्ही कुठे भेटून गप्पा मारायचात’ असा प्रश्न एखाद्या तिशी-पस्तिशीतील मंडळींना विचारला तर कदाचित त्यांना ते ठिकाण पटकन आठवणारही नाही किंवा पंधरा वर्षांपूर्वी टाइमपास कसा करायचात, हा प्रश्न त्यांना बुचकळ्यात पाडेल. स्मार्टफोन आणि इंटरनेट या दोन साधनांनी समृद्ध असलेल्या आपल्या समाजावर फेसबुकने पाडलेला प्रभाव किती, याचं मोजमाप वरील दोन प्रश्नांतून करता येईल. जगभरात २.३ अब्ज इतके मासिक वापरकर्ते असलेल्या फेसबुकने साऱ्यांनाच भारून टाकलं आहे. सोशल नेटवर्किंगचं अफाट जाळं विणणाऱ्या फेसबुकने केवळ संवादाचं नवीन माध्यमच उभं केलं नाही तर, माणसांना एकमेकांना जोडण्याचंही काम केलं. जगाच्या कोणत्याही भागात घडणाऱ्या एखाद्या घटनेचा व्हिडिओ पोहोचवण्यापुरतंच ते मर्यादित राहिलेलं नाही तर, अनेक देशांच्या सत्तासंघर्षात त्यानं महत्त्वाची भूमिका बजावली आहे. असं असलं तरी, आपल्या अवतीभवती फेसबुकबद्दल तक्रारी करणारेही अनेकजण सापडतील. फेसबुकच्या माध्यमातून लोकांच्या खासगीपणावर होत असलेलं अतिक्रमण, त्याला आलेलं बाजारीकरणाचं स्वरूप, वापरकर्त्यांच्या माहितीची विक्री आणि तरुण पिढीत वाढत असलेलं फेसबुकचं व्यसन अशा अनेक रास्त तक्रारी या माध्यमाची काळी बाजू उघड करतात.

फेसबुकच्या पंधरा वर्षांच्या कारकिर्दीतल्या या स्थित्यंतराचा मागोवा घ्यायचा असेल तर, 'फेसबुक इफेक्ट' हे डेव्हिड कर्कपॅट्रिक लिखित आणि वर्षा वेलणकर यांनी मराठीतून अनुवादित केलेलं पुस्तक वाचायला हवं.

'फॉर्च्युन' या जगप्रसिद्ध अमेरिकी नियतकालिकात तंत्रज्ञान संपादक या पदावर अनेक वर्षे काम केलेले आणि तंत्रज्ञानविषयक घडामोडींचा बारकाईने अभ्यास करणारे म्हणून डेव्हिड कर्कपॅट्रिक प्रसिद्ध आहेत. आपल्या चार दशकांच्या कारकिर्दीत कर्कपॅट्रिक यांनी फेसबुकच्या निमित्ताने समाजमनावर होत असलेला परिणाम हेरला आणि त्याला पुस्तकाचे स्वरूप दिले. 'जगभरातील लोकांना आणि विशेषत: तरुणाईला एका समान सांस्कृतिक अनुभवाला सामोरं जाण्याचा मार्ग मोकळा करून देणारं हे द्वार आहे' असं त्यांचं म्हणणं आहे; 'पण ही (फेसबुकची) वाढ आणि समाजात खोलवर होणारा त्याचा शिरकाव, यामुळे काही सामाजिक, राजकीय, नियमन आणि धोरणासंदर्भात जटिल प्रश्नही निर्माण झाले आहेत,' हेही ते आवर्जून सांगतात. या दोन वाक्यांच्या दरम्यान कर्कपॅट्रिक यांनी फेसबुकची अवघी सोशल कथा वाचकांसमोर मांडली आहे.

या पुस्तकाचं प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे फेसबुकच्या जन्माची कथा. मार्क झकरबर्ग यानं हॉवर्डमध्ये शिक्षण घेत असताना एक अवांतर प्रकल्प म्हणून फेसबुकची निर्मिती केली. हॉवर्डमधल्या विद्यार्थ्यांना एकमेकांशी जोडण्यासाठीचा तो प्रयोग होता; पण त्याही आधी मार्कनं फेसमॉश नावाचा एक प्रोग्राम तयार केला होता. हॉवर्डच्या कॉलेज कॅम्पसमधील सर्वांत हॉट चेहरा शोधण्यासाठी या प्रोग्रामचा खटाटोप मार्कनं केला होता. हॉवर्डमधल्या सगळ्या विद्यार्थ्यांची माहिती असलेल्या एका डायरीला 'फेसबुक' असं म्हटलं जाई. फेसमॉशसाठी मार्कनं फेसबुकचाच वापर केला. फेसबुकमधील सगळी माहिती फेसमॉशमध्ये पुरवल्यानंतर मार्कनं केवळ चाचणी म्हणून आपल्या काही मित्रांना त्याची लिंक पाठवली; पण त्याच्या मित्रमंडळींना फेसमॉश इतकं भावलं की काही तासांत ते अवघ्या हॉवर्डच्या चर्चेचा विषय बनलं; पण मार्क तिथंच थांबला नाही. त्यानं फेसमॉश आणि त्याआधीच्या अशाच खटाटोपांना एकत्र करत 'द फेसबुक डॉट कॉम' हे संकेतस्थळ प्रदर्शित केलं. हॉवर्डमधील विद्यार्थ्यांना आपल्या मित्रमंडळींच्या संपर्कात ठेवण्यासाठी हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलं. त्याला अफाट यश मिळालं आणि त्यानंतर वर्ष-दोन वर्षांत झकरबर्गनं विविध महाविद्यालये,

हायस्कूल्स असं करत सर्वसामान्य तरुणाईसाठी फेसबुक सुरू केलं. फेसबुकच्या जन्माची ही कथा या पुस्तकात अतिशय विस्ताराने आली आहे. त्यामुळे अन्यत्र कुठेही न वाचलेले अनेक पैलू यानिमित्ताने उलगडले आहेत. फेसबुक सार्वजनिक होताच त्या वेळी तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या मायक्रोसॉफ्ट, गूगल, याहू, वायकॉम यांसारख्या कंपन्यांनी ते आपल्या ताब्यात घेण्याचे कसे प्रयत्न केले, याचं वर्णनही या पुस्तकात आहे. फेसबुकमधील हिस्सेदारीसाठी बड्या-छोट्या कंपन्यांनी केलेली मोर्चेबांधणी या पुस्तकात अतिशय व्यवस्थितपणे मांडली आहे. पुढे फेसबुकची कंपनी स्थापन करताना झकरबर्गच्या आयुष्यात घडलेला घटनाक्रमही कर्कपॅट्रिक यांनी सखोल संशोधनाद्वारे मांडला आहे. हा सगळा इतिहास केवळ रंजकच नव्हे, तर एखाद्या नवउद्यमीला प्रेरित करणाराही आहे. त्याच काळात फेसबुकची संकल्पना ही निव्वळ उचलेगिरी असल्याचा आरोप करून दाखल करण्यात आलेल्या याचिकांची माहितीही कर्कपॅट्रिक देतात.

फेसबुकच्या जन्मकथेनंतर पुस्तकाची शेवटची दीडेकशे पाने त्याच्या आजच्या (अर्थात २०१० पर्यंतच्या) प्रवासाची आहेत. या दरम्यान फेसबुकचा १५ अब्ज डॉलरची कंपनी म्हणून निर्माण झालेला दबदबा, तसंच फेसबुकमुळे वापरकर्त्यांच्या गोपनीयतेला असलेला धोका यांचं विवेचन पुस्तकात व्यवस्थित आलं आहे. फेसबुकचा राजकीय व्यासपीठ म्हणून होत असलेला वापर आणि फेसबुकच्या माध्यमातून देशोदेशांतील चळवळींना मिळालेलं व्यासपीठ यांचाही कर्कपॅट्रिक यांनी आढावा घेतला आहे. हे करतानाच लेखकाने फेसबुकच्या भविष्याचाही वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. युनिव्हर्सल कनेक्टिव्हिटीसाठी आवश्यक गुण फेसबुकमध्ये पुरेपूर भरलेले आहेत. फेसबुकला ‘वैश्विक खेडं’ बनवण्याच्या झकरबर्गच्या महत्त्वाकांक्षेलाही ते पूरक आहेत; मात्र हे होत असतानाच अनियंत्रित आणि अतिरेकी देवाणघेवाणीतून निर्माण होणाऱ्या माहितीचं काय, असा प्रश्नही लेखकाने शेवटी विचारला आहे.

सरतेशेवटी, अनुवादाविषयी, फेसबुकबद्दल तक्रारी करणाऱ्या पालकांनी आणि त्याच्या नको इतक्या प्रेमात पडलेल्या तरुणवर्गाने आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे. या पुस्तकाच्या अनुवादाची गरज वर्षा वेलणकर यांनी आपल्या मनोगतात अतिशय स्पष्टपणे विशद केली आहे. ज्या संवादाची,

त्यातून निर्माण होणाऱ्या मानवी नात्यांची, त्या नात्यांच्या जपणुकीची अपेक्षा मार्क झकरबर्गला आहे, त्यात फेसबुक वापरणाऱ्यांच्या या साधनासंदर्भातील अज्ञानाचा मोठा अडसर निर्माण झाला आहे, असे वेलणकर सांगतात आणि ते योग्यही आहे. पुरेशा माहितीअभावी वापरलेल्या कोणत्याही गोष्टीचा पुरेपूर उपयोग तर करता येतच नाही; परंतु त्यातून नुकसान होण्याचाच धोका अधिक असतो. फेसबुकच्या बाबतीत असे धोके आपल्याला वारंवार दिसत आहेत. त्या धोक्यांपासून बचाव करायचा असेल तर 'द फेसबुक इफेक्ट' वाचायलाच हवं.

**– आसिफ बागवान**

(लोकप्रभा, २६.४.२०१९)

◆

## आवाहन


पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.


# जंगल जंमत मालिका भाग - १

**निर्मला मोने | वैशाली कार्लेकर | अरुंधती महाम्बरे**


छोट्टे-मोठ्ठे, प्राणी-पक्षी रुसवा-फुगवा, भांडण-मैत्री सारं
काही तुमच्यासारखं तिथेच जाऊन पहायला हवं चटकन् चला,
पाहूया गंमत दोस्तांना दाखवू जंगल जंमत...




**गाढवाचं गाणं**



**सिंहाचं उड्डाण**



**फट्फजिती**



**बूम बूम बैल**



**तीन छोटे मासे**

**५ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत ३१०/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**

# लक्षवेधी

## रुखवतावर ठेवली तीन लाखांची पुस्तके

वाचनसंस्कृतीला पोषक ठरेल अशी एक घटना नुकतीच अहमदनगर येथे घडली. अमर आणि राणी कळमकर यांनी आपल्या विवाह सोहळ्यात रुखवतावर वस्तू आणि पदार्थांऐवजी पुस्तकं मांडली.

दहावीला असताना अमर यांना फीअभावी परीक्षेला बसता आले नाही. पुढे चार वर्षांचा गॅप घ्यावा लागला. त्यानंतर कष्ट करून त्यांनी स्वत:चे शिक्षण पूर्ण केले. अशी वेळ कुणावरही येऊ नये, अशा विचाराने त्यांनी हा अभिनव उपक्रम राबवला. एवढंच नाही तर येणाऱ्या पाहुण्यांनीही आहेर म्हणून पुस्तके द्यावीत, अशी विनंती त्यांनी केली.


राणी या शिक्षिका आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी आणि सगळ्यांसाठीच पुस्तकांचं महत्त्व काय आहे हे त्या उत्तम रीतीने जाणतात. म्हणून अमर यांच्या निर्णयात त्यांचाही सहभाग होता.

या दाम्पत्याने रुखवतावर मांडलेल्या पुस्तकांची एकूण किंमत तीन लाख रुपये आहे. ही पुस्तके नंतर ग्रंथालयाला देण्यात येणार आहेत.





## पंचतंत्रातील गोष्टी - अनिल किणीकर/निर्मला मोने


निसर्गातले पशू-पक्षी, छोटेसे प्राणी, नद्या, डोंगर, गुहा या सगळ्यांचा उपयोग करून मजेदार ढंगात खास मुलांना ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या, त्या 'पंचतंत्र' या नावानं प्रसिद्ध झाल्या. सुमारे ४५० वर्षांपासून या मजेदार गोष्टी मुलांसाठी मनोरंजक तर आहेतच शिवाय मुलांवर संस्कारही करतात. अशाच पंचतंत्रातल्या या सरस आणि सुरस गोष्टी!





पंचतंत्रातील बोधप्रद गोष्टी
पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी
पंचतंत्रातील रोचक गोष्टी
पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी
पंचतंत्रातील सुरस गोष्टी








**५ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत ३००/-रु.**
**पोस्टेज ५०/-रु.**


# चित्रमय रंगतदार कथा भाग - ४

‘लोककथा’ हा प्रत्येक संस्कृतीचा अनमोल ठेवा असतो. प्रत्येक पिढीनं पुढच्या पिढीला तो जपण्यासाठी द्यायचा असतो, कारण त्यातून मनोरंजन तर होत असतंच; पण खूप शिकायला मिळतं, नवीन माहिती मिळते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असताना कानगोष्टींसारखं काळानुरूप त्याचं रूप बदलत जातं, पण त्यातला बोध मात्र त्रिकालाबाधितच राहतो. या पुस्तकात रशियन लोककथा वेगवेगळे भारतीय पोशाख घालून तुम्हांला भेटायला आल्या आहेत. वाचून बघा; नक्की आवडतील तुम्हांला.

**गम्मत गोष्टी**




**धमाल गोष्टी**



**मजेदार लोककथा**



**आदर्श लोककथा**



**मंजूषा आमडेकर**

४ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत रु. २००/-

पोस्टेज रु.५०/-





**‘भाषासंवादिनी’** या कार्यक्रमात मॉरिशसच्या भारतात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थिनींशी संवाद साधताना **ज्येष्ठ साहित्यिक श्याम भुर्के**. (सविस्तर वृत्त पान २८ वर ‘उपक्रम’ या सदरात)





**‘विज्ञानाच्या गमतीजमती’** या कार्यक्रमात रंगलेले बालक-पालक आणि **‘बीइंग जिज्ञासू’** या टीमचे सदस्य. (सविस्तर वृत्त पान २८ वर ‘उपक्रम’ या सदरात)

**Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
**No. CSO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/05/2019 Posting Date : 11/05/2019


## आवर्जून वाचावे

















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,